# दर्शन

२०१९-२०२०

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''

–कर्मवीर



रयत शिक्षण संस्थेचे,

## चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,

ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

- नॅक 'अ' मानांकित महाविद्यालय
- आय.एस.ओ. ९००१- २०१५ प्रमाणित


- www.cdjcollege.com
- E -mail : cdjcollege@yahoo.com

# विविध इमारतींचे उद्घाटन व नामकरण सोहळा



रयत शैक्षणिक संकुलातील
विविध इमारतींचे उद्घाटन
व नामकरण प्रसंगी
मार्गदर्शन करताना
**पद्मविभूषण मा.खा.डॉ.शरदचंद्रजी पवार**
माजी कृषी मंत्री, भारत सरकार,
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा

विविध इमारतींचे उद्घाटन व
नामकरण सोहळा प्रसंगी
प्रमुख पाहुणे **रामशेठ ठाकूर,**
सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल,
रयत शिक्षण संस्था, सातारा
मनोगत व्यक्त करताना





अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना
**मा.डॉ.अनिल पाटील**
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

रयत शैक्षणिक संकुलातील
विविध शैक्षणिक उपक्रमाविषयी
माहिती सांगताना **मा.मीनाताई जगधने,**
सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल,
रयत शिक्षण संस्था, सातारा



"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"
-कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,

ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न

Id. No. PU/AN/C/05(1962)
AN ISO 9001-2015

NAAC Re-accredited 'A' Grade (CGPA 3.14)

www.cdjcollege.com
E -mail : cdjcollege@yahoo.com

# दर्शन २०१९-२०२०

## नियतकालिक

प्रा.डॉ.बापूसाहेब घोडके
संपादक

प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव भोर
अध्यक्ष

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
## ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर



## महाविद्यालय विकास समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा.मीनाताई माणिकराव जगधने | चेअरमन प्रतिनिधी | चेअरमन |
| २ | मा.प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे | | सभासद |
| ३ | मा.ॲड्.विजयराव साहेबराव बनकर पाटील | स्थानिक प्रतिनिधी (शिक्षण विभाग) | सभासद |
| ४ | मा.प्रकाश रामराव निकम पाटील | स्थानिक प्रतिनिधी (उद्योजक विभाग) | सभासद |
| ५ | मा.डॉ.राजीव रावसाहेब शिंदे | स्थानिक प्रतिनिधी (संशोधन विभाग) | सभासद |
| ६ | मा.रावसाहेब नाथाजी म्हस्के पाटील | स्थानिक प्रतिनिधी (समाजसेवा विभाग) | सभासद |
| ७ | प्रा.डॉ.एस.एन.गवळी | प्रमुख,वाणिज्य विभाग | सभासद |
| ८ | श्री.व्ही.एम.मोरे | समन्वयक,आय.क्यू.ए.सी. | सभासद |
| ९ | डॉ.बी.बी.बावके | प्राध्यापक प्रतिनिधी | सभासद |
| १० | डॉ.आर.पी.कळमकर | प्राध्यापक प्रतिनिधी | सभासद |
| ११ | डॉ.एस.बी.सय्यद | प्राध्यापक प्रतिनिधी | सभासद |
| १२ | श्री.एस.वाय.हासे | शिक्षकेत्तर प्रतिनिधी | सभासद |
| १३ | मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर | | सचिव |

# दर्शन २०१९-२०२०

## संपादक मंडळ


**प्रा.डॉ.बापूसाहेब घोडके**
संपादक

**प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव भोर**
अध्यक्ष

## विभागीय संपादक

प्रा.डॉ.सय्यद एस.बी.
प्रा.नागपुरे व्ही.बी.
प्रा.चंद्रात्रे वाय.व्ही.
प्रा.मोरे व्ही.एम.

## संस्थापक
## रयत शिक्षण संस्था, सातारा



# पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील

**डी.लिट्.**

# दानशूर व्यक्तिमत्त्व



## कै.चंद्रभान रुपचंदजी डाकले

# आमचे आधारस्तंभ



## पद्मविभूषण मा.खा.डॉ.शरदचंद्रजी पवार

डी.लिट्.

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा

# आमचे आदर्श



## स्व.ॲड्.रावसाहेब शिंदे

# आमचे प्रेरणास्थान



## मा.डॉ.अनिल पाटील

**कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा**

# रयत शिक्षण संस्था पदाधिकारी



मा.अरुण कडू पाटील
उपाध्यक्ष



मा.ॲड्.भगीरथ शिंदे
व्हा.चेअरमन



मा.दादाभाऊ कळकमर
अध्यक्ष, उत्तर विभाग सल्लागार समिती



मा.प्रिं.डॉ.भाऊसाहेब कराळे
सचिव



मा.प्रिं.डॉ.विजयसिंह सावंत
सहसचिव (उच्च शिक्षण)



मा.विलास महाडीक
सहसचिव (माध्यमिक)



मा.प्रिं.डॉ.अरुण आंधळे
ऑडिटर



मा.संजय नागपूरे
इन्स्पेक्टर (उत्तर विभाग)

# प्रेरकशक्ती व मार्गदर्शिका



## मा.मीनाताई जगधने

**सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा**
**चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर**

## महाविद्यालयाचे कुशल नेतृत्व




**मा.प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव भोर**



मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, उपप्राचार्य डॉ.एस.एन.गवळी यांच्या समवेत 'दर्शन' संपादक मंडळ

### हार्दिक अभिनंदन !



**डॉ.एम.बी.जगताप**
पीएच.डी.अर्थशास्त्र

### सेवानिवृत्त प्राध्यापक



**प्रा.बी.एस.वाघमारे**
दि.३१/०७/२०१९



**डॉ.डी.बी.घोटेकर**
दि.३१/१२/२०१९



**प्रा.डॉ.एस.एन.गवळी**
दि.३१/०५/२०२०

# प्राचार्यांचे मनोगत

थोर शिक्षण तज्ज्ञ पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील वंचित, उपेक्षित व बहुजन समाजाला शिक्षण मिळावे. त्यांच्या जीवनातील अंधकार दूर व्हावा. ज्ञानाचा प्रकाश त्यांच्या झोपडीपर्यंत पोहोचावा. या उद्देशाने ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक जीवनात अमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. संस्थेने महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात दैदीप्यमान कार्य केले आहे. कर्मवीरांच्या अथक परिश्रम, त्याग, समर्पणाच्या पायावर, विचार व कार्यावर उभी असलेली ही संस्था आशिया खंडातील सर्वात मोठी व मानांकित ठरली आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या ४३ महाविद्यालयापैंकी चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर हे एक महाविद्यालय आहे. सन १९६२ रोजी स्थापन झालेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ग्रामीण भागातील स्वतंत्र वाणिज्य विद्याशाखा असलेले एकमेव महाविद्यालय आहे. महाविद्यालयाला नॅकच्या तृतीय मूल्यांकनात 'अ' मानांकन मिळाले असून सी.जी.पी.ए. ३.१४ आहे. महाविद्यालय आय.एस.ओ.९००१-२०१५ प्रमाणित आहे ही आनंदाची व समाधानाची बाब आहे.

महाविद्यालयात इयत्ता ११ वी पासून एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी. व बी.बी.ए.(सी.ए) इत्यादीचे वर्ग असून जवळपास तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयात सर्व प्रवेश ऑनलाईन व गुणवत्तेवर होतात हे सांगताना विशेष आनंद होतो. विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात सक्षम पणे उभे करण्यासाठी कौशल्य आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती करुन ते सक्षमपणे राबवणे आवश्यक आहे. संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या विविध शॉर्ट टर्म कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्याचा विकास करुन नवसमाज निर्मितीचा प्रयत्न सातत्याने सुरु आहे. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, वाणिज्य मंडळ, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, सांस्कृतिक विभाग, संगणक विभाग, जिमखाना विभाग, अविष्कार स्पर्धा, ग्रंथालय या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. गेल्या ५८ वर्षात श्रीरामपूर पंचक्रोशीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक परिसर विकासाचे केंद्र म्हणून महाविद्यालयाकडे पाहिले जाते. त्यामुळे अनेक आजी-माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवीत आहेत याचा मनस्वी आनंद होतो.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी व गुणवत्ता वाढीसाठी भौतिक व शैक्षणिक सुविधा उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. यासाठी सातत्याने प्राधान्य दिले आहे. त्यासाठी स्वतंत्र वरिष्ठ महाविद्यालय इमारत, ज्युनिअर कॉलेज इमारत, प्रशासकीय इमारत, अद्यावत जिमखाना, भव्य क्रीडांगण, बहुउद्देशीय सभागृह, सौर ऊर्जा प्रकल्प, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, मुलींचे वसतिगृह, प्राध्यापक निवास या भौतिक

सुविधा निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. महाविद्यालयात अध्ययन व अध्यापन प्रभावी होण्यासाठी सर्व वर्गात एल.सी.डी. प्रोजेक्टर, संगणक, कॉमर्स लॅब, लैंग्वेज लॅब, सर्व सोयींनी युक्त संगणक लॅब, अद्यावत संगणकीकृत ग्रंथालय, वातानुकूलित वाचन कक्ष व महाविद्यालयाचे सुशोभीकरण करून शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू आहेत.

महाविद्यालयातील प्राध्यापक अध्ययन, अध्यापन आणि संशोधन प्रक्रियेत सक्रिय असतात. अनेक सहकारी प्राध्यापकांनी राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात प्रत्यक्ष सहभाग घेऊन शोधनिबंध सादर व प्रकाशित केले आहेत. पुणे विद्यापीठातंर्गत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध प्रकारचे चर्चासत्रे, कार्यशाळा, सीड मनी प्रोजेक्ट इत्यादींचे आयोजन करण्यात आले आहे ही खूप समाधानाची व आनंदाची बाब आहे.

श्री.यशवंत मयूर राजेंद्र व श्री बनकर अभिनव अविनाश या विद्यार्थ्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' संशोधन प्रकल्प स्पर्धेत निवड झाली व त्यामध्ये श्री. यशवंत मयूर या विद्यार्थ्यांची मुंबई या ठिकाणी झालेल्या राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत निवड झाली. स्पर्धा परीक्षा विभागामार्फत कु.पुनम पवार हिची महाराष्ट्र ग्रामीण बँकेत प्रोबेशनरी अधिकारपदी निवड झाली आहे.

कोविड-१९ या संसर्गजन्य विषाणूमुळे समाजावर खूप मोठे अरिष्ट आले आहे. यामध्ये समाजाचे मोठे आर्थिक व शैक्षणिक हानी झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ई-लर्निंगच्या माध्यमातून विविध विषयाचे व्हिडीओ, ऑडिओ लेक्चर्स व ऑनलाईन लेक्चर सुरु केले आहेत.

महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीमध्ये शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष आदरणीय मा.खा.शरदचंद्रजी पवार साहेब, संस्थेचे चेअरमन मा.डॉ.अनिल पाटील साहेब, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा.मीनाताई जगधने, महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य, संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी, सहकारी प्राध्यापक यांचे मार्गदर्शन, प्रेरणा व सहकार्यामुळेच महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख सातत्याने उंचावतो आहे. यावर्षीचा 'दर्शन' अंक आपल्या पसंतीला व अभिरुचिला पात्र ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझ्या लेखणीला पूर्णविराम देतो.

जय कर्मवीर !

**डॉ.एल.डी.भोर**
प्राचार्य

# संपादकीय...

रसिक वाचकहो,

महाविद्यालयाचे 'दर्शन' सन २०१९-२० वार्षिक नियतकालिकाचा अंक आपल्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. महाविद्यालयीन नवतरुणाईचा ललितमय अक्षर अविष्कार नियतकालिकाच्या रुपाने आपल्या समोर येत असतो. नियतकालिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभाशक्तीला हक्काचे व्यासपीठ मिळत असते. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांच्या साहित्यिक कलागुणांना व्यक्त होण्याची संधी महाविद्यालय स्तरावरुन देण्याचा हा एक प्रयत्न असतो.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक नामवंत, यशवंत, कर्तृत्ववान व्यक्ती होऊन गेल्या आहेत. आधुनिक भारताच्या व महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक महापुरुषांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, कला, क्रीडा, शेती, संशोधन, समाजसेवा क्षेत्रातील विचार, कार्य, कर्तृत्व महत्त्वपूर्ण आहे. या विचाराने मानवजातीचे कल्याण होऊ शकते. या महापुरुषांचे विचार, कार्य, कर्तृत्व तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी या अंकाचे संपादन केले आहे. ही ग्रामीण परिसरातील व साहित्याची परंपरा नसलेल्या विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती आहे या दृष्टीने यातील आविष्कार, निर्मिती व आकलनाकडे पहावे ही विनंती.

चंद्ररुप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालय हे कर्मवीरांनी लावलेल्या वटवृक्षाचीच एख पारंबी आहे. कर्मवीरांच्या विचार व कार्याचा वारसा आणि वसा घेऊन आम्ही वाटचाल करीत आहोत. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.खा.डॉ. शरदरावजी पवारसाहेबांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली संस्था यशस्वीपणे प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. संस्थेचे चेअरमन मा.डॉ.अनिल पाटील हे सतत नावीन्याचा शोध घेऊन विद्यार्थीकेंद्री शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ज्ञानगंगा समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचविण्याचा त्यांचा सातत्याने प्रयत्न आहेत. मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व रयत शैक्षणिक संकुलाच्या चेअरमन आदरणीय मा.मीनाताई जगधने यांचे मार्गदर्शन, प्रेरणा व सहकार्य अनमोल असेच आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव भोर यांचा पिंडच 'कमवा व शिका' योजनेतून तयार झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांविषयी त्यांचा विशेष ओढा जाणवतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी सातत्याने विविध रचनात्मक उपक्रम कुशलतेने राबवून विद्यार्थ्यांना सतत प्रेरित करण्याचे कार्य अविरतपणे सुरुच आहे.

संपादनाच्या आणि संयोजनच्या संदर्भात अनेक विविध स्वरुपाचे सहकार्य सर्वांकडून मला मिळाले. मा.प्राचार्य यांनी दिलेले स्वातंत्र्य, दाखविलेला विश्वास, प्रेरणा, सहकार्य व मार्गदर्शन अनमोल असेच आहे. यामुळेच मी संपादनाचे काम यशस्वीपणे करु शकलो याचा विशेष आनंद आहे.

विद्यार्थी, सहकारी, प्राध्यापक, ग्रंथालय, कार्यालयीन सेवक व संपादक मंडळातील सर्व सदस्य यांच्या प्रोत्साहन व सहकार्यामुळेच 'दर्शन' ला पूर्णत्व लाभले आहे. मुद्रक म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे आनंद फुणगे या सर्वांचे हार्दिक आभार !


धन्यवाद !

डॉ.बापूसाहेब घोडके
संपादक



# भावपूर्ण श्रद्धांजली

या शैक्षणिक वर्षात राज्य, राष्ट्रीय, जागतिक स्तरावर कीर्तीमान, राजधुरंदर, मातृभूमीच्या रक्षणार्थ शहीद झालेले भारत मातेचे शूरवीर, जागतिक कीर्तिचे साहित्यिक, विचारवंत, कलावंत, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी, संस्थेतील व महाविद्यालयातील सेवक, विद्यार्थी व त्यांचे आप्तेष्ट, संस्थेवर प्रेम करणारे स्नेहीजण व नैसर्गिक आपत्तीत, कोवीड १९ या संसर्गजन्य विषाणूमुळे प्राण गमावलेले देश बांधव, कोविड योध्दे... यापैकी दिवंगत झालेल्यांना 'दर्शन' चे आदरपूर्वक अभिवादन, महाविद्यालयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.



## "Education through self-help is our Motto''

**Dr. Karmaveer Bhaurao Patil**

The emblem 'The Banyan Tree' as chosen by Dr. Karmaveer Bhaurao Patil founder of parent institution Rayat Shikshan Sanstha, Satara, encompasses the message that, the students from all parts of the society including underprivileged will porsper, flourish and accomplish with the help of education.

## Vision

"To provide quality business education, accessible and affordable to the rural masses and to promote research and entrepreneurship for the development of rural area''.

## Mission of the College

The mission statement of the college reflects our endeavour to translate the vision to reality. Our mission is:

- To motivate the students from rural area to go in for commerce education.
- To provide complete commerce education right from XI Std. to. Ph.D.
- To enrich commerce education through tutorials, field visits, industrial Tours, quiz contest, essay competitions, seminars and workshops & Research.
- To motivate and train students for M.B.A., CET, C.A.,C.W.A and C.S., IBPS., CMA., DTL., GDC&A.
- To provide affordable career oriented courses to the rural students.
- To undertake research regarding various business problems, especially in the surrounding area.
- To foster research culture amongst faculty and students.
- To inculcate proper ethical, social and responsible behavior amongst the students.
- To bring about all round development of the students, so that they become worthy members of a nation aspiring to be a world power

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the
Chandraroop Dakle Jain College of Commerce
Tal. Shrirampur, Dist. Ahmednagar, affiliated to Savitribai Phule Pune University,
Maharashtra as

Accredited

with CGPA of 3.14 on four point scale

at A grade

valid up to July 14, 2024

Date : July 15, 2019

S. C. Sharma
Director

EC(SC)/42/RAR/MHCOGN10821

Scanned with CamScanner

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''

-कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

अठ्ठावन्न वर्षांची समृध्द परंपरा
नॅक मानांकित 'अ' दर्जा प्राप्त वाणिज्य महाविद्यालय

आय.एस.ओ.९००१-२०१५ मानांकन प्राप्त

उत्कृष्ट निकालाची परंपरा

वाणिज्य विभागात उत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मान्यता

अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग

समृध्द संगणकीकृत ग्रंथालय व बुक बँकेची सोय

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व टी.सी.एस.प्रशिक्षण सुविधा

अत्याधुनिक संगणक विभाग व सुसज्ज संगणक प्रयोगशाळा

अत्याधुनिक साधनांनी युक्त जिमखाना व भव्य क्रीडांगण

सर्व सोयींनीयुक्त विद्यार्थिनी वसतिगृह

विविध शॉर्ट टर्म कोर्सेसची सुविधा

गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना

# अंतरंग

छायाचित्रे

विभाग

वार्षिक अहवाल

सेवक माहिती

# आमचे गुणवंत


कु.नारंग गितीका
एफ.वाय.बी.कॉम


कु.छतवाणी रोशनी
एफ.वाय.बी.कॉम


कु.जासूद प्रतिभा
एफ.वाय.बी.कॉम


कु.गायकवाड अमृता
एम.कॉम. भाग-I

वाणिज्य संशोधन केंद्र


कु.जाधव प्रिया
एम.फिल


कु.देवठक मृणाली
एम.कॉम. भाग-II


खैरनार पीयुष
एफ.वाय.बी.बी.ए.(सी.ए)


शेख इम्रान
एस.वाय.बी.बी.ए.(सी.ए)


सिन्नरकर कृष्णा
टी.वाय.बी.बी.ए.(सी.ए)


माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य डॉ.श्रीरंग झावरे (मा.सहसचिव,उच्चशिक्षण र.शि.संस्था,सातारा.) समवेत इतर मान्यवर


माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात मनोगत व्यक्त करताना मा.किशोर निर्मळ (संचालक, प्रभात डेअरी प्रा.लि.)


प्लेसमेंट सेल तर्फे आयोजित बँकिंग क्षेत्रात व्यवसायाची संधी या विषयी मार्गदर्शन करताना मा.अभिजित गायके (संचालक, आयलर्न अॅकॅडमी)



कॅम्पस ड्राइव्ह अंतर्गत एन.आय.आय.टी., आय.एफ.बी.आय.लि. च्या एच.आर. मा.मनीषा तिवारी मार्गदर्शन करताना

# राष्ट्रीय छात्र सेना



लेफ्टनंट प्रा.विजय नागपुरे
असो.एन.सी.सी.ऑफीसर





श्री.आशुतोष यादव
एअर फोर्स(दिल्ली निवड)



श्री.दीपक भवार
NIC कॅम्प (उत्तराखंड) निवड



कु.शीतल मुठे
NIC कॅम्प (उत्तराखंड) निवड



श्री.तुषार पवार
IGC कॅम्प (अमरावती ) निवड



श्री.अमोल टाक
IGC कॅम्प (अमरावती ) निवड



श्री.किरण ब्राम्हणे
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.प्रमोद कळंके
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.आकाश वायकर
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.योगेश डोके
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.प्रथमेश थोरात
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.अक्षय थोरात
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.सचिन बनकर
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.अनिकेत गाढे
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.अमोल भसाळे
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.गौरव पवार
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.अक्षय तागड
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



कु.प्राजक्ता मोरे
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



कु.आश्विनी नरोडे
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.प्रशांत देसाई
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड



श्री.ऋषिकेश डुकरे
'बी' प्रमाणपत्र परीक्षेत 'बी' ग्रेड

# पद्मविभूषण मा.खा.डॉ.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ७९ व्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम



वाढदिवस समारंभात पवार साहेबांच्या कार्याविषयी माहिती सांगताना मा.मीनाताई जगधने, (सदस्य,मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था,सातारा) समवेत इतर मान्यवर



वाढदिवस समारंभात मनोगत व्यक्त करताना मा.डॉ.दीपाली काळे (अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर) समवेत इतर मान्यवर



वाढदिवसानिमित्त आयोजित विविध स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करताना मा.मीनाताई जगधने, मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर व इतर मान्यवर



वाढदिवसानिमित्त आयोजित भित्तिपत्रकांची पाहणी करताना मा.दिपाली काळे (अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर) मा.अनुराधाताई आदिक (नगराध्यक्ष, श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर)



वाढदिवस समारंभात मनोगत व्यक्त करताना मा.डॉ.रवींद्र जगधने, समवेत इतर मान्यवर



वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स समवेत डॉक्टर, सहकारी प्राध्यापक

# महाविद्यालयास नॅक पिअर टीम भेट



नॅक पिअर टीम चेअरमन मा.डॉ.प्रदीप कुमार यादव, (उत्तरप्रदेश) समन्वयक मा.डॉ.करमपाल नरवाल, (हरियाणा) व सदस्य मा.प्राचार्य डॉ.मारिया आराधाना (गोवा) यांचे महाविद्यालयात स्वागत करताना प्राचार्य डॉ.एल.डी.भोर



नॅक पिअर टीम समोर महाविद्यालयाचे सादरीकरण करताना मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर



नॅक पिअर टीमला पी.पी.टी.द्वारे महाविद्यालयाविषयी माहिती सांगताना मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर



नॅक पिअर टीम कार्यालयाची कार्यप्रणाली तपासताना



विद्यार्थी विकास मंडळामार्फत राबविलेल्या विविध उपक्रमांचे अवलोकन करताना



'टेलरिंग' शॉर्ट टर्म कोर्सेची पाहणी करताना नॅक पिअर टीमचे चेअरमन मा.डॉ.प्रदीप कुमार यादव

# नॅक पिअर टीम भेट



नॅक पिअर टीम वाणिज्य संशोधन केंद्राविषयी माहिती घेताना



संगणक विभागास नॅक पिअर टीम भेट



नॅक पिअर टीमला इंग्रजी लँग्वेज लॅब विषयी माहिती देताना डॉ.बी.बी.बावके



नॅक पिअर टीम कॉमर्स लॅबची पाहणी करताना




नॅक पिअर टीम बेस्ट प्रॅक्टीस टेक्सपर्टची पाहणी करताना



नॅक पिअर टीम शॉर्ट टर्म कोर्स 'ब्युटी पार्लर' लॅबची पाहणी करताना

# नॅक पिअर टीम भेट



मा.डॉ.अनिल पाटील (चेअरमन,र.शि.सं.सातारा),मा.मीनाताई जगधने (सदस्य,मॅनेजिंग कौन्सिल,र.शि.सं.सातारा) यांच्या समवेत महाविद्यालयाविषयी चर्चा करताना नॅक पिअर टीम



प्राध्यापकांशी चर्चा करताना नॅक पिअर टीम



नॅक पिअर टीमला माजी विद्यार्थी संघटनेची माहिती देताना मा.किशोर निर्मळ



नॅक पिअर टीम विद्यार्थ्यांसमवेत चर्चा करताना



नॅक पिअर टीम ज्वेलरी मेकिंगची शॉर्ट टर्म कोर्स पाहणी करताना



नॅक पिअर टीम समोर कला अविष्कार सादर करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी

# नॅक पिअर टीम भेट



समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना नॅक पिअर टीमचे चेअरमन मा.डॉ.प्रदीप कुमार यादव



महाविद्यालयाला 'अ' मानांकन मिळाल्याबद्दल मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, समन्वयक डॉ.बी.बी.बावके, आय.क्यू.ए.सी चेअरमन प्रा.विवेक मोरे यांचा गौरव करताना मा.मीनाताई जगधने.



नॅक पिअर टीम ग्रंथालयाची पाहणी करताना




नॅक पिअर टीम समवेत मा.प्राचार्य, सहकारी प्राध्यापक व कार्यालयीन सेवकवृंद



नॅक पिअर टीम जिमखाना विभागाची पाहणी करताना



वृक्षारोपण करताना नॅक पिअर टीमचे चेअरमन मा.डॉ.प्रदीप कुमार यादव व समवेत इतर मान्यवर

# जिमखाना विभाग

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत विभागीय पातळीवर निवड व सहभाग


काळे सनी
बास्केटबॉल


कु.वानखेडे साक्षी
बॉलबॅडमिंटन


कु.मोरे प्राजक्ता
बॉलबॅडमिंटन


फुलपगार नितीन
बॉलबॅडमिंटन


शेख सादिक
बॉक्सिंग


पठाण रमजान
ॲथेलेटिक्स


कु.पटेल इशिता
व्हॉलीबॉल


कु.पटेल जान्हवी
व्हॉलीबॉल


कु.कटारिया आरती
व्हॉलीबॉल


फसाटे सौरभ
योगा

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत अहमदनगर जिल्हा क्रीडा विभागाचे प्रतिनिधीत्त्व केलेले खेळाडू


कु.लिप्टे रामेश्वरी
व्हॉलीबॉल


कु.फुलकर शुभांगी
व्हॉलीबॉल


कु.कुलकर्णी पुजा
व्हॉलीबॉल


कु.शिरसाठ श्वेताली
व्हॉलीबॉल


कु.अमोलिक रिया
व्हॉलीबॉल


कु.भोंगळे वैष्णवी
व्हॉलीबॉल


कु.शेळके दिव्या
व्हॉलीबॉल


कु.कासार मानसी
व्हॉलीबॉल

## ज्युनिअर विभाग : अहमदनगर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्त्व केलेले खेळाडू


लोणारे राहुल
ॲथेलेटिक्स


पवार सचिन
ॲथेलेटिक्स


कु.गांगुर्डे ऋतुजा
कब्बडी


कु.आदिक आश्विनी
कब्बडी


कु.खान शबनम
कब्बडी


कु.लबडे स्नेहल
कब्बडी


कु.मोरे नम्रता
कब्बडी


कु.चव्हाण साक्षी
कब्बडी


कु.वाणी वृषाली
कब्बडी


कु.काकडे अमृता
कब्बडी


कु.गोरे गायत्री
कब्बडी


कु.वाळुंजकर आकांक्षा
कब्बडी


कु.जाधव पल्लवी
कब्बडी


कु.शिरसाठ अमृता
कब्बडी

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविभागीय वेटलिफ्टींग व शरीरसौष्ठव स्पर्धा



वेटलिफ्टींग स्पर्धेचे उद्घाटन करताना
मा.डॉ.कुशाबा पिंगळे, डॉ.पोपट धनवे, डॉ.निहारीलाल दुबे



शरीरसौष्ठव स्पर्धेचे उद्घाटन करताना
मा.श्री.उमाकांत म्हाळस्कर, (उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य वेटलिफ्टींग संघटना),
सौ.उज्ज्वला माने (राष्ट्रीय कोच, वेटलिफ्टींग) श्री.राजेंद्र सोनवणे



स्पर्धेत प्रावीण्य दाखविताना खेळाडू



सावित्रीबाई फुले पुणे 'विद्यापीठ श्री' २०१९-२०
समवेत प्रमुख पाहुणे, पंच व इतर मान्यवर



स्पर्धेत प्रावीण्य दाखविताना खेळाडू



स्पर्धेत आपले प्रावीण्य दाखविताना
शरीरसौष्ठव पटू

## एकदिवसीय कार्यशाळा

# बौध्दिक संपदा हक्क व संशोधन पध्दती



कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय मनोगत
व्यक्त करताना मा.प्रकाश निकम पाटील
(सदस्य,जनरल बॉडी,रयत शिक्षण संस्था,सातारा)



कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना मा.डॉ.प्रकाश चौधरी
(नेस वाडिया कॉलेज, पुणे)



कार्यशाळेमध्ये संबोधित करताना मा.डॉ.किशोर नवले
(श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे)




कार्यशाळेमध्ये मा.डॉ.राकेश सुरम, (श्री शाहू मंदिर
महाविद्यालय, पुणे ) यांचे स्वागत करताना
मा.प्रकाश निकम पाटील, समवेत इतर मान्यवर



कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत करताना
मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर व समवेत इतर मान्यवर



कार्यशाळेमध्ये प्रमुख पाहुण्या समवेत
मा.प्राचार्य, सहकारी प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी



विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका
अविद्येने केले !

महात्मा जोतिबा फुले

## विभागीय संपादक

- प्रा.व्ही.बी.नागपूरे
- डॉ.एस.बी.सय्यद
- प्रा.वाय.व्ही.चंद्रात्रे

# रयत गीत

रयतेमधूनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे,
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे...

कर्मवीरांचे ज्ञानपीठ हे शक्तीपीठ ठरते आहे,
शाहू-फुल्यांचे समानतेचे तत्व मानसी मुरते आहे,
धर्म जातीच्या पार गांधीचे मूल्य मानवी जपतो आहे...

गरीबांसाठी लेणी मोडून, लक्ष्मीवहिनी ठरली आई,
'कमवा आणि शिका' मंत्र हा तरुणाईला प्रेरक होई,
स्वावलंबी वृत्ती ठेऊनी, ज्ञानसाधना करतो आहे...

दिन-दलितांसाठी आण्णा तूमची झिजली चंदन काया,
अनाथ जीवा सदा लाभली मातृहृदयी तुमची माया,
शून्यामधल्या नवसृष्टीचा निर्मिक तोही ठरतो आहे...

जीवनातला तिमीर जावा, प्रबोधनाची पहाट व्हावी,
इथे लाभले पंख लेवूनी उंच भरारी नभात घ्यावी,
प्रतिभाशाली बहुजनांचा वेलू गगनी चढतो आहे,
रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे...

कवी- विठ्ठल वाघ

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | जाणता राजा! | कु.वाडकर वैष्णवी (एम.कॉम-१) | १३ |
| २ | क्रांतीज्योती | दिनेश पवार (एम.कॉम-१) | १५ |
| ३ | कर्मवीर भाऊराव पाटील | कु.गायकवाड प्रियंका (एफ.वाय.बी.कॉम) | १६ |
| ४ | आयुष्याची डायरी | कु.घोरपडे मयुरी (एम.कॉम -१) | १७ |
| ५ | शरद जोशी- शेतीविषयी योगदान | कु.आसने महेश (एफ.वाय.बी.कॉम) | १८ |
| ६ | नशीब | गिरणारे सागर (टी.वाय.बी.कॉम) | २० |
| ७ | संजय मेहरोत्रा : एक भारतीय तंत्रज्ञ | कु.झावरे श्वेता (टी.वाय.बी.बी.ए.सी.ए) | २१ |
| ७ | डब्ल्यूडब्लयूडब्लयू चे जनक<br>सर टिम बर्नर्स ली | सिन्नरकर कृष्णा (एफ.वाय.बी.बी.ए.सी.ए) | २२ |
| ८ | समाजसेवक बाबा आमटे | कु.भालेराव कल्याणी (एम.कॉम-१) | २४ |
| ९ | आई बाबा | कु.लांडे आश्विनी (टी.वाय.बी.कॉम) | २५ |
| १० | क्रांतीसूर्य ज्योतीराव फुले | कु.आढाव निशा (एम.कॉम-१) | २६ |
| ११ | आई | गिरी प्रविण (टी.वाय.बी.कॉम) | २७ |
| १२ | अनाथांची माई-सिंधुताई सपकाळ | कु.झिंजुर्टे पूजा (एम.कॉम-१) | २८ |
| १३ | ती ही असतात माणसं | कु.तुपे आश्विनी (टी.वाय.बी.कॉम -१) | ३० |
| १४ | आनंदी गोपाळ जोशी | कु.ढोकचौळे स्नेहल अनिल (एम.कॉम-१) | ३१ |
| १५ | भारतीय स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या<br>सावित्रीबाई फुले | कु.पटारे गौरी अनिल (एम.कॉम-१) | ३३ |
| १६ | जीवनात नाती | कु.तुपे आश्विनी (टी.वाय.बी.कॉम) | ३४ |
| १६ | धीरुभाई अंबानी | कु.औताडे ऋतुजा (एम.कॉम-१) | ३५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | धीरुभाई अंबानी | कु.औताडे ऋतुजा (एम.कॉम-१) | ३५ |
| १८ | तहान | कु.परदेशी त्रिवेणी (एम.कॉम -१) | ३७ |
| १९ | राणी लक्ष्मीबाई | कु.पटारे सुष्मा (एम.कॉम-१) | ३८ |
| २० | स्वामी विवेकानंद | कु.बोंबले गायत्री (एस.वाय.बी.कॉम) | ४० |
| २१ | फक्त तू खचू नकोस | कु.त्रिवेणी परदेशी (एम.कॉम -१) | ४१ |
| २२ | राजमाता जिजाऊ !! | कु.शेजुळ वैष्णवी (एफ.वाय.बी.कॉम) | ४२ |
| २३ | सुभाषचंद्र भोस | पवार दिनेश (टी.वाय.बी.कॉम) | ४४ |
| २४ | मुलगी | कु.कुऱ्हे पूजा (एम.कॉम -१) | ४६ |
| २५ | यशस्वी महिला व्यवस्थापक : चंदा कोचर | कु.सोनार पल्लवी (एफ.वाय.बी.कॉम) | ४७ |
| २६ | सावरकर विचार | विधाटे स्नेहल (एफ.वाय.बी.कॉम) | ४९ |
| २७ | मुलगी | गिरणारे सागर (टी.वाय.बी.कॉम) | ५१ |
| २८ | उरले फक्त सांगण्यापुरते गाव | कु.कुऱ्हे पूजा (एम.कॉम -१) | ५१ |
| २९ | आजचा तरुण कसा असावा | कु. तुपे आश्विनी (टी.वाय.बी.कॉम) | ५२ |
| ३० | ABDUL KALAM | Miss. Dhage Gauri (S.Y.B.Com) | ५३ |
| ३१ | ती ही असतात माणसं | कु.तुपे आश्विनी (टी.वाय.बी.कॉम ) | ५५ |
| ३२ | अपयश यशाची पायरी | गिरणार सागर (टी.वाय.बी.कॉम) | ५६ |
| ३३ | आठवणींच्या उंबरात | कु.विधाटे स्नेहल (एफ.वाय.बी.कॉम) | ५६ |

# जाणता राजा!

कु.वाडकर वैष्णवी (एम.कॉम-१)



यशवंत, कीर्तिवंत !
सामर्थ्यवंत वरदवंत !
पुण्यवंत नीतिवंत,
जाणता राजा !!!

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनच एवढे भव्य आहे की, ज्यांचे एवढे अवलोकन करावे तेवढे थोडेच. ते एकाच वेळी स्वातंत्र्य योध्दे, सेनापती, कुशल संघटक, स्फूर्तिदाते, युगपुरुष होते. त्यांच्या कुठल्याही गुणाला त्यांच्या काळातच नव्हे, तर आताच्याही कित्येक शतकांत तोड नाही. असा हा राजा केवळ पुण्यवंत राजाच नव्हता, तर तो आदर्श नीतीवंत राजा होता.

निश्चयाचा महामेरु !
बहुत जनासी आधारु !
अखंड स्थितीचा निर्धारु !
श्रीमंत योगी !

अशा शब्दात या जाणत्या राजाचे वर्णन समर्थांनी केले आहे. शिवाजी महाराज श्रीमंत तर होतेच; पण योगीही होते. दक्षता, कणखरता आणि तत्परता असा स्थायीभाव असलेल्या शिवछपतींच्या शब्दकोशात आळस नव्हता, उत्साह होता, चंचलता नव्हती, निग्रह होता, मोह नव्हता, ममता होती, भोगवाद नव्हता, त्यागवाद होता, अष्टपैलू, अष्टवधान जागृत, आदर्श राज्यकर्ता, थोर सेनानी, लोकहितदक्ष, धर्माभिमानी; पण परधर्मसहिष्णु, चारित्र्य संपन्न असा हा जाणता राजा होता. जगातील थोर पराक्रमी आणि मुत्सदी राजांची यादी जर समोर धरली तर छत्रपती शिवाजी महाराजांची बरोबरी करणारा राजा सापडणे दुर्मिळ आहे. नेपोलियन बोनापार्ट, ज्युलियस, सिकंदर किंवा दुसरे कोणतेही नृपती उदाहरणार्थ घेतले तरी प्रत्येक नृपती पेक्षा छत्रपती शिवाजी महाराज कंकणभर अधिक आहेत हे शतप्रतिशत कबुल करावेच लागते. छत्रपती शिवाजी महाराज आपले आहेत, म्हणून त्यांना श्रेष्ठ ठरवायचे नसून ते एक ऐतिहासिक सत्य आहे. सर्व नृपती मालिकेत छत्रपती शिवाजी महाराजांना अग्रस्थान मिळण्याचे पहिले कारण असे आहे की, त्यांची नीतीमत्ता बलवत्तर होती. मोगल सत्तेने जिकडे तिकडे आपला अंमल बसवला होता व स्त्रियांची अब्रू लुटण्याचा प्रसंग केव्हा येईल, याचा नेम नव्हता अशा धामधुमीच्या काळामध्ये महाराजांचा जन्म झाला होता. राजांनी हे चित्र स्वराज्यात संपूर्ण बदलून टाकले होते.

महाराजांच्या युध्दनीतीचा गनिमाकावा तंत्र गनिमी काव्याच्या तंत्राचा आत्मा होता. वेग, तुफान वेग आणि त्यात हत्ती आणि संथ गती बसत नव्हती म्हणून महाराजांनी युद्धात हत्ती वापरले नाहीत. सर्व आलमदुनिया त्यावेळी हत्ती हे प्रमुख साधन वापरत असतांना महाराजांनी नवीन वाट चोखाळली. हत्ती हा प्राणी आणि त्याच्या चाली महाराजांनी गनिमीकावा या युध्दपध्दतीतून वगळून टाकल्या हेच ते महाराजांचे वेगळेपण "जे जगाने केले ते महाराजांनी कधीच केले नाही अन जे महाराजांनी केले ते जगाला कधीच करता आले नाही" म्हणून जगाला महारांजासमोर कायम वाकावे लागते.

महाराजांचे जीवन हेच मुळी साहस, रणकौशल्य आणि राजकारणपटुता यांच्या त्रिवेणी संगमवर उभे राहिले होते. छत्रसालासारख्या तरुणाने

महाराजांचा आदर्श घेऊन दूर बुंधेलखंडात राज्याची उभारणी केली होती.

सर यदुनाथ सरकारांच्या मते, कृषकवर्ग (कुणबी) शिवाजी महाराजांच्या लष्काराच्या पाठीचा कणा होता. लष्कारात कुणबी, मराठे, ब्राम्हण, प्रभु, शेणवी, मुसलमान, न्हावी, महार कोळी, भंडारी, रामेशी, धनगर, आगरी वगैरे ५६ जातीचे लोक होते. शिवरायांचे सैन्य राष्ट्रीय होते. केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर भारतातील सर्व जातीतील गुणवंताना शिवरायांच्या सैन्यात प्रवेश मिळे. माणसांची पारख करुनच त्यांचा सैन्यात समावेश केला जाई. शिवराय सवडीच्या वेळी सर्व सैनिकांची स्वत: व्यक्तिगत तपासणी करायचे. सैनिकांना नियमति वेतन व कामगिरीनुसार बक्षिसे, बढत्याही देत. पण कडक शिस्त ठेवण्यास ही ते विसरले नाहीत. त्यांनी निष्टावंत सैनिक निर्माण केले. त्यांच्या सैन्यात स्वराज्याचे कार्य अभिप्रेत होते. आपल्या स्वत:च्या राज्यासाठी आपण हे लढाईचे कार्य करीत आहोत. ही त्यांच्यात भावना होती. त्यामुळे शिवरायांनी घालून दिलेल्या सवयी व आदर्श त्यांच्यात भिनले होते.

आज महाराजांचे नाव वापरुन राजकारण करणाऱ्यांची संख्या कमी नाही. सत्ता व मतांच्या राजकारणासाठी शिवाजी महाराज फक्त आमचेच आहेत, अशी जणू स्पर्धाच लागलेली असते. वाईट एकाच गोष्टीचे वाटते की, छत्रपतीच्या नावांचा जयघोष करणाऱ्यांचा महाराष्ट्रात सुकाळ आहे, पण त्यांच्या विचारांना कृतीत आणणाऱ्या लोकांचा दुष्काळ आहे. आपण शिवचरित्रातून महाराजांच्या गुणांना किती आत्मसात केले आहे? महाराज संपुर्णत: निर्व्यसनी होते. आज आपले पुढारी राज्यकर्ते निव्यसनी आहेत का? त्यांनी आखून दिलेली जीनपध्दती, राबवलेली राज्यपध्दती, यांचा मात्र सापेक्ष विसर पडलेला आहे. ज्या शिवरायांनी महाराष्ट्रासाठी जीवन ऊर्जा समर्पित केली, त्यांचे जीवनचरित्र चौकटीत बंदिस्त करण्यापेक्षा त्यांच्या चरित्रावर प्राणप्रतिष्ठा करायला हवी. त्यांचे आचार-विचार अंगीकारणे हेच आपल्यासाठी खऱ्या अथार्न उत्सव ठरणार आहेत.

कोणास कधी जहागिरी, आगर जमिनी तोडून न देणारे, न्यायाच्या कामात कोणाची भीडमुर्वत न धरणारे, दृष्टांचा काळ, पण गरीबांचा कनवाळू, एकंदर रयतेस पोटच्या मुलांप्रमाणे वागवणारे, सदैव सावध व उद्योगी नेहमी मातेच्या वचनात राहून अहर्निश राष्ट्राची चिंता वाहणारे, स्वदेश, स्वभाव व स्वधर्म या विविध संपत्तीचे संगोपन करणारे, पापभीरु परंतु रणशुर, असे हे आधुनिक काळाचे अद्वितीय स्वराज्य संस्थापक , छत्रपती शिवाजी महाराज श्रेष्ठ राजे आहेत.

शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष मोठ्या अभिमानाने आपण करतो. त्यांच्या कर्तृत्वाचा आणि रोमांचित आठवठींचा जयजयकार करतो. जसा शिवजयंती उत्सव जवळ येत जातो. .तसा तसे आपले ''डी.पी.'' बदलायला लागतात. शिवजयंतीचा दिवस मावळायला लागतो आणि मागे मात्र अंधार उरतो. उत्सवी सोहळे साजरे करण्यापुरतेच शिवरायांना आपण सिमीत ठेवणार आहोत का ? याचा विचार करण्याची आता नितांत गरज आहे. कदाचित यातूनच आचार-विचारांचा उष:काल निर्माण होईल , हीच अपेक्षा.

मराठी मुलं जरासं जाणतं झालं की आधी शिवाजी महाराजांचे चित्र ओळखायला, काढायला शिकते. राजांच्या गोष्टी, त्यांचे पराक्रम महाराष्ट्राच्या हवेवर सतत दरवळत राहतात. या मातीत शिवबांचे प्रेम रुजवावे लागतंच नाही, पाऊस पडल्यावर ज्या सहजतेने हिरवळ फुटून येते, त्याच सहजनेने शिवरायांचा अभिमान मराठी मनात उमलून येतो.
सह्याद्रीच्या कुशीतून एक हिरा चमकला भगवा टिळा चंदनाचा शिवनेरीवर प्रगटला हातात घेऊनी तलवार शंत्रूवर गरजला महाराष्ट्रात असा एकच शिवाजी राजा होऊन गेला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी बालपणी, तरुणपणी, शारीरिक सामर्थ्य वाढवण्यासाठी स्वत: कष्ट घेतले. पराक्रमासाठी शस्त्रांचा अभ्यास केला. साध्या, भोळ्या मावळ्यांचे संघटन करुन त्यांच्यामध्ये निष्ठा व ध्येयवाद जागृत केला.
स्वत: शपथ घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापनेचा कार्यात स्वत:ला घट्टपणे बांधून घेतले. महत्त्वाचे गड-किल्ले जिंकले, नवे निर्माण केले. योग्य त्या वेळी आक्रमण किंवा गरज पडेल त्यावेळी तह ते सूत्र कमालीच्या हुशारीने वापरुन अनेक शत्रुंना नामोहरम केले. फितुरी, दगाबाजी, स्वराज्यांतंगत कलहाचाही सामना केला. सामान्य रयतेची व्यवस्था, शेतकऱ्यांची व्यवस्था, लढवय्या शूर सरदारांची व्यवस्था धार्मिक स्थानांची व्यवस्था. अशा अनेक व्यवस्था लावून दिल्या. महत्त्वाचे म्हणजे छत्रपतींनी अष्टप्रधान मंडळाची स्थापना करुन हिंदवी स्वराज्याच्या राज्यकारभाराची परिपूर्ण व्यवस्था निर्माण केली.
राजभाषा विकसित करण्याचा गांभीर्यपूर्वक प्रयत्न केला. विविध कलांना राजाश्रय दिला. तसेच खचलेल्या, पिचलेल्या रयतेच्या मनामध्ये स्वाभिमानाचा, पराक्रमाचा, स्वराज्य निष्ठेचा हुकार जागृत केला.

या सर्व गोष्टी त्यांनी साध्य केल्या अवघ्या ५२ वर्षाच्या आयुष्यात !

मराठी शान
आमची मान
शिवजींची अशीही ही जान
जिजाऊचा हा लाल
शत्रांचा काल
मराठ्यांची एकमेव ही ढाल
ज्यांच्या शौर्याची
महाराजांची किर्ती महान
चाले जसा तूफान
महाराष्ट्राची ही शान
शिवाजी महाराजांना
मानाचा मुजरा

महाराजांकडून काही घ्यायचं असल्यास मोठी स्वप्न पाहण्याची ताकद आणि ती स्वप्न सत्यात उतरवण्याची हिंम्मत घ्यावी. म्हणूनच, शिवरायांच स्मरण करुन एका नव्या कल्याणकारी समाजाचे मोठे स्वप्न पाहायला काय हरकत आहे ?
शिवरांयापूर्वी अनेक राजे होऊन गेले, शिवरायानंतरही अनेक राजे उदयास आले पण सर्वात आदर्श राजा म्हणून ओळखतात ते फक्त शिवछत्रपतीनांच !

******

## क्रांतीज्योती

दिनेश पवार( टी.वाय.बी.कॉम)

हटविला हा अज्ञानाचा काळोख
घेतला शिक्षणाचा वसा,
माता सावित्री अन म.ज्योतिबांच्या
आदर्श आहे असा.

अनिष्ट रूढी परंपरा जोखडातून
स्त्री ची तोडली ती बेडी,
विरोध करुन केशवपणाला
माऊली स्त्रीयांची कैवारी ||

बहुजनांचे जीवन
उजळवण्या जन्मल्या क्रांतिजोति
साक्षर करण्या सर्वांना
जन्मल्या या महान विभूती||


समाजप्रबोधनाची कवाड उघडली
स्त्री मुक्तीसाठी माई लढली,
काव्य शैलीतुनी व्यथा मांडली
आजची स्त्री साक्षर घडली ||

समाज जागृत करण्या
तेजसूर्य क्रांतीज्योती
त्यांच्या महान कार्यास
सारे आम्ही शतदा वंदन करती||

******

# कर्मवीर भाऊराव पाटील

कु.गायकवाड प्रियंका (एफ.वाय.बी.कॉम)



ना त्वह्म कामच राज्यम,
न स्वर्गम् न पुर्णभवम्,
कामये दु:ख तप्ताना,
प्राणिनाम अविद्यानाशनम्।

मला राज्य उपभोगाची इच्छा नाही. स्वर्ग आणि मोक्ष भावनाही मला नाही. माझी फक्त एवढीच इच्छा आहे की, मानवाची निरक्षरता नाहीसे करण्याचे काम माझ्याकडून अखेरपर्यंत घडत रहावे, अशी इच्छा व्यक्त करणारे आणि महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या आयुष्याला हातभार लावणारे अर्थातच डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षण तज्ञ आहे.

ज्ञानाचा दिवा भारतीयांच्या मनामध्ये चितवणारा, इथल्या मना-मनामध्ये स्वाभिमान फुलवणारा, देव दगडात नसतो तर माणसात असतो हे हेरुन इथल्या माणसांमध्ये माणुसकी पेरणारा लोकमहर्षी, शिक्षणमहर्षी म्हणजे डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील होय. महाराष्ट्र हा दगडधोंड्याच्या अंजन-कांचन कडकपारींचा देश आहे. भले रत्नांच्या खाणी या मातीत नसतील पण पृथ्वी मोलाची लाख नवरत्न या मातीतच जन्माला आली आणि त्यापैकी एक म्हणजे डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील होय. २२ सप्टेंबर १८८७ रोजी कुंभोज गावी गंगामातेच्या पोटी या महामानवाचा जन्म झाला. म्हणतात ना एखाद्याच्या आयुष्यामध्ये एखादा असा क्षण येतो, की त्याक्षणी संपूर्ण आयुष्याच बदलून जातं आणि तो खरा त्याक्षणी कसोटीचा क्षण असतो.

"विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्यतेने केले."

असे महात्मा फुले म्हणतात.

अविद्यने अनर्थ होतात. म्हणून अण्णांना ही अविद्या नष्ट करुन समाजाला नीती, मती व गती द्यावयाची होती. सर्व सामन्य बहुजन समाजामध्ये शिक्षणाची गंगोत्री पोहचवून त्यांना आर्थिक आणि समाजामध्ये उंच मानावर करुन जगता यावे हा भाऊरावांचा उद्देश होता. कर्मवीर भाऊराव पाटीलांचे मुल्य शिक्षण देत होते. लोकशाहीचा मूळ गाभा लोकशिक्षण आहे. हे त्यांना ज्ञात होते. म्हणून अणवानी पायांनी महाराष्ट्रभर वणवण करुन अवघा महाराष्ट्र पालथा घातला. शिक्षणाची गंगोत्री बहुजणांच्या झोपडी-झोपडीत आणि खोपडी-खोपडी पर्यंत पोहण्याचं कार्य केल.

" ज्याच्या हाती पेन्सीलपाटी,
तो यशोमंदिर गाठी,
ज्याच्या हाती पैसाची पाटी
दैन्य लागी त्यांच्या पाठी !"

कर्मवीर अण्णांच्या महाराष्ट्रामध्ये शिक्षण व्यवस्थेच चित्र काय दिसत तर शिक्षणाचा संबंध पदव्यांशी, पदव्यांचा संबंध नोकरीशी, नोकरीचा संबंध चकरीशी, चाकरीचा संबंध छोकरीशी, संबंध भाकरीशी आणि पुन्हा त्या भाकरीचा संबंध नोकरीशी जोडत आजची आपली शिक्षण व्यवस्था कुठेतरी सातत्याने भरकटताना दिसते आणि अशा भरकटलेल्या शिक्षण व्यवस्थेला कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार एखाद्या दीपस्तंभासारखे वाटू लागतात.

अण्णांनी ज्ञानाच आणि समतेच एक बीज रोवलं. त्यातून शिक्षणाचा वटवृक्ष तयार केला. महाकाय वटवृक्ष तयार झाला. तो रयत शिक्षण संस्थेचा अण्णांच्या अथक परिश्रमातून एवढी मोठी रयत शिक्षण संस्था उभी राहिली आहे. तेथे लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहे ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक दृष्ट्या परिस्थिती भक्कम नसली तर भाऊरावांनी 'कमवा आणि शिकवा' या योजनेतून शिक्षण घेत आहेत.

शिक्षण भगीरथ डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खडतर परिश्रमातून रयत शिक्षण संस्था उभारणी केली. यत्न तो देव जाणावा असा उपदेश समर्थ रामदासांनी केला आहे. जीवनात प्रयत्नाशिवाय कोणतेही गोष्ट साध्य होत नाही. विद्यार्थ्याला अभ्यासाशिवाय यश नाही. भक्ताला साधनाशिवाय साक्षात्कार नाही आणि दगडाला टाकीचे घाव सोशल्याशिवाय देवपण नाही. त्यासाठी केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे.

"श्री भाऊराव पाटील की सेवाही
उनका सच्चा उनका सच्चा
कीर्ती स्तंभ है ।
फिर भी छात्रोंने जो प्रवृत्ति की है।
वह उनके लिये तो स्तुत्य है ।
श्री भाऊराव दीर्घकाल तक सेवा करते रहे। "

–महात्मा गांधी

## आयुष्याची डायरी

कु.घोरपडे मयुरी एम.कॉम -१

आठवते त्या आठवणी....
ते क्षण... त्या भावना
असे सर्व काही ती डायरी....

विझले ते सर्व ... ओल्या अश्रूंनी
उरली ती आता केवळ गळकी पाने...
नावास एक डायरी... पुस्तक...आयुष्याचे !
पानं भरली सुख-दुःखाची,
आठवणीच्या चेहऱ्यांची..

काही पानं कोरीच राहून गेली...
आणि काळासकट...
ती ही मग गळून गेली....
पाने उलटता उलटता..
उमटतात ठसे कागदांवर त्या...
जिथे होती ती नांव...
तेही मग पुसली गेलेली.....

आयुष्याचे पुस्तक... एक साधी डायरी
गळक्या पानांचे पुस्तक नाही
असे फक्त शिल्लक रद्दी....
असे एक गळके पान आयुष्यातले
आठवणीसकट गळून गेलं....
पुन्हा नाही मागचं पान पलटू शकलं...
अन्पुढे आयुष्य चालतच गेलं.......

*****

# शरद जोशी- शेतीविषयी योगदान



कु.आसने महेश (एफ.वाय.बी.कॉम)

शेतकरी संघटनेचे नेते शरद अनंत जोशी यांचा जन्म ३ सप्टेंबर १९३५ ला सातारा जिल्ह्यात झाला व मृत्यू १२ डिसेंबर २०१५ रोजी पुणे या ठिकाणी झाला. शरद जोशी हे महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीतील महत्त्वाचे नेते म्हणून ओळखले जात. त्यांनी जे शेतकरी संघटनेचे नेतृत्व केले. याला अनेक अर्थाने ऐतिहासिक महत्त्व आहे. विविध आंदोलने करुन शेतकऱ्यांच्या मागण्या पुढे करणे एवढेच शरद जोशी यांचे योगदान नाही, तर शेतकऱ्यांच्या आंदोलनाला वैचारिक भूमिका आणि ती जाहिरपणे मांडणे हे तर फक्त महाराष्ट्रात झाले असे नाही, तर या सैध्दांतिक अधिष्ठानाचा वापर देशभरातील संघटनांनीही घेतला.

जोशी यांनी शेतकरी संघटनेचे जे नेतृत्व केले, याचा अनेक अर्थाने ऐतिहासिक महत्व आहे. ते महत्व या अर्थाने की, शेतकरी, कष्टकरी हा बहुजन समाजातील शेतकऱ्यांचे नेतृत्व तेही उच्चवर्णीय ब्राम्हणाकडे हे प्रथम लोकमान्य टिळकांनी केले. त्यांच्या काळात केले. सन १८९७ मध्ये दुष्काळी परिस्थिती होती. त्या वेळेला शेतसारा भरु नये अशी चळवळ लोकमान्यांनी केली होती, मात्र एक दोन संशोधने वगळता त्यांच्या या कार्याची दखल फारशी घेतली गेली नाही. ताईमहाराज प्रकरण, वेदोक्त प्रकरण वगैरेमुळे टिळकांचे राजकारण, वेगळ्या दिशेने गेले आणि त्यांनी केलेली शेतकऱ्यांची चळवळ काळाच्या पडद्याआड गेली.

शेतकरी संघटित करण्यात शरद जोशी यांनी जशी आंदोलनतंत्रे वापरले, तशा काही लोकांना रंजनात्मक (पॉपीलिस्ट) अशा घोषणाही त्यांनी तयार केल्या.

शेतकरी तितुका मेळवावा,
भीक नको हवे घामाचे दाम,
पंढरपूरच्या विठोबाला साकड घालूया ,

अशा लोकानुरंजनाचा लाभ शेतकरी संघटित करण्यात आणि लाखोंच्या संख्येने संमेलने भरवण्यात आले, हे नि:संशय शेतकरी संघटनेच्या महिला आघाडी हे तर त्यांचे विशेष योगदान मानता येईल. सन १९८६ मध्ये चांदवड येथील पहिल्या महिला अधिवेशनाला दोन लाख संख्येच्या वर स्त्रिया स्वखर्चाने व दोन दिवस पुरतील एवढ्या दशम्या घेऊन आल्या होत्या. महिला आघाडीच्या या कार्यक्रमाची माहिती "चांदवडची शिदोरी" या नावाने पन्नास पानी एका पुस्तीकेत अतिशय सुलभपणे वर्णन केले आहे. या सारखे अनेक घटना शरद जोशी यांच्या कारकिर्दित घडून गेल्या आहेत.

आजच्या काळात म्हतारी होत जाणारी शेती आणि शेतकरी. यात वेगाने वाढणारी लोकसंख्या व शेतकऱ्यांची संख्या कमी-कमी होताना दिसते. त्याचा परिणाम अन्नधान्य उत्पादनावरही होत आहे. शेतमालाला न मिळणारा बाजारभाव आणि बियाणे खते-मजुरी यांचे वाढलेले दर आणि सरकारची शेतीप्रती असणारी उदासिनता हे प्रश्न जागतिक पातळीवरचे आहेत. जगभरातील शेतकऱ्यांची कमी अधिक प्रमाणात अशीच अवस्था आहे. रोज शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या पाहता त्याच्याविषयीची संवेदना बोथट झालेली दिसते. सरकारच्या धोरणामुळे शेती व शेतीमालाविषयी बोटचिपी भूमिका कायम आहे.

देशात ग्रामीण भागात मतदारांचे प्रमाण कमी होताना दिसते. त्यामुळे शहरी मध्यमवर्गीय मतदारांचा समतोल राखण्यासाठी शेतमालाचे भाव सरकार वाढवत नाही. शिवाय शरद जोशी यांच्या काळातील शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा व आजचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा यात खूप फरक दिसत आहे.

शरद जोशी यांची शेतीविषयाची कारकिर्द आणि उपलब्धी :

१)शेतकरी संघटनेची स्थापना (१९७९) ९ ऑगस्ट १९७८ रोजी चाकण येथे संघटनेच्या कार्यालयाचा शुभारंभ.

२)देशभरातील शेतकऱ्यांच्या अ-राजकीय संघटनांच्या समन्वय समितीची स्थापना (३१ ऑक्टोंबर १९८२).

३)चांदवड येथे ९-१० नोव्हेंबर १९८६ रोजी अभूतपूर्व शेतकरी महिला अधिवेशन. अधिवेशनाला सुमारे दोन लाख महिलांची उपस्थिती

४)शेतकरी महिला आघाडीची स्थापना

५)लक्ष्मीमुक्त अभियानाद्वारे स्त्रियांच्या नावे शेती करण्याचे, शेतकरी पुरुषांना आवाहन (१९८९) प्रतिसादस्वरुप (१९९१) पर्यंत लाखांवर स्त्रियांची नावे सातबारा उताऱ्यावर नोंदविली गेली.

६)दारू दुकानबंदी आंदोलन

७)१९७९ पासून शेतमालास रास्त भाव या एककलमी कार्यक्रमासाठी कांदा, ऊस, तंबाखू, मका , कापूस इ.पिके पिकवणाऱ्या व दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यासाठी त्यावर वारंवार उपोषणे, तुरुंगवास, मेळावे, प्रशिक्षण शिबिरे, अधिवेशने वगैरे शरद जोशी यांच्या कारकिर्दित घडून गेले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी झटणारे नेते शरद जोशी यांचे निधन वयाच्या ८१ व्या वर्षी झाले. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी झटत असणारे नेते पुण्यातील राहत्या घरी त्यांनी सकाळी ९ वाजता अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसापासून त्यांची प्रकृती खालावलेली होती . शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढणारे झुंझार नेते म्हणून शरद जोशी यांची ओळख होती. ३ सप्टेंबर १९३५ प्राथमिक शिक्षण बेळगावला झाले, तर मुंबईतील सिडनहॅम कॉलेजमध्ये त्यांनी सी.रॅडी सुवर्णपदकाने गौरवण्यात आले. १९७९ मध्ये त्यांनी शेतकरी संघटनेची स्थापना केली आणि तेव्हापासून शेतमालास रास्त भाव या एककलमी कार्यक्रमासाठी कांदा, ऊस, तंबाखू, दूध, भात, कापुस इत्यादी पिकांच्या शेतकरी आंदोलनाचे नेतृत्व केले. शरद जोशींचे सर्वात मोठे यश म्हणजे शेतकरी तितका मेळवावा हा एक नारा देऊन त्यांनी शेतकरी समाजाला जात, धर्म, प्रांत, भाषा हे भेद विसरायला शिकवल होत. १९८० साली नाशकात कांदा आणि ऊस दरप्रश्नी शेतकरी संघटनेला घेऊन ते रस्त्यावर पोहोचले.

शरद जोशी हे २००४ ते २०१० या काळात राज्यसभेचे सदस्य होते. शेतकऱ्यांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला असून, शेतकरी चळवळीत त्यांचे मोठे योगदान आहे.

शेतकऱ्यांचे प्रश्न हिरीरिने मांडणारा चळवळीतील कार्यकर्ता, शेती अर्थव्यवस्थेतील जागतिक व्यासपीठावर मार्गदर्शन करणारा आणि चळवळीतील माध्यमाद्वारे शेतकऱ्यांच्या ह्रदयात अढळस्थान निर्माण करणारा नेता, श्री शरदजी जोशी यांच्या निधनाने आपण गमावला आहे. शेतकऱ्यांना उत्तम बाजारपेठ मिळाली आणि नवनिर्माण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक समृद्ध व्हावी. यासाठी त्यांचे समर्पित जीवन आणि संघर्ष कायम स्मरणात राहील. खासदार राजू शेट्टी म्हणतात की, मी आज जी आहे ,तो शरद जोशींमुळं. साखरसम्राटांच्या नजरेला नजर भिडवण्याचे सामर्थ्य त्यांच्यामुळेच आले आहे.

शेकऱ्यांचे युगप्रवर्तक आंदोलक नेते शरद जोशी यांनी शेतीविषयाची अर्थशास्त्राशी झांगड घालून शेतीला मुक्तीच्यामार्गावर नेणारे लेखन

करुन मराठी साहित्य विश्व समृद्ध केलेले आहे. पिढोनपिढ्या अडगळीत पडलेल्या शेतीविषयाला त्यांनी आपल्या कृतिशील आंदोलनासोबतच निर्विवाद वैचारिक लेखनीची साथ देऊन वैश्विक क्षितीजावर स्थापित केले आहे. त्यांच्या लेखनीने निद्रिस्त जनमानसाला केवळ जगविण्याचे नव्हे तर त्याला मूठ आवळून ताठ मानेने जगायला शिकविले आहे. जगणे संपून सुखाच्या व सन्मानाच्या ध्येयप्राप्तीसाठी जीवाची बाजी लावून झुंजणारे लढव्यये पाईक लाखांच्या संख्येने गावागावात निर्माण केले, ही त्यांच्या लेखनीची किमया आहे. मराठी साहित्यातील त्यांचे योगदान अनमोल असल्याने या पहिल्या शेतकरी संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले. त्यांनी लिहिलेल्या मराठी ग्रंथसंपदा पुढीलप्रमाणे-

१) शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपध्दती
२)चांदवडची शिदोरी : स्त्रियांचा प्रश्न
३)शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख
४)स्वातंत्र्य का नासले ?
५)खुल्या व्यवस्थेकडे-खुल्या मनाने
६)माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो.
७)बळीचे राज्य येणार आहे.
८)अर्थ तो सांगतो पुन्हा
९) पोशिंद्याची लोकशाही
१०)राष्ट्रीय कृषीनिती

*****



## नशीब

गिरणारे सागर टी.वाय.बी.कॉम

जी माणसं हवीहवीशी वाटतात ।
ती माणसं भेटत नाहीत ।।

जी माणसं नकोशी वाटतात ।
त्यांचा सहवास संपत नाही ।।

ज्यांच्याकडे जावसं वाटतं ।
त्यांच्याकडे जायला जमत नाही ।।

ज्यांच्याकडे जावू नये असं वाटतं ।
त्यांच्याकडे जावचं लागतं ।।

जेव्हा जीवन नकोसं वाटतं ।
तेव्हा काळ संपत नाही ।।

जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळता ।
तेव्हा काळ संपलेला असतो ।।

नशीब हे असच असतं ।
त्याच्याशी जपूनच वागावं लागतं ।।

तिथं कुणाचचं काही चालत नाही ।
जिथं नेईल तिथं जावचं लागतं ।।

*****

# संजय मेहरोत्रा : एक भारतीय तंत्रज्ञ

कु.झावरे श्वेता ( टी.वाय.बी.बी.ए.सी.ए)



आपण गाडी मध्ये किंवा एफ.एम.ला पेनड्राईव्ह गाणे ऐकण्यासाठी जोडतो. आता स्मार्ट टी.व्ही.ला सुध्दा सिनेमा बघण्यासाठी पेनड्राईव्ह किंवा मेमरी कार्ड जोडतो. आपल्या मोबाईल मध्ये आपण मेमरी साठविण्यासाठी मेमरी कार्डचा उपयोग करतो.

जसे 4 GB, 8 GB, 16 GB, 32 GB, 64 GB, 128 GB व इतर, त्यामध्ये ट्रान्सकेन्ड, तोशिबा, सॅमसंग, सिमेन्स, सोनी व इतर नामांकित कंपन्याची नावे आहेत. पण या सगळ्यामध्ये कंपनीचे नाव पुढे आणण्यात, गुणवत्ता जपण्यात व सुधारणा वाढविण्यास सतत प्रयत्न करणारी व्यक्ती म्हणजे संजय मेहरोत्रा होय.

संजय मेहरोत्रा सॅनडिस्कचे सह-संस्थापक, कंपनीचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी होते. जानेवारी २०११ मध्ये त्यांची मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) या भूमिकेसाठी नियुक्त करण्यात आली होती. मेहरोत्रा यांनी सॅनडिस्कची सह स्थापना केली. २०११ पासून २०१६ पर्यंत अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केले. त्यांनी यापूर्वी कार्यकारी उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, अभियांत्रिकेचे वरिष्ठ उपाध्यक्ष, उत्पादन विकासाचे उपाध्यक्ष आणि मेमरी डिझाईन ॲण्ड प्रॉडक्ट इंजिनिअरींगचे संचालक म्हणून काम पाहिले.

मायक्रॉन येथील मुख्य कार्यकारी अधिकारी असताना मेहरोत्रा यांना सेमीकंडक्टर इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले होते . मेहरोत्रा यांनी त्यांचे प्रारंभिक शिक्षण दिल्ली येथील सरदार पटेल विद्यालय, लोधी रोड येथे पूर्ण केले. त्यांनी बी.आय.टी.एस. पिलानी येथे महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि त्यानंतर बर्कले येथील कॅलिफशेर्निया विद्यापीठात शिक्षण घेतले मेहरोत्रा यांनी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी आणि संगणक विज्ञान विषयातील पदवी आणि पदव्युत्तर पदवी घेतली. ते स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी ग्रॅज्युएट स्कूल ऑफ बिझनेसच्या एक्जिक्युटिव्ह एज्युकेशन प्रोग्रामचे २००९ मध्ये पदवीधर झाले. मेहरोत्राकडे ७० हून अधिक पेटंट्स आहेत. त्यांनी स्थिर मेमरी डिझाईन आणि फ्लॅश मेमरी सिस्टमच्या क्षेत्रात लेख प्रकाशित केले आहे. मेहरोत्रा यांनी १ मे २०१४ रोजी कॅलिफेर्निया विद्यापीठातील बर्कले येथील कॉलेज ऑफ इंजिनीअरींगच्या पदवीधरांना सुरूवातीचे भाषण केले. त्यांच्या भाषणामध्ये स्वत:बद्दल प्रवासाची माहिती दिली. ते कसे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी होण्यापासून ते फॉर्च्यून ५०० कंपनीच्या प्रमुखापर्यंत शिकले याबद्दल सांगितले. मेहरोत्रा यांच्या नेतृत्वात सॅनडिस्कची वार्षिक कमाई ६ अब्ज डॉलर्समध्ये विकली.

एक मोठा मेमरी निर्माता आघाडीवर असलेल्या दीर्घ अनुभवासह मेहरोत्रा मायक्रॉन येथे पदभार स्विकारण्याची सर्वात उच्च-पात्र उमेदवारांपैकी एक आहे. १८ एप्रिल २०१४ रोजी यूसी बर्कले येथील डीन आणि कार्लसन प्रोफेसर एस.शंकर शास्त्र यांच्यासह मेहरोत्रा यांनी कॅलिफशेर्निया, बर्कले येथील विद्यापीठातील सॅनडिस्क कंप्युटिंग लॅबची कॉलेज ऑफ इंजिनिअरींगची सुरूवात केली. सॅनडिस्कने अभियांत्रिकी महाविद्यालयाला १ डॉलर्स दशलक्ष (म्हणजे भारतातील ७,१४,९२,००० रुपये) देणगीने या प्रयोगशाळेस अर्थसहाय्य दिले. महाविद्यालयाच्या विद्युत अभियात्रिकी व संगणक विज्ञान विभागातील कोरी हॉलसाठी नुकत्याच पूर्ण झालेल्या नूतनीकरणास अनुदान देण्यात आले. अनेक भारतीयांपैकी ते जगामध्ये उच्च पदावर असल्याचा अभिान वाटतो.

*******

# डब्ल्यू.डब्लयू.डब्ल्यू चे जनक सर टिम बर्नर्स ली

सिन्नरकर कृष्णा ( एफ.वाय.बी.बी.ए.सी.ए)

डब्ल्यु.डब्लयू.डब्ल्यू म्हणजेच डब्ल्यू ३ किंवा वेब (WWW) हे इंटरनेटवरील असे स्थान आहे जेथे एखाद्या विशिष्ट विषयाशी संबधित असलेली माहिती, व्यक्ती किंवा इतर गोष्टी वेब पृष्ठाच्या रुपात एकमेकांशी जोडल्या जातात. जेव्हा आपण ब्राऊझरमध्ये संबधित माहिती शोधतो तेव्हा ही पृष्ठे(वेबपेजेस) आपल्या समोर उघडतात.

डब्ल्यू.डब्लयू.डब्ल्यूलाच सामान्यत: ऑनलाईन, वायलेस क्युनिकेशन किंवा बहुसंख्य लोक-इंटरनेट असे संबोधले जाते. तथापि इंटरनेट आणि डब्ल्यूडब्लयूडब्ल्यू मध्ये खूप फरक आहे. इंटरनेट ही प्रोटोकॉल सुटने परस्पर जोडलेली संगणक नेटवर्क्सची एक मोठी प्रणाली आहे आणि ते वर्ल्ड वाईड वेबच्या वापरास मदत करते. म्हणजेच डब्ल्यूडब्लयूडब्ल्यू हा इंटरनेटवर अवलंबून असलेला एक घटक आहे.

१९८९ मध्ये ३५ वर्षाचा एक मुलगा यूरोपियन ऑर्गनाइजेशन फॉर न्यूक्लिअर रिसर्च येथे फेलो रिसर्चर म्हणून काम करत होता. या संस्थेला सर्न नावाने ओळखले जाते. या संस्थेत तो मुलगा एका संगणकावरील माहिती दुसऱ्या संगणकावर पाठवण्याचे काम करायचा. याच दरम्यान त्याच्या मनात विचार आला की ज्यामुळे सर्व सूचना आणि माहिती एकाच जागी जमा होऊ शकेल.

हा विचार मनात आल्यावर त्याने १२ मार्च १९८९ रोजी (WWW) साठी इंफॉरमेशन मैनेजमेंट प्रपोजल या नावाने एक रिसर्च पेपर तयार केला. ज्यामध्ये त्याने हाइपरटेक्स्ट आणि इंटरनेट यांना एकमेकांशी जोडले आणि त्याचा परिणाम म्हणून पहिले वेब पेज ब्राऊजर जन्माला आले आणि त्यानंतर वर्ल्ड वाइड वेबचा जन्म झाला आणि यालाच (WWW) ची सुरुवात मानले गेले. त्यामुळे वेब पेज ब्राऊजर आणि वर्ल्ड वाइड वेबचा जन्मदाता म्हणून तो ओळखला जाऊ लागला. त्याचे नाव टिम बर्नर्स ली असे आहे.

संस्थेची कम्युनिकेशन स्स्टिम खूपच छान तयार झाली. परंतु टीमला वाटत होते की, याचा वापर संपूर्ण जगात केला जावा आणि आश्चर्याची बाब म्हणजे जागतिक नेटवर्कच्या त्याच्या कल्पनाची माहिती आणि तंत्रज्ञानाचा जगावर अभूतपूर्व परिणाम झाला आहे.

अशा प्रकारे डब्ल्यू.डब्लयू.डब्ल्यू (वर्ल्ड वाइड वेब) चा शोध सर टिम बर्नर्स ली या ब्रिटिश शास्त्रज्ञाने वयाच्या ३५ व्या वर्षी लावला. डब्ल्यूडब्लयूडब्ल्यू हे बेब पृष्ठे एकमेकांना जोडण्याचे तंत्र आहे. २० व्या शतकातील हा सर्वात क्रांतिकारी शोध आहे. त्यांनी प्रथम वेब क्लाइंट-सर्व्हर आणि सर्व्हर तयार केला. त्याला येत्या १२ मार्च २०२० मध्ये ३१ वर्ष पूर्ण होत आहेत.

मेरी ली वुडस् आणि कॉनवे बर्नर्स-ली या माता पित्याच्या पोटी ८ जून १९५५ रोजी लंडन येथे टीमचा जन्म झाला होता. १९६९ ते १९७३ दरम्यान त्यांनी शीन माऊंट प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले. पुढे टीम यांनी १९७३ मध्ये स्वन्स कॉलेज ऑफ ऑक्सफोर्डमध्ये शिक्षण घेतले. १९७६ मध्ये भौतिकशशस्त्रात प्रथम श्रेणी पदवी घेतली. ऑक्सफर्ड विद्यापीठामध्ये शिकत असताना टीमला मित्रासह हॅकिंग करताना पकडले गेले. त्यामुळे त्यांच्यावर कॉलेजचे संगणक वापरण्यावर बंदी घालण्यात आली. खरं तर ही घटना नकारात्मक वाटते. परंतु टिमनेही त्याचा स्वत:च्या मार्गाने फायदा करुन घेतला. दूरदर्शन मोटोररोला मायक्रोप्रोसेसर आणि सोल्डरिंग लोहोने त्याने स्वत:चा संगणक तयार केला.

टिम यांनी पहिल्या संकेतस्थळाची रचना केली आणि २० डिसेंबर १९९० रोजी जगातील पहिली वेबसाईट (NeXT) संगणकावर लाईव्ह केली. मागील वर्षी इंटरनेटला ३० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने वेब फाऊंडेशनचे संस्थापक असलेल्या सर टीमने एक पत्र प्रसिद्ध केले. यामध्ये त्यांनी इंटरनेटने

गगात कसे बदल घडवून आणले आहेत आणि मानवतेला सेवा देणारी एक उत्कृष्ट वेबसाईट तयार करण्यासाठी आपण काय केले पाहिजे हे सांगितले आहे.

या पत्रात ते म्हणतात, आज अर्धे जग ऑनलाईन झालेले असून आपण खूप दूर आलो आहोत . परंतु अद्याप किती अंतर बाकी आहे यावर विचार करण्याची संधी देखील आहे. वेब हा एक सार्वजनिक चौक असून त्यामध्ये लायब्ररी, डॉक्टरांचे कार्यालय, दुकान, शाळा, डिझाईन स्टुडिओ, कार्यालय, सिनेमा, बँक आणि बरेच काही उपलब्ध आहे. वेबने प्रत्येकासाठी संधी निर्माण केली आहे. दुर्लक्षित गटांना आवाज दिला आहे आणि आपले दैनंदिन जीवन सुलभ केले आहे. सर टीमने प्रसिद्ध केलेले पत्र साईट वर उपलब्ध आहे.

टीम बर्नर्स ली यांनी युरोपियन विभक्त संशोधन संघटना, स्वित्झलँड मध्ये नोकरी करीत असताना ब्राउझर संगणक प्रोग्राम लिहिले. त्यांनी एचटीएमएल, यूआरएल आणि एचटीटीपी या तीन तंत्रज्ञानाची मूलतत्त्वे लिहिली.

दि.६ ऑगस्ट १९९१ रोजी टिम बर्नर्स ली यांनी वर्ल्ड वाईड वेब प्रोजेक्टवर एक शोधपत्र प्रकाशित केले. इंटरनेटवर हा पहिला संवाद होता. १९९१ मध्ये वेब ब्राऊजर सीईआरएन सर्वांसाठी खुला करण्यात आल्यावर इतर संशोधन संस्थानांही यावर काम केले. अशा प्रकारे ६ ऑगस्ट रोजी इंटरनेटचा जन्म झाला. प्रथम वेबसाईट होती या बेवसाईटवर वर्ल्ड वेब संकल्पनेची संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. जिथून माहिती मिळवून कोणताही वापरकर्ता आपली वेबसाईट सुरु करु शकतो.

यानंतर टप्प्या-टप्प्याने आजच्या इंटरनेटचा पाया सुरु झाला. त्यानंतर बऱ्यास वेब कंपन्यांनी जन्म घेतला. ज्यात गुगल, अमेझॉन सारख्या कंपन्यांचा समावेश आहे.

अशा या वेबचे रक्षण करणे आवश्यक आहे टिम बर्नर्स ली यांना ठाऊक होते. म्हणूनच सार्वजनिक वेब आणि मूलभूत हक्क म्हणून ओपन वेबचे रक्षण करण्यासाठी त्यांनी २००९ मध्ये वर्ल्ड वाईड वेब फाऊंडेशनची स्थापना केली.

१९९४ मध्ये मॅमॅच्यूसेटस् इन्स्टिट्युट ऑफ टॅक्नॉलॉजी येथे टीमने वर्ल्ड वाइड वेब कन्सोटियम ची स्थापना केली वर्ल्ड वाइड वेबसाठी काम करणारी ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्था आहे. वेबच्या देखरेखीसाठी आणि त्याला पुढे नेण्यासाठी टिम बर्नर्स यांनी याची स्थापना केली आहे.

सर टीम यांना आतापर्यंत केलेल्या कामगिरीबद्दल अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यापैकी २०१३ मध्ये अभियांत्रिकीचा पहिला क्वीन एलिझाबेथ पुरस्कार आणि २००४ मध्ये नाईटहूडची पदवी त्यांना बहाल केली गेली. टीमला दहापेक्षा जास्त मानद डॉक्टरेट डिग्री देखील प्राप्त झाल्या आहेत. टाईम मासिकाच्या विसाव्या शतकातील महत्त्वाच्या लोकांच्या यादीमध्ये टिमचा देखील समावेश आहे.


तंत्रज्ञानाच्या जगात ब्रिटीश संगणक शतकात टिम यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

*****



# समाजसेवक बाबा आमटे

कु.भालेराव कल्याणी (एम.कॉम-१)



बाबा आमटेंनी महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात 'हेमलकसा' येथे लोकबिरादरी प्रकल्पाची स्थापना केली होती. या शिवाय ते स्थानिक आदिवासींच्या विकासासाठी आणि आरोग्याकरीता देखील कार्य करीत होते. विशेषत: बाबानी कुष्ठरोग्याकरता कार्य केले. त्यांच्याकरीता आनंदवनाची स्थापना केली. बाबाच्या निधनानंतर त्यांच्या पश्चात आज ही जबाबदारी डॉ.प्रकाश आणि त्यांचे दोन चिरंजीव अनिकेत व दिंगत फार चांगल्या प्रकारे सांभाळत आहेत.

प्रकाश आमटे आणि त्यांची पत्नी मंदाकिनी आमटे स्वत: डॉक्टर आहेत. हे दोघेही समाज सेवेची परंपरा जोपासत आणि पुढे नेत आदिवासींच्या सेवार्थ आपले पूर्ण लक्ष केंद्रित केले आहे.

पूर्वी जेव्हा डॉ.प्रकाश आणि त्यांची पत्नी मंदाकिनी हेमलकसा येथे वास्तव्याला आल्या. त्यावेळी दरवाजा नसलेली एक छोटी झोपडी वजा खोली त्यांनी बांधली आणि तेथे राहू लागले. तेव्हा तेथे वीज नव्हती आणि स्वत:चे असे काही खाजगी आयुष्य जगता येईल अशी देखील परिस्थिती नव्हती. माडिया गोंड आदिवासी सामुदायाकरीता या डॉक्टर दांपत्याने आरोग्याची आणि योग्य शिक्षण देण्याची जबाबदारी उचलली.

सुरुवातीला हे सर्व अशक्यप्राय आणि प्रचंड कठीण वाटावे असेच होते. पण पुढे पुढे त्यांच्यात राहून त्याचा विश्वास संपादन केल्यानंतर त्यांची सेवा करत करत आदिवासींच्या मनात विश्वास निर्माण केला.

गडचिरोली जिल्ह्यातील या 'हेमलकसा' येथे १९७५ साली स्वित्झरलँडच्या आर्थिक मदतीने एक छोटेसे रुग्णालय स्थापन करण्यात आले. यात औषधांची चांगली सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. यामुळे डॉ.प्रकाश आणि डॉ.मंदाकिनी यांना या ठिकाणी काही शस्त्रक्रिया करणे शक्य होऊ लागले.

या ठिकाणी डॉक्टर दांपत्यांनी मलेरिया, क्षयरोग, दाह, यासोबत भाजलेल्या रुग्णांवर यशस्वी उपचार केले. याशिवाय साप, विंचू यांच्या दंशाने मरणपसंन्न अवस्थेत पोहोचलेल्या रुग्णांवर देखील उपचार केले. ते पाहाता या आदिवासींच्या विश्वास वाढीस लागला. मोठ्या संख्येने रुग्ण येथे उपचार घेण्याकरीता येऊ लागले.

डॉ.प्रकाश आमटे आणि डॉ.मंदाकिनी आमटे यांनी आदिवासींच्या शिक्षणाकरीता देखील मोठे कार्य केले. त्यांच्या अधिकाराची जाणिव त्यांना करुन दिली. या व्यतिरिक्त लालची आणि भ्रष्ट वन अधिकाऱ्यांना हाकलंल सुध्दा !

१९७६ मध्ये त्यांनी हेमलकसा येथे एका शाळेची स्थापना केली. सुरुवातीला आदिवासी आपल्या मुलांना या शाळेत पाठवण्यास तयार होत नव्हते. पण पुढे पुढे मुलं शाळेत येऊ लागली. या ठिकाणी आदिवासी मुलांना शिक्षणासोबतच स्वयंरोजगारासाठी देखील प्रशिक्षित केले आहे.

हेमलकसा येथील शाळेत आदिवासींना शेतीविषयी फळ, भाज्यांच्या उत्पादनाविषयी, प्रशिक्षण दिले जात आहे. या व्यतिरिक्त आदिवासी बांधवांना वनांच्या सरंक्षणा संबंधी जागरुक करण्यात या

आमटे दांपत्यांनी महत्वाची भूमिका पार पाडली. या शाळेतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आज डॉक्टर, वकिल, अधिकारी, शिक्षक झाले असून आपले जीवन चांगल्या पध्दतीने जगत आहेत.

२००८ साली आमटे दांमपत्याला त्यांच्या सामाजिक दातृत्वाकरीता 'मॅगसेसे' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. १९७३ पासून डॉ.प्रकाश महाराष्ट्रातील सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांच्या कार्याची जाणीव ठेवत त्यांना २००२ साली 'पद्मश्री' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. या व्यतिरिक्त सामाजिक कार्यकरीता २०१४ साली 'मदर तेरेसा' पुरस्काराने त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला आहे.

*****

"कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक जगतात फार मोठी क्रांती केली. श्रमातून शिक्षण प्राप्त करण्याचा महान मूलमंत्र आहे. त्यांनी जनतेला दिला आणि मानवी समतेचा दिव्य आदर्श जनतेपुढे ठेवला."

–पंडित जवाहरलाल नेहरु

## आई बाबा

लांडे आश्विनी टी.वाय.बी.कॉम

कशाला गेले बाबा तुम्ही स्वर्गाला ।
कोण वागेल तुमच्या या बाळाला ।।

कुठे जावे तुमच्या विना या दुनियेत ।
आई गेली तुमच्या आधी स्वर्गात ।।
पडलं हे घर तुमचं रिकामं या गावात ।
जीव लागेना तुमच्याविना या जगात ।।

कशाला गेले बाबा तुम्ही स्वर्गाला ।
कोण वागेल तुमच्या या बाळाला ।।


लहानपणी तुमचे–आमचे प्रेम जुळुन यायचे।
थापड कधी उचलून नाही मारायचे ।।
नाही मिळाले प्रेम आम्हा आई–बापाचे ।
तुम्ही होतो तेव्हा,पोट आमचे भरवायचे ।।

कशाला गेले बाबा तुम्ही स्वर्गाला ।
कोण वागेल तुमच्या या बाळाला।।

*****

# क्रांतीसूर्य ज्योतीराव फुले

कु.आढाव निशा (एम.कॉम-१)



ज्योतीराव गोविंदराव फुले हे महात्मा फुले नावाने प्रसिद्ध आहेत ते विचारवंत आणि समाज सुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाजाची संस्था स्थापना केली. शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. जनतेने त्यांना 'महात्मा' ही उपाधी बहाल केली. ही पदवी त्यांना इ.स.१८८८ या साली मिळाली. शेतकऱ्यांचे 'आसूड' हा ग्रंथ महात्मा फुले यांनी लिहिला होता.

ज्योतिबा फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील 'कटगुण' हे आहे. त्याच गावी महात्मा फुल्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. ज्योतीबांच्या वडिलांचे नाव 'गोविंदराव' आणि आईचे नाव 'चिमणाबाई' होते. शेवटच्या पेशव्याच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरविण्याचे काम करीत होते. त्यामुळे गोऱ्हे हे त्याचे मूळ अडनाव असले तरी पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. तेच नाव पुढे रुढ झाले. ज्योतीराव केवळ नऊ महिन्यांचे होते तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी 'सावित्रीबाई' यांच्याशी झाला. इ.स.१८४२ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुध्दी अतिशय तल्लख त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळत असत. शाळेतील शिस्तप्रिय, हुशार ,विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या ओळी,

विद्येविना मती गेली ।
मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्रय आणि समाजातील जातीभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील 'भिडे' यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईवर सोपविली. ही महाराष्ट्रीतील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ ठरली. अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत इ.स.१८५२ मध्ये शाळा स्थापन केली. त्यांच्या या कार्याला सनातन्याकडून सतत विरोध होत असे. पण ज्योतीराव आपल्या भूमिकेवर ठाम असत. ज्योतीरावांनी पत्नी सावित्रीबाईना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.

मानवी हक्कावर इ.स.१७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्याच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलांमुलीचे शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले . सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान

होते. ज्योतीराव फुले यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि द्रारिद्रयाची वास्तवता विशद केली आहे. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी 'शेतकऱ्याचा आसूड' ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. वैचारिक भूमिका स्विकारल्या पाहिजे हे ज्योतीराव फुलेंनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म संहितेत अनेक वचनाच्या आधारे मांडणी केली आहे. ज्योतीबांनी २८ व्या वर्षी इ.स.१८५५ साली तृतीय रत्न हे नाटक लिहिले.

**महात्मा फुलेंचे सामाजिक कार्य :**

* सुधारणावादी विचाराचा प्रसार करण्यासाठी कृष्णराव भालेराव यांच्या मदतीने पुण्यातून दीनबन्धू हे वृत्तपत्र १८७७ मध्ये सुरु केले.
* २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.
* ऑगस्ट १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली.
* १८५२ मध्ये दलितांना शिक्षण देण्यासाठी पहिली शाळा सुरु.
* १८५५ मध्ये रात्र शाळा सुरु.
* महात्मा फुलेंनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने अस्पृश्य लोकांना विद्या शिकविण्याकरीता मंडळ नावाची संस्था स्थापन केली.
* महात्मा फुले यांनी हंटर कमिशनपुढे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे अशी आग्रही मागणी केली. यामुळेच जनतेने त्यांना १८८८ साली 'महात्मा' ही पदवी दिली.
* १८८० मध्ये महात्मा फुले यांनी कामगाराच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी नारायण लोखंडे यांच्या माध्यमातून 'बॉम्बे मिल असोसिएशन' या संघटनेची स्थापना केली.
* इ.स.१८८८ मध्ये व्हिक्टोरिया राणीच्या चिरंजीवाच्या (ड्युक ऑफ कॅनॉट) कार्यक्रमात त्यांनी 'शेतकऱ्यांचा प्रतिनिधी' म्हणून पारंपारिक वेशात उपस्थित राहून शेतकऱ्याचे गऱ्हाने मांडले.

******

## आई

गिरी प्रविण टी.वाय.बी.कॉम

आईसाठी काय लिहू
आईसाठी कसे लिहू
आईसाठी पुरतील
एवढे शब्द नाहीत कोठे
आई वरती लिहिण्ऐपत नाही
माझे व्यक्तिमत्व नाही मोठे.
जीवन हे शेत तर आई म्हणजे विहीर
जीवन हे नौका तर आई म्हणजे तीर
जीवन हे शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुट्टी
आई तू उन्हामधली सावली
आई तू पावसातली छत्री
आई तू थंडीतली शाल
आता यावीत दुःखे खुशाल
आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई भजनात गुनगुनावी
अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्याव
असं थंडगार पाणी
आई म्हणजे आरती वाजवावी
अशी लयबद्ध टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची
सर्वात पहिली आरोळी.

*****

# अनाथांची माई-सिंधुताई सपकाळ

कु.झिंजुर्टे पूजा (एम.कॉम-१)



भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या जगात दुसऱ्या क्रमाकाचा देश आहे. या लोकसंख्येच्या एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे मुले आहेत. परंतु या मुलांचा एक भाग सहसा अनाथ किंवा सोडलेला आहे. त्यांना रोज या अनाथ असणाऱ्याला तोंड द्यावे लागते. सतत अपमान सहन करण्यास भाग पाडले जाते. सिंधुताई सपकाळ यांची कथा अनाथ मुलांची माऊली म्हणून तयार झाली आहे.

१४ नोव्हेंबर १९४८ रोजी सिंधुताई सपकाळ यांचा जन्म महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील एका कुंटुंबात झाला. अनावश्यक मानले जाते असे 'चिंधी' नाव त्यांना देण्यात आले. याचा अर्थ समाजाकडून फाटलेले कापड होतो. परंतु सिंधुताईची आधिक शिकण्याची इच्छा सर्वव्यापी होती. तिचे वडील तिच्या शिक्षणासाठी उत्सुक होते, पण त्यांच्या आईने या शिक्षणाला विरोध केला. म्हणूनच ४ थी पर्यंत तिचे शिक्षण पूर्ण केले. पुढे शिक्षणाची आवड असताना सुध्दा आईच्या विरोधापायी वयाच्या १० व्या वर्षीच सिंधू म्हणजेच 'चिंधी' चे लग्न ३० वर्षाच्या एका माणसाशी लावून दिले. बालविवाहाच्या साखळदंडात अडकल्यावरही सिंधुने आशा सोडली नाही. त्याऐवजी असहाय्य आणि अत्याचारग्रस्त उपेक्षितांच्या मदतीसाठी तिच्या उत्कंटेला अजून बळ मिळाले. विवाह झाल्यानंतर वर्धामध्ये नवरांगण जगंलात स्थायिक झाली, १९७२ मध्ये तिने वन विभाग आणि जमीनदारांच्या गाईचे शेण गोळा करणाऱ्या गावातील स्त्रियांचे शोषण करणाऱ्यांविरुद्ध आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. तिच्या या एका निर्णयामुळे तिचे संपूर्ण आयुष्य बदलून जाईल याची सिंधुला कल्पना सुध्दा नव्हती. तिच्या गर्भधारणे दरम्यान एका जमीनदाराने तिचा विवाहबाह्य संबधाबद्दल एक ओंगळ अफवा पसरवली. यामुळे तिच्या समाजाकडून तिला नकार दिला गेला. तिच्या पतीने तिला घरातून बाहेर काढले. दु:खाची गोष्ट म्हणजे १४ ऑक्टोबर १९७३ रोजी एका गोशाळेत तिने आपली मुलगी ममताला जन्म दिला.

सिंधुताई सपकाळ आपल्या माहेरी परतल्या, पण तिथेही त्यांच्या आईकडून तुसड्या नकारांचा सामना करावा लागला. हरवलेल्या आणि विश्वासघाताचा सामना करणाऱ्या सिंधुताईंनी रेल्वे गाडीतून गाणी गायला सुरुवात केली. रस्त्यावर उतरुन भिक मागून रोजचे दिवस ढकलण्यास सुरुवात केली. तिने स्वत: आणि तिच्या मुलीच्या अस्तित्वासाठी संघर्ष चालू ठेवला आणि रेल्वे स्थानके, गोठा आणि स्मशानभूमीचे तिने घर केले.

टिकून राहण्यासाठी सतत संघर्ष करताना, ती जिल्ह्यात स्थित चिकलदरा येथे स्वत:ला घेऊन आली. येथे वाघांच्या संरक्षणार्थ प्रकल्पामुळे ८४ आदिवासी गावे हद्दपार करण्यात आली होती. या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर एक प्रकल्प अधिकाऱ्याने आदिवासी गावकऱ्यातील १३२ गायी जप्त केल्या आणि तेव्हा त्यातील एका गायीचा मृत्यू झाला. सिंधुताईनी असहाय्य आदिवासी गावकऱ्यांची योग्य पुनर्वसनासाठी लढा देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या प्रयत्नांना वनाधिकाऱ्यांनी स्विकारले आणि त्यांनी पर्यायी पुनर्वसनासाठी आदिवासीयांची योग्य

व्यवस्था केली या अनुभवातून सिंधूताईना असहाय्य, अनाथ व उदासीनपणे दुर्लक्ष केलेयं स्त्रियांच्याकडे लक्ष गेले. दारिद्रय, अपमान आणि बेघर होणाऱ्या अनुभवांच्या फेऱ्यातून स्वत त्या गेल्या असल्याने त्यांना त्यातील आक्रोश दिसून आला.

सिंधुताईने आपल्या प्रेम आणि दयाळू स्वभावामुळे २०७ पेक्षा जास्त जावई, १६ मुली आणि हजाराहून आधिक नातवंडाचा एक मोठा परिवार जमविला आहे. आजपर्यंत सुध्दा तिला आपल्या दोन वेळच्या जेवणासाठी संघर्ष करत आहे. ती कोणाचाही आधार घेत नाही फक्त आपल्या उदरनिर्वाह करण्यासाठी ठिक ठिकाणी भाषणे देते.

''देवाच्या कृपेने माझ्याजवळ उत्तम संभाषण कौशल्य आहे''. ज्या द्वारे मी कोणावरही आपला प्रभाव पाडू शकते. भूकेने मला बोलायला शिकविले आणि आज तेच माझ्या उदरनिर्वाहाचे साधन बनले आहे. भाषणाद्वारे मिळणाऱ्या पैशावर मी अनाथ मुलांचे पालन पोषण करते असे माई मोठ्या आत्मविश्वासाने सांगतात.

अनेक वर्षे पतीच्या गैरवर्तवणुकीमुळे त्रासलेल्या माई जवळ खुद्द पतीने येऊन त्यांच्या कृत्याबद्दल माफी मागितली. माईनी त्यांना मनाचा मोठेपणा दाखवत एखाद्या लहान मुला प्रमाणे माफ केले. आज ते दोघेही अत्यंत आपुलकीने अनेक अनाथांचे संगोपन करत आहेत. २०१६ मध्ये सिंधुताईच्या कार्यासाठी, समाजसेवेकरीता त्यांना डी.वाय.पाटील इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मार्फत डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. सिंधुताईच्या खडतर आयुष्यावर 'मी सिंधुताई सपकाळ' सिनेमाही येऊन गेला. तेजस्विनी पंडीत यांनी या चित्रपटात मुख्य भूमिका आहे. या चित्रपटास राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. अनंत महादेवांनी हा सिनेमा दिग्दर्शित केलेला आहे.

सिंधुताईच्या ह्याच ध्यैर्यवान आणि कामात झोकून दिलेल्या व्यक्तीमत्त्वामुळे त्यांना ५०० पेक्षा आधिक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना ह्या पुरस्कारातून जे काही रक्कम मिळते ती रक्कम त्या निस्वार्थी भावनेने अनाथांना घर बांधून देण्यात तसेच शिक्षण करण्यात देते. त्या मुलांच्या स्वप्नांना अजून चांगला आकार कसा देता येईल यासाठी प्रयत्न करतात.

सिंधुताईनी या अनाथ मुलांना अंगीकारणे सुरु केले आणि काहीवेळा त्यांना पोसण्यासाठी घरोघरी अन्न मागत फिरल्या. आपल्या मुलीला सांभाळतांना अनाथ मुलांच्या संगोपणात पक्षपातपणा टाळण्यासाठी सिंधूताईनी पुण्यातील एका ट्रस्टकडे आपल्या मुलीला पाठविले. अनेक वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर त्यांनी आपले पहिले आश्रम चिखलदरा येथे उभे केले. त्यांनी आश्रमासाठी पैसे उभारण्यासाठी गावातील व शहरी भागातून प्रवास केला. निधीच्या अभावामुळे त्यांना बऱ्याच वेळेस पुढच्या जेवणासाठी संघर्ष करावा लागला. पण सिंधुताई कधीही थांबल्या नाहीत. आजपर्यंत त्यांनी १२०० हून आधिक अनाथ मुलांचे संगोपन केले आणि त्यांना प्रोत्साहन दिले आहे. सर्वजण त्यांना 'माई' या नावाने ओळखतात. त्यांच्या अनेक दत्तक मुलांमध्ये आता वकील आणि डॉक्टर आहेत. आता सिंधुताईची मुलगी आणि दत्तक घेतलेली मुले स्वत: अनाथाश्रम चालवित आहेत.

विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून सिंधुताई सपकाळ यांना सुमारे ५०० हून अधिक पुरस्कार मिळाले आहेत. २०१० मध्ये 'मी सिंधुताई सपकाळ' या मराठी चित्रपटाची बायोफिक म्हणून रिलीज केली गेली. महाराष्ट्रात अनेक संस्थाची स्थापना केली. जे हजारो अनाथ मुलांना शिक्षण आणि आश्रय देत आहेत. आजही ६९ वर्षाच्या वयाच्या सिंधुताई सपकाळ या अनाथ मुलांचे भविष्य घडविण्यासाठी अविरतपणे काम

करतात. कारण त्यांचा असा विश्वास आहे की वंचित मुलांचा अर्थ एक वंचित राष्ट्र आहे.

मुलां-मुलीमधील भेद दूर करण्यासाठी, निराश्रीतांच्या कल्याणासाठी माईनी त्यांच्या मुलीला ममताला दगडूशेठ हलवाई मंदिर समिती सदस्य तात्यासाहेब गोडसे यांच्याकडे साभांळण्यास दिले. जी आज स्वत: एक अनाथाश्रम चालवत आहे.

मला जाळू नका.... मातीत गाडून नका.....

खरचं ...मी जेव्हा जमीन दोस्त होईन,
सोबत काय येईल....मागे काय राहील ?
दुर्देवाचे खडक फोडले, दुख वाहील मूर्तिमंत,
उभं आयुष्य गेलं.... ना खेद ना खंत,
ह्यातून नवी पहाट.... उद्याचं स्वप्न पाहिलं,
अनेकांना जवळ केलं, देता आल तेवढ दिलं,
आता थकलेत रस्ते, मनही खुणावते धीर आस्ता,
संपले आयुष्यांच तेल, पणती विझून जाईल,
सातपुडा उरी फुटेल
चिखलक्षयाच्या धीर सुटेल
वासराच्या गाई हंबरतील
पशुपक्षी ''भैरवी'' गातील
स्तब्ध होतील वादळवारे
कडे कपारी आणि झरे
दुरावलेल्या भाग्यांच मी 'अहैव' लेणं लेईल,
मातीचा पदर पाघरुन मला'धरती' पोटात घेईल.

*****

## ती ही असतात माणसं

कु.तुपे आश्विनी टी.वाय.बी.कॉम -१

दगडात भावना नसतांनाही
त्याला देव समजून बसलो....

दारी आले जनावर
त्याच्यात सृष्टी समजून बसलो....

केस सोडून झुले बाई
तिला देव समजुन बसलो....

कान फुंकुनी मारी मंतर
त्याला डॉक्टर समजून बसलो....

देव कोपेल माझ्यावर म्हणून
बामणाच्या हातून पूजा शांती करुन बसलो....

होते नव्हते सारी काही
त्याच्या चरणी ठेवून बसलो....

या अंधश्रद्धेच्या जाळ्यात असे मी फसलो,
जातीची गाडी सोडून दुसऱ्याच गाडीत बसलो.....

*****



# आनंदी गोपाळ जोशी

कु.ढोकचौळे स्नेहल (एम.कॉम-१)



भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांच्या स्मरणार्थ २६ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी 'महिला आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. आनंदीबाईंचे पुर्वाश्रमीचे नाव 'यमुना' होते. त्यांचा जन्म ३१ मार्च १८६५ रोजी पुणे येथे झाला. जुन्या कल्याण परिसरातील पारनाका येथे राहणाऱ्या गणपतराव अमृतेश्वर जोशी यांची त्या ज्येष्ठ कन्या होत्या.

वयाच्या नवव्या वर्षा बालपणातच त्यांचा विवाह वयाने २० वर्षांनी मोठे असणाऱ्या गोपाळराव जोशी यांच्याशी झाला. लग्नानंतर गोपाळरावांनी आपल्या पत्नीचे यमुना हे नाव बदलून आनंदीबाई असे ठेवले. लग्नानंतर आनंदीबाईंनी वयाच्या १४ व्या वर्षी एका मुलास जन्म दिला. परंतु दुर्दैवाने पुरेशी वैद्यकीय सुविधा न मिळाल्याने तो केवळ दहाच दिवस जगू शकला. हिच खंत आनंदीबाईंना वैद्यकीय शिक्षणाकडे खेचून घेण्यास कारणीभूत ठरली.

गोपाळराव स्वत: लोकहितवादीची शतपत्रे वाचत. आपल्या पत्नीस शिक्षणात रस आहे हे गोपाळरावांनी जाणले होते. लोकहितवादीच्या शतपत्रातून ते प्रेरित झाले आणि आपल्या पत्नीस इंग्रजी शिकविण्याचा निश्चय केला. गोपाळराव पोस्ट ऑफिसात कारकून होते. गोपाळराव यांची नोकरी निमित्त बदली होत असे. कोल्हापूर, मुंबई, भुज, कोलकत्ता, बराकपूर, श्रीरामपूर येथे प्रत्येक ठिकाणी गोपाळरावंबरोबर आनंदीबाई जात राहिल्य आणि गोपाळराव तिला शिकवीत राहिले.

कोल्हापूरमध्ये मिशनऱ्यांशी ओळख वाढल्यावर तिथे प्रथम गोपाळरावांच्या मनात आलं की आनंदीला अमेरिकेला पाठवून तिचं शिक्षण पूर्ण करावे. त्यावेळी गोपाळरावांनाही अमेरिकेला जायची इच्छा होती, परंतु ते काही जमू शकले नाही. आनंदी बुद्धिमान असल्याने तिनं इंग्रजी भाषा व अन्य विषय पटकन आत्मसात केले. आनंदीला अमेरिकेला शिकायला जाण्यासाठी पैशांची तरतूद आवश्यक होती. ती करण्यात तिला जायला सोबत शोधण्यात २-४ वर्षे गेली. भारतात बदलीच्या ठिकाणी आनंदीबाईंना समाजाचे, शेजाऱ्या-पाजाऱ्यांचे विपरीत अनुभव आले. त्या गोपाळरावांबरोबर फिरायला जात. इंग्रजी शिक्षण घेतात. याबद्दल कुतुहल म्हणून त्या दोघांना पाहायला लोक गर्दी करीत आणि गोपाळरावांना विचारित, ही ठेवलेली बाई का ? आनंदीलाही खूप अपमानास्पद शेरे ऐकावे लागत. परंतु तिकडे दुर्लक्ष करून आनंदी आपला अभ्यास निष्ठेने करी. श्रीरामपूर (बंगाल) येथे गोपाळरावांनी नोकरी असतानाच आनंदीचं अमेरिका जायंच ठरलं तिथे जाऊन वैद्यकशास्त्राचा अभ्यास करण्याकरीता शिकावं ठरलं.

या आधीची घटना विस्मयकारक आहे. न्यूजर्सी मधल्या रोशेल या गावातील श्रीमती कार्पिंटर या दातांच्या डॉक्टरांकडे गेल्या होत्या. ते वर्षे होतं १८८० त्यांनी तिथे 'मिशनरी रिव्हू' नावाचं मासिक सहज चाळायला घेतलं. त्यात गोपाळराव जोशी व आर.जी.वाईल्डर यांची पत्रं छापलेली होती. यावरुन कार्पेंटर बाईंना समजलं की गोपाळ जोशी यांना आपल्या पत्नीला अमेरिकेत शिक्षणासाठी पाठवायचं आहे आणि त्यांच्या मनात त्या अनोळखी

न पाहिलेल्या आनंदी बद्दल स्नेहभाव उत्पन्न झाला. त्याच वेळी अजून एक विस्मय वाटावा अशी घटना घडली. कार्पेटर बाईंची नऊ वर्षांची मुलगी आमी आईला म्हणाली, आई मला स्वप्न पडलं की तू हिंदुस्थानात कुणाला तरी पत्र पाठवत आहे. कार्पेटरबाई चकित झाल्या. त्या गोपाळ जोशींना पत्र पाठवण्यापूर्वी नकाशात कोल्हापूर शोधत होत्या. (कारण मासिकातलं गोपाळ जोशीचं पत्र कोल्हापूरहून पाठवलेलं होतं) तेव्हा त्यांच्या मनात इंडियातली शहरं असा विचार उच्चारला हे कसं ? तिला तर काहीच ठाऊक नव्हतं. याच कार्पिटरबाईने पुढे पत्रव्यवहार करुन आनंदीशी आपलं नातं जोडलं. आनंदी त्यांना मावशी म्हणे. त्यांच्याच आधारावर तिने अमेरिकेत पाऊल टाकलं या कार्पिटरबाई आनंदीला ' आनंदीचा झरा' म्हणत.

अमेरिकेला जाण्यापूर्वी श्रीरामपूर (बंगाल) इथल्या बॅप्टिस्ट कॉलेजच्या सभागृहात आनंदीबाई जोशी यांनी मी अमेरिकेस का जाते ? यावरती अस्खलित इंग्रजीत व्याख्यान दिलं. मुळातून ते भाषण वाचण्यासारखं आहे. त्यातला एक मुद्दा असा, पृथ्वीच्या पाठीवर हिंदुस्थान इतका रानटी देश दुसरा नाही. देशातील लोकांना आपल्या गरजा त्या पूर्ण करुन स्वावलंबन करता येत नाहीत. वैद्यक शास्त्रज्ञ स्त्रियांची हिंदुस्थानातल्या प्रत्येक भागात अतिशय जरुरी आहे. सभ्य स्त्रिया पुरुष वैद्याकडून चिकित्सा करुन घेण्यास प्रवृत्त नसतात. इथे स्त्री डॉक्टरची नितांत गरज आहे हे ओळखून आनंदीबाई डॉक्टरची पदवी घेण्यासाठी अमेरिकेत गेल्या. परंतु प्रत्येक ठिकाणी त्यांना सतत संघर्ष करावा लागला. आनंदीबाईंना अभिनंदनाच्या तारा आल्या, मानपत्रे पाठविली गेली. मानपत्रात त्यांच्या उच्च शिक्षणाचा गौरव केला गेला आहे.

जेव्हा आनंदीबाई भारतात परतल्या १६ नोव्हेंबर १८८६ या दिवशी -तेव्हा मुंबई बंदरावर लोकांनी गर्दी केली. त्याचं पृष्पवृष्टीनं स्वागत केले. मुंबई बंदरात बोटीतून उतरण्यापूर्वी त्यांच्या पोशाखाचं वर्णन आहे. नारायण पेठी काळी चंद्रकला (नऊवारी) खणाची चोळी, कपाळावर कुंकू, नाकात नथ, कानात कुडी, पायात बुट व स्टॉकिंग्ज असा थाट होता. त्या आजारीच होत्या, परंतु हिंदुस्थानात घरी जायला मिळणार, घरचं अन्न मिळणार म्हणून त्यांची प्रकृती तात्पुरती स्थिर होती.

अमेरिकेच्या त्यांच्या मेडिकल कॉलेजने ११ मार्च १८८६ रोजी फिलाडेल्फीयाला त्यांना वैद्य विद्यापारंगत हा किताब दिला. त्यांच्या पदवीग्रहन समारंभाला गोपाळराव स्वत: उपस्थित राहिले. पंडिता रमाबाई होत्या. भारतातील पहिली स्त्री डॉक्टर म्हणून सर्व उपस्थितांनी उभे राहून जोरदार टाळ्या वाजवून तिची प्रशंसा केली. आनंदीबाई जोशी डॉक्टर होऊन स्वदेशी आल्या, जाताना एकट्या होत्या येताना गोपाळ जोशी बरोबर होते. पण एव्हाना त्यांना क्षयाची बाधा झाली होती. बोटीवर कुणीही गोऱ्या डॉक्टरने तिला बिगर-गौरवर्णीय म्हणून उपचार केले नाहीत मायदेशी पोहोचल्यानंतर समुद्रोल्लंघन करुन आलेली, त्यातून स्त्री म्हणून हिंदू डॉक्टर किंवा वैद्यही तपासून पाहीनात. वयाच्या विशीतच त्यांना क्षयरोग झाला.

आनंदी जोशी यांचे २६ फेब्रुवारी १८८७ रोजी निधन झाले. अमेरिकेत कार्पिटर कुटूंबियांनी आपल्या कुंटूबाच्या स्मशानात त्यांचे लहानसे थडगे बांधले. त्यावर आनंदी जोशी एक तरुण हिंदू ब्राम्हणकन्या परदेशात शिक्षण घेऊन डॉक्टर पदवी मिळविणारी पहिली भारतीय स्त्री अशी अक्षरे कोरुन तिचे स्मारक केले.

आनंदीबाई यांच्यावर तिच्या समकालीन आणि लेखिका असलेल्या काशीबाई कानिटकरांनी चरित्र लिहिले आहे. त्यानंतर अंजली किर्तने यांनी संशोधन करुन नवं चरित्र लिहिलं. श्री.ज.जोशी आनंदी गोपाळ कांदबरी लिहिली. त्याचे नाटकही रंगभूमीवर आले.

******

# भारतीय स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले

कु.पटारे गौरी (एम.कॉम-१)



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ मध्ये सातारा जिल्ह्यातील 'नायगाव' या ठिकाणी झाला. या गावातील खंडोजी नेवसे पाटील यांची मोठी मुलगी म्हणून सावित्रीबाई यांना ओळखले जाते. लहानपणा पासूनच त्या अत्यंत धीट व साहसी होत्या. त्यामुळे शेतावर जाणे, जणावरे राखणे, इतर मुलांबरोबर खेळ खेळणे, मुलांची भांडणे-तंटे सोडविणे, आईच्या कामात मदत करणे इ. कामे त्या सहजपणे पार पाडीत असत.

सावित्रीबाईंच्या वडिलांना आपल्या मुलीचे कौतुक वाटे. भविष्यातील नेतृत्व, समाजसेवा करण्याचे बाळकडू त्यांना माहेरीच मिळाले होते. १८४० मध्ये त्यांचा विवाह महात्मा फुलेंशी झाला. ज्योतिबा यांची संकटावर मात करण्याची साहसी वृत्ती, दूरदृष्टी, माणुसकीचा आचार या सर्व गुणांच्या सावित्रीबाईंवर मोठा प्रभाव पडला. त्यामुळेच स्त्री शिक्षणाचे काम करण्याचा सावित्रीबाईंनी ध्यास घेतला. ज्योतिबा फुले यांनी विद्येचे महत्त्व ओळखले व स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. त्यांच्या या महान सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक कार्यात समर्पण करणाऱ्या सक्षम महिला म्हणून सावित्रीबाईंनी आपल्या पतीस साथ दिली. आपले आयुष्य आपल्या पतीच्या कार्यासाठी वेचले.

पुण्यात शिक्षणाची सोय नव्हती तेव्हा ज्योतिबांनी १८४८ मध्ये पुण्यात भिडे वाड्यात पहिली मुलींची शाळा काढली. मुलींच्या शाळेत काम करण्यासाठी शिक्षिकाही मिळत नव्हती. तेव्हा ज्योतिबांनी आपल्या अशिक्षित पत्नीला म्हणजेच सावित्रीबाईंना घरी लिहायला वाचायला शिकविले व त्यांची शिक्षिका म्हणून नियुक्ती केली. सावित्रीबाईंचे शिक्षणविषयक विचार आपल्या पतीच्या विचारांशी मिळते-जुळते होते म्हणून शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम, शिक्षणपध्दती इ.बाबी सावित्रीबाईंनी अवगत करुन घेतल्या.

सावित्रीबाईंनी शिक्षिका म्हणून काम करतांना सर्व दीनदलितांना व अनाथांना जवळ करुन त्यांच्यावर स्वत:च्या मुलांप्रमाणे प्रेम केले व त्यांची दु:खापासून मुक्ती करण्यासाठी स्वत:च्या रक्ताचा थेंब न थेंब वेचला, सर्वत्र होणारी टीका, छळ सहन करीत एका थोर समाजसुधारकाची जीवनसहचरणी म्हणून धैयाने वागून ज्योतीबांचे कार्य उदात्त होण्यासाठी सावित्रीबाईंनी मनापासून साथ दिली. या पवित्र कार्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न अनेक समाजकंटकानी तसेच ज्योतिबांच्या वडिलांनी सुध्दा प्रयत्न केला. मात्र ज्योतिबांनी या विरोधाला न जुमानता आपली स्त्री शिक्षणाची चळवळ पुढे चालूच ठेवली. आपल्या या कार्यामुळे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाच्या कार्यात बहुमोल योगदान दिले.

सावित्रीबाईंजवळ विलक्षण चिकाटी व कठोरपणा होता. संत चोखामेळा मंदिरात सावित्रीबाईंनी महार, मांग, कुणबी इ. लोकांच्या मुलींसाठी शाळा काढली. त्यांच्या या सेवावृत्तीने केलेल्या कामाचा गौरव इंग्रज सरकारने केला.

असा मान आतापर्यंत कोणासही मिळालेला नव्हता. सावित्रीबाई आपले पवित्र अध्यापनाचे कार्य करीत होत्या. मात्र सनातन लोंकानी व समाजकंटकांनी त्यांच्या अंगावर चिखल, दगडगोटे, शेण फेकले. एवढी अवहेलना होऊनही सावित्रीबाई मागे हटल्या नाहीत. स्त्री शिक्षणास चालना हा ज्योतिबांच्या शैक्षणिक कार्यातील अत्यंत महत्त्वाचा पैलू होता. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार असावा. त्यानांही शिक्षण दिले जावे. या विचारांचा त्यांनी पुरस्कार केला.

शिक्षणातील समस्यांवर शिक्षणाचे व्यावसायिकरण, शिक्षकांचे प्रशिक्षण इ. सर्व बाबींवर १२५ वर्षापूर्वी त्यांनी प्रकाश टाकला. त्यामुळे तळागाळातील लोकांना, स्त्रियांना शिक्षण मिळू लागले. शिक्षण बहुजनांसाठी खुले करणारे त्या एक शिक्षण क्षेत्रातील क्रांतीकारक होत्या असेच म्हणावे लागेल.

******



## नाती

कु.तुपे आश्विनी टी.वाय.बी.कॉम

जीवनात नाती तशी
अनेक असतात,
पण ती जपणारी लोक
फार कमीच असतात....

काही नाती असतात रक्ताची
तर काही हृदयाची.....

काही नाती असतात जन्मो-जन्मीची,
तर काही... ' काही क्षणापुरतीची....'

काही नाती असतात न तुटणारी,
पण वेळ आलीच तर वाकणारी....


काही नाती असतात,
लांबुनच आपले म्हणणारी,
जवळ गेल्यावर मात्र दूर करणारी.....

काही नाती असतात,
पैशाने विकत घेता येणारी,
तर काही प्रमाने आपली करणारी....

******

# धीरुभाई अंबानी

कु.औताडे ऋतुजा (एम.कॉम-१)



धीरजलाल हीरालाल अंबानी यांना या नावाने ओळखले जाते धीरुभाई भारतात ते गुजराती व भारतीय उद्योजक होते. व्यावसायिक हुशारीने गरिबीतून वर येऊन त्यांनी आपल्या चुलत भावासोबत रिलायन्स उद्योग समुह स्थापना केली. इ.स. १९७७ साली सार्वजनिक घोषित केलेली रिलायन्स कंपनी विस्तारत जाऊन इ.स. २००७ साली अंबानी कुंटूबीयांची मालमत्ता ६० अब्ज डॉलर म्हणजे वॉल्टन कुटुंबानतर या पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत कुटुंब ठरण्या इतपत हा उद्योग व्यवसाय वाढला.

जीवन :

धीरुभाई यांचा जन्म गुजरात राज्यातील सौराष्ट्रचा जुनागढ जिल्ह्यातील चोरवाड या गावी २८ डिसेंबर इ.स.१९३२ रोजी झाला. त्यांचे वडील हिराचंद गोवर्धनदास अंबानी हे प्राथमिक शाळेत शिक्षक होते तर आई जमनाबेन या गृहिणी होत्या. धीरुभाई हे आपल्या पाच भावडांतले मधले अपत्य होते.

धीरुभाई शिक्षणात सर्व सामान्य विद्यार्थी होते. त्यांचे इंग्रजीचे ज्ञान चांगले तर गणित कच्चे होते. इ.स.१९४९ साली आपले १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करुन धीरुभाई नोकरीच्या शोधात एडन येथे गेले. तेथे वर्मा रोल कंपनीची उपकंपनी म्हणून काम करणाऱ्या ए.बेस नावाच्या कंपनीत धीरुभाई मासिक ३०० रुपये पगारावर पेट्रोल पंपावर नोकरी करु लागले. ही कंपनी लहान मोठ्या अनेक उद्योगामध्ये कार्यरत होती. आंतरराष्ट्रीय कंपनीच्या भाग असल्याने तेथे अनेक देशांचे व्यापारी येत असत. तेथेच धीरुभाई यांनी स्वत:ची रिफायनरी स्थापन करावी असे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली.

धीरुभाई यांचे वडीलबंधू रमणिकलाल यांच्यासह एडनमध्ये राहत. गुजराती लोकांची आवड-निवड या दोघा भावांना माहीत असल्याने त्यांनी गुजराती खाद्यपदार्थ भारतातून मागवून ते पदार्थ एडनला विकण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसात अंबानी बंधू लोकप्रिय होऊ लागले. यामुळे ओळखी तर वाढत गेल्या पण व्यापारी धीरुभाईंना प्रत्येकाकडून काहीतरी मिळत गेले.

इ.स.१९५१ साली धीरुभाई यांचे वडील हिराचंद अंबानी यांचे निधन झाले. आई जमनाबेन यांच्या पुढाकाराने धीरुभाईंचा विवाह जामनगरच्या कोकिलाबेन पटेल यांच्याशी मार्च १९५४ मध्ये झाला.

मुंबईला आल्यावर धीरुभाई सर्व कुंटुंबीसह अशा भुलेश्वर येथे एका चाळीत राहू लागले. या चाळीत सुमारे ५०० कुटुंबे रहात होती. पहिले अपत्य मुकेश अंबानी यांचा जन्म एप्रिल इ.स. १९५७, मध्ये थोरली मुलगी दिप्ती हिचा जानेवारी १९६९ मध्ये झाला.

इ.स.१९६६ साली धीरुभाई अंबानी यांनी अहमदाबाद जवळच्या नरोडा येथे अत्याधुनिक टेक्सटाईल्स मिलची सुरुवात केली. हे पाऊल त्यांच्यासाठी प्रगतीचे वर्ष ठरले. भारत सरकारचे निर्यात धोरण अनुकूल होते.

२४ जून २००२ या दिवशी धीरुभाईंना मेंदूत रक्ताची गाठ झाल्याने पक्षाघाताचा तीव्र झटका आला. त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आले.

ही कंपनी लहान मोठ्या अनेक उद्योगांमध्ये कार्यरत होती. आंतरराष्ट्रीय कंपनीचा भाग असल्याने तेथे अनेक देशांचे व्यापारी येत असत. आपल्या कामानुसार अरबी भाषेत प्रभुत्वही धीरुभाईंनी मिळविले होतेच. अनेक मित्रही जोडले. या मित्र परिवारात भारतीय आणि परदेशी असे सगळेच होते. त्यातील सुशीलभाई कोठारी, नंदुभाई संघवी आणि किसन पारेख हे पुढे रिलायन्सचे मुख्य मार्गदर्शक होते.

दर्जेदार माल आणि वाढती बाजारपेठ या मुळे धीरुभाई यशाच्या पायऱ्या चढू लागले. १९७५ साली जागतिक बँकेने विकसनशील देशांमधील सर्वोत्कृष्ट प्रकल्प म्हणून नरोडाच्या प्रकल्पाची निवड केली. त्यांनी विमल या नावाचे कापड विक्रीस सुरुवात केली. १९८१ साली मुकेश अंबानी अमेरिकेत स्टॅनफोर्ड विद्यापीठातून शिक्षण संपवून भारतात परतले. तर इ.स.१९८३ साली अनिल अंबानी अमेरिकेतील वॉटर्न स्कूल येथील आपले शिक्षण पूर्ण केले.

सन १९९९-२००० मध्ये रिलायन्सचे २५,००० कोटीचे गुंतवणूक करुन जामनगर गुजरात येथे मोठी रिफायनरी सुरु केली. वयाच्या १६ व्या वर्षी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर धीरुभाई आपले नशीब अजामवण्यासाठी येमेन देशामध्ये गेले. तिथे त्यांनी गॅस स्टेशनवर दर महिन्याला ३०० रुपये पगारावर नोकरी केली. धीरुभाईंनी १९६६ मध्ये आपल्या नव्या व्यवसायाला सुरुवात केली. त्यांनी आपले ऑफीस मस्जिद बंदरमधील नरसिंह रोडवर थाटले. १९७० मध्ये धीरुभाईंनी दक्षिण मुंबईमध्ये स्वत:चे घर खरेदी केले. तेव्हा त्यांनी त्या घरासाठी १० लाख रुपये मोजले. धीरुभाई मसाले, कापड आणि विविध वस्तू निर्यात करायचे पण त्यात त्यांना जास्त फायदा व्हायचा नाही. पण नायलॉन सारखी उत्पादन ते तब्बल ३०० % नफ्यामध्ये आयात करायचे यांच्यातील अस्सल व्यावसायिक दिसून येतो.

धीरुभाई अंबानीनी उद्योगक्षेत्रामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल २०१६ साली सरकारतर्फे मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार प्रदान केला. आज त्यांनी स्थापन केलेल्या रिलायन्स उद्योग समुहाने देशामध्ये स्वत:चे साम्राज्य निर्माण केले आहे. १ लाखांमध्ये जास्त लोकांना त्यांनी उभ्या केलेल्या या व्यवसायामुळे रोजगार मिळत आहे. भारतातील जगातील एक यशस्वी कंपनी म्हणून जगभरात रिलायन्सचे नाव घेतले जाते.

आपण कधी विचार करु शकतो का की एक भजे, पकोडे विकणारा मोठा उद्योजक होऊ शकतो म्हणून? पण तो धिरुभाई अंबानीनी आपल्या कारकिर्दीत सुरुवातीचा गिरनार पर्वतावर भजे आणि पकोडे विकले होते. त्याआधी फळ आणि नाष्टा विक्रीचा व्यवसाय देखील त्यांनी केला. पण त्यात त्यांना पुरेसा नफा न मिळाल्याने गिरणार पर्वत हे भाविकांकरिता आणि पर्यटकांकरिता चांगले ठिकाण असल्यामुळे येथे व्यवसाय चांगला चालेल या विचाराने त्या ठिकाणी भजे आणि पकोडे विकण्यास सुरुवात केली. परंतु व्यवसाय पुर्णत: पर्यटकांवर अवलंबून असल्याने विशिष्ट काळातच चालला. इतर वेळी त्यात चांगला फायदा मिळत नसल्यामुळे त्यांनी हा व्यवसाय बंद केला. तेथील स्वातंत्र्यप्राप्तीकरता आंदोलनाने उग्र रुप धारण केले होते. यामुळे भारतीयांना यमन येथील नोकरी सोडून भारतात परतावे लागत होते. अशा धीरुभाई देखील तिथल्या चिघळलेला आंदोलनामुळे भारतात परतले. ज्यामुळे धिरुभाई अंबानी जवळ नोकरी देखील नव्हती आणि व्यवसायाकरीता भांडवल देखील नव्हते. अशा परिस्थितीत त्यांनी आपला भाऊ चंपकलाल दमाणी सोबत मिळून पॉलिस्टर धागे आयातीचा व्यवसाय सुरु केला.

हळूहळू कापड व्यवसाय धिरुभाईंचा चांगलाच दम बसू लागला होता. त्यात चांगल्या संधी मिळाल्याने १९६६ च्या दरम्यान त्यांनी अहमदाबाद मधील नरोडा येथे कापड मिलची स्थापना केली. आपल्या आयुष्यात धिरुभाईंना रिलायंसचा विस्तार अनेक क्षेत्रामध्ये केला. यात प्रामुख्याने दूरसंचार, उर्जा, कापड, शेअर मार्केट आदि समावेश आहे.

आज धिरुभाई अंबानीचे दोन्ही मुले मिळालेला संधीचा उपयोग करीत पुढे घेऊन जात आहेत. भारतात इक्विटी कल्ट सुरु करण्याचे श्रेय देखील धिरुभाई अंबानींना जाते. १९७७ ला ज्यामुळे रिलायन्सने आईपीओ प्रसारित केले. त्यावेळी ५८००० पेक्षा अधिक भागधारकांची त्यात गुंतवणूक केली. धीरुभाई गुजरात आणि दुसऱ्या राज्यातील ग्रामीण जनतेचा विश्वास संपादन करण्यात देखील यशस्वी झाले आहेत. जो त्यांच्या कंपनीत गुंतवणूक करेल त्याला चांगला फायदा होईल असा विश्वास जनसामान्यांमध्ये रुजविण्यात यश मिळाले.

"स्वप्न कायम मोठी पहायला हवीत " सर्मपणाला पर्याय नाही आणि प्रयत्न नेहमी महान असायला हवेत. अश्या तऱ्हेने व्यावसायिक जगातील बेताज बादशहा धिरुभाई अंबानीनी रिलायन्स उद्योग समूहाची स्थापन केली.

********

## तहान

कु.त्रिवेणी परदेशी एम.कॉम -१

सरली सुरेख थंडी ।
फोफावला उन्हाळा ।।
संतप्त सूर्य आता ।
ओकेल तप्त ज्वाल ।।

पक्षी दिशा दिशांना ।
फिरतील ते थव्यांनी ।।
सुकतील कंठ त्यांचे ।
मग शोधतील पाणी ।।

सुकली तळी जळाची ।
पाणी पिण्यास नाही ।।
त्या सानुल्या जीवांची ।
होईल लाही लाही।।

त्यांच्या जीवाकरिता ।
इतकी कराच सेवा ।।
वाटीत ऐवढेसे ।
पाणी भरुन ठेवा ।।

********

# राणी लक्ष्मीबाई

कु.पटारे सुष्मा (एम.कॉम-१)



लक्ष्मीबाईंचे मूळ नाव 'मनिकर्णिका' असे होते. टोपणनाव मनू होते. त्यांचा जन्म १९ नोव्हेंबर इ.स.१८३५ मध्ये भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी येथे झाला होता. त्यांचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते. तांबे कुटूंब मूळचे 'सातारा' जिल्ह्यातील धावडशी गावचे होते.

धोरणी, चतुर युद्धशास्त्रनिपुण, शूर आणि थोर कर्तृत्व व नेतृत्व असणाऱ्या राणी लक्ष्मीबाई जन्मत: कोणत्याही राजघराण्यातल्या नसल्या तरी राजघराण्याशी संबधित व्यक्तीमध्ये वावरलेल्या, वाढलेल्या होत्या. अश्वपरीक्षेचे सर्व मापदंड माहित असणाऱ्या लक्ष्मीबाई घोडेस्वारी करण्यातही वाकबणार होत्या. त्या काळी पूर्ण हिंदूस्थानात श्रीमंत धोंडोपंत बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे आणि जयाजी शिंदे व लक्ष्मीबाई या शिवाय कोणीही अचूक अश्वापरीक्षा करणारा नव्हता.

अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या राणी लक्ष्मीबाईंनी युध्दशस्त्रातही प्राविण्य मिळविले. बाजीरावांच्या पदरी बाळंभट देवधर नावाचे उत्तम कसरतपटू आणि कुस्तीगीर होते. त्यांनीच मल्लविद्येत पारंगत होण्यासाठी मल्लखांब नावाचा कसरतीचा वेगळा प्रकार शोधून काढला. मनाची एकाग्रता, विलक्षण चपळता, शरीराच्या तोल सांभाळण्याचे पूर्ण कौशल्य, काटकपणा आणि चतुरस्त्र भान वृद्धिंगत करणाऱ्या मल्लखांब विद्येतही राणी लक्ष्मीबाई तरबेज झाल्या.

लक्ष्मीबाईंचे वैशिष्ट्य म्हणजे पुरुषप्रधान संस्कृती असणाऱ्या समाजेने एका विधवा राणीला दुर्लक्षित करु नये, म्हणून त्यांनी धोरणीपणाने पुरुषी पोषाखात वावरण्याचे ठरविले. इ.स. १८४२ मध्ये त्यांचा विवाह झाशी संस्थानचे राजे गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी झाला. तेव्हा त्यांचे नाव बदलून लक्ष्मी असे ठेवण्यात आले.

दरबाराचे कामकाज राणीने पाहणे गंगाधररावांस पसंत नसल्याने मिळालेल्या वेळेचा उपयोग त्यांनी स्वत:च्या व्यायाम, कसरत, घोडेस्वारी, तलवारबाजी नियमित सुरु ठेवली. गंगाधरराव नेवाळकर व लक्ष्मीबाई यांना मुलगा झाला, परंतु तीन महिन्याचा असतांना तो मृत्यू पावला. मुलाच्या रुपाने वारस मिळाल्याच्या आनंदात असणारे गंगाधरराव या गोष्टीने दु:खी झाले. त्यांनी वासुदेवराव नेवाळकर यांच्या मुलाला दत्तक घेऊन त्याचे दामोदर असे नाव ठेवले. इ.स.१८५३ मध्ये गंगाधररावांचे निधन झाले.

ईस्ट इंडिया कंपनीद्वारे ब्रिटिश सरकार झाशी संस्थान खालसा करणार नाही असे पूर्वीपासून झाशीच्या ब्रिटिशांशी असणाऱ्या मैत्रीपूर्ण संबंधावरुन राणी लक्ष्मीबाईंना वाटत होते. त्यासाठी लक्ष्मीबाई स्वत: ईस्ट इंडिया कंपनीशी पत्रव्यवहार करत होत्या. या पत्रव्यवहारातून त्यांनी कंपनी सरकारच्या अन्याय बेकादेशीरपणा आणि खोडसाळपणा उघड केला. एका पात्रात त्यांनी झाशी संस्थान खालसा केले, तर पूर्ण हिंदुस्थानातील लोकांना हळहळ वाटेल. परिणामी हिंदुस्थानातील लोकांना ब्रिटिशांबद्दल

भरवसा, विश्वास वाटेल का ? अशी शंका व्यक्त करुन कंपनीला एक प्रकारचे आव्हान दिले.

कंपनी सरकारच्या बेजबाबदार अनैतिक कृत्यांनी व कंपनीच्या अधिकाराला आव्हान देण्याचे धारिष्ट्य करणाऱ्या राणी लक्ष्मीबाई या देशातील पहिल्या काही व्यक्तींमधील एक होत्या हिंदुस्थानातील संस्थाने खालसा करण्याचा निर्णय गर्व्हनर जनरल डलहौसीने घेतलेला असल्याने झाशी संस्थानही खालसा करण्यात आले. १३ मार्च इ.स.१८५४ रोजी झाशीच्या जनतेला उद्देशून जाहीरानामा काढण्यात आला. त्यानुसार दत्तक विधान नामंजूर करुन झांशी संस्थान ब्रिटिश सरकारांत विलीन करण्यात आले. त्या वेळी स्वाभिमानी राणीने 'माझी झाशी देणार नाही' असे स्फूर्तिदायक उद्‌गार काढले.

झाशी खालसा झाल्यावर लक्ष्मीबाईंना किल्ला सोडून शहररातील राजवाड्यात राहायला यावे लागले. राणी लक्ष्मीबाईंना पदच्युत झाल्याचा अपमान सहन करीत काही काळ शांत बसावे लागले होते. इ.स.१८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदूस्थानात झाला. त्याप्रमाणे ५ जून, १८५७ ला झाशीतही शिपायाचा उद्रेक झाला. केवळ ३५ शिपायांनी इंग्रजाना पळवून लावले. या परिस्थितीत इंग्रजाच्या परवानगीची वाट न पाहता राणी लक्ष्मीबाई किल्ल्यांवर राहण्यास गेल्या. पुढे २२ जुलै इ.स.१८५७ ला ब्रिटिशांनी राणींना झाशीची अधिकार सुत्रे हाती घेण्यास सांगितले. राणी पुन्हा राज्यकर्त्या झाल्या होत्या, परंतु अतिशय बिकट परस्थितीत त्यांच्या हाती राज्यकारभार आला होता. प्रजेच्या मनात असुरक्षित भविष्याबद्दल भिती होती. परंतु परिस्थिती खंबीरपणे हाताळली. दरम्यान २१ मार्च इ.स.१८५८ ला सकाळीच सर ह्यू रोज आपल्या फौजेसह झाशीजवळ आला. त्याने राणीस निशस्त्र भेटीस यावे किंवा युध्दास तयार राहावे असे कळविले. ब्रिटिशांनी केलेल्या विश्वासघातामुळे 'भारतात विदेशी शासन नकोच' असा निर्णय घेतला. ह्यू रोजने झाशीच्या किल्ल्यावर मारा करण्यास सुरुवात केली. या पराभवानंतर राणी पेशव्यांबरोबर ग्वाल्हेरला गेली. परंतु याच वेळी १८ जून इ.स. १८५८ रोजी सकाळीच ब्रिटीश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ येऊन पोहोचला. त्याने त्वरीत हल्ला चढविला. विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून सैन्यही त्वेषाने लढले. इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणारच होते. त्याच वेळी नव्या दमाची एक फौज बाजुच्या टेकडीवरुन चालून आली. दोन्हीकडून चालून आलेल्या सैन्याबरोबरच राणीचा निभाव लागला नाही.

परिस्थिती ओळखून त्या बाहेर पडल्या. थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा घोडा अडला. नेहमीचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता. तिथे इंग्रजांशी लढत असतांना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरुन खाली कोसळल्या. परंतु पुरुषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत. ते पुढे निघून गेले. घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना त्यांच्या सेवकाने मोठ्या मठात आणले. त्यांची उपचार करण्याची इच्छा नव्हती. आपला देह क्रुर इंग्रजाच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती. म्हणून सेवकांनी त्यांना मुखाग्नी दिला. राणी लक्ष्मीबाई यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी म्हणजेच १८ जून इ.स. १८५८ मध्ये ग्वालियर येथे मरण स्विकारले. अशा प्रकारे एका शूर राणीला रणांगणात वीरमरण आले.

''लडी मर्दानी वो तो झांसी वाली रानी थी !''

******

# स्वामी विवेकानंद

कु.बोंबले गायत्री (एस.वाय.बी.कॉम)



एखाद्या विशाल वटवृक्षाखाली उभे असताना त्याचा प्रचंड विस्तार पाहून आपण भारावून जातो. पण विस्तीर्ण पसरलेल्या या वटवृक्षाचे बी मोहरीहून सूक्ष्म असेल असे आपल्या मनात तरी येते काय ? स्वामी विवेकानंदाचे जीवनही असे वटवृक्षासारखेच विशाल आहे. १२ जानेवारी १८६३ रोजी कलकत्ता येथील सिमुलिया (सिमला) विभागात श्री.विश्वनाथ दत्त व भुवनेश्वरी देवी या माता पित्यांच्या पोटी या दिव्य बालकाचा जन्म झाला. त्यावेळी कुणाला कल्पना असेल की ह्याच्या उण्यापुऱ्या एकोणचाळीस वर्षांच्या आयुष्यात एक प्रचंड व्यक्तिमत्त्व विकसित होईल; देश व काल यांच्या सीमा ओलांडून जे जगभर संसार करील. निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या परिस्थितीत वाढलेल्या स्त्री-पुरुषांमध्ये आत्मिक शक्तीचा शाश्वत महिमा जगातील; सत्य, न्याय, मैत्री यांची प्रेरणा देत राहील; लोककल्याणाची सतत स्फूर्ती देत राहील! जन्मजात सौंदर्य घेऊन आलेले हे देवी बाळ दिसामासांनी वाढत होते. एका तेजस्वी, प्रतिभावंत, शुरवीर, पराक्रमी अशा प्रियदर्शन युवकात परिणत झाले.

नरेंद्रनाथ दत्त नावाचा हा तरुण पुढे स्वामी विवेकानंद होईल याची कुणालाही कल्पना नव्हती, परंतु अठरा वर्षांच्या या युवकाला रामकृष्णांनी प्रथमदर्शनीच ओळखले होते. तो कोण आहे व त्याच्या जन्माचे प्रयोजन काय हे त्यांनी जाणले होते. जीवनपट प्रकाशमान झाला होता.

नरेंद्रनाथ दक्षिणेत येण्यापूर्वीच भगवान रामकृष्णांना एक अलौकिक दर्शन झाले होते. त्यावरुनच त्यांना नरेंद्रनाथांच्या स्वरुपाची ओळख झाली. या संबधात एकदा ते म्हणाले होते-एके दिवशी मन समाधीतून एका ज्योतिर्मय मार्गाकडे धाव घेऊ लागले. वर वर जात जात सूर्यचंद्र-तारकांमंडित स्थूल जग ओलांडून ते सूक्ष्म अशा भावजगतात प्रविष्ट झाले. मार्गाने दुतर्फा देवदेवतांच्या भावघन अशा मूर्ती उभ्या होत्या. मन आता या भावजगातल्या अंतिम सीमेवर येऊन पोहोचले होते. एका ज्योतिर्मय देहधारी सप्तर्षी ध्यानमग्न बसले आहेत. ज्ञान आणि पुण्य, त्याग आणि प्रेम यांच्या बाबतीत मानवांच्या नव्हे तर देवदेवींच्याही ते पुढे गेलेले आहेत. विस्मित होऊन मी त्याच्या महात्म्याविषयी विचार करु लागलो इतक्यात पाहिले की समोरच्या त्या असीम अनंताच्या राज्यातील ज्योतिर्मंडलाच्या एक अंग घनीभूत होऊन एका दिव्य शिशुच्या देवशिशुने सप्तर्षींपैकी एकाजवळ येऊन आपले सुकुमार हात त्याच्या गळ्यात टाकले नि आपल्या वीणेच्या स्वरापेक्षाही मधुर नादयुक्त अमृतमय वाणीने त्यांना टाकारुन समाधीतून मागे करण्याचा तो पुन्हा पुन्हा प्रयत्न करु लागला, त्या कोमल व प्रेमळ स्पर्शाने ऋषी समाधीतून बाहेर आले व आपल्या अर्धोन्मीलित नेत्रांनी त्या सुंदर देवशिशुकडे बघु लागले. ऋषीच्या चेहऱ्यावरील प्रफुल्ल भाव पाहून वाटु लागले की हे बालक फार पूर्वीपासून त्यांच्या चांगल्याच परिचयाचे असावे. त्याची छबी जणू त्यांच्या ह्रयात साठवलेली असावी. त्या अद्‌भूत

देवशिशूने आनंदीत होऊन त्यांना सांगितले- मी जातो आहे. तुम्हालाही माझ्याबरोबर यावे लागेल. ऋर्षीनी जणू आपल्या नेत्रांनीच होकार दिला. काही वेळ प्रेमादृष्टीने बाळाला बघून ते परत समाधीमग्न झाले. त्यानंतर मी आश्चर्याने पाहिले की त्यांच्या शरीर-मनाचा एक अंश एका उज्वल ज्योतीत परिणत झाला. नरेंद्रला पाहताच मी ओळखले की हाच तो ऋर्षी '' येथे सांगायला नको की ऋर्षीला आपल्या कोमल हातांची मिठी घालणारे दिव्य शिशू म्हणजे रामकृष्ण स्वत:च होत. त्यानीच त्या ऋषीला आपला लीला-सहचर म्हणून या भुतलावर अवतीर्ण होण्यास सांगितले. ते ऋषी म्हणजेच नरेंद्रनाथ.

नरेंद्रनाथांविषयी रामकृष्ण असेही म्हणत- '' नरेंद्र जणू सहस्त्रदल कमल आहे. इथं इतके सारे येतात पण नरेंद्रसारखा त्यात एकही नाही.''

पुढे योगी विवेकानंदही साऱ्या जगाला दिपवून टाकणारे महान कार्य तडीस नेले. भागीरथाने स्वर्लीकीची गंगा जशी भुतलावर आणली तसेच श्रीरामकृष्णांनी सप्तर्षी मंडळातील या ध्यानमग्न ऋर्षीला जनकल्याणासाठी व जगाच्या उध्दारासाठी पृथ्वीवर आणले.

स्वामी विवेकानंद म्हणजे रामकृष्णांच्या वाणीचे मूतिमंत स्वरुप, विवेकानंदांच्या माध्यमातून राममृष्णांनी अखिल मानवतेच्या कल्याणासाठी युगधर्माची स्थापना केली. स्वामी विवेकानंदानी या युगधर्माचा जगभर प्रसार केला.

********

## फक्त तू खचू नकोस

कु.त्रिवेणी परदेशी एम.कॉम -१

संधी मिळेल तुलाही ।
लगेच हिरमसु नकोस ।।
आयुष्य खूप सुंदर आहे ।
फक्त तू खचू नकोस ।।

प्रेम तुझ्यावर करणारे ।
किती तरी लोक आहेत ।।
तुझ्यासाठी जोडणारे ।
खूप सारे हात आहेत ।।
अरे अशाच आपल्यांसाठी ।
तू ही थोड हसुन बघ।।
आयुष्य खूप सुंदर आहे।
फक्त तू खचू नकोस।।


उठ आणि उघडून डोळे ।
पहा जरा जगाकडे ।।
प्रत्येकाच्या आयुष्यात ।
काही तरी असतेच थोडे ।।
नाही नाही म्हणून ।
उगाच कुढत तू बसु नकोस ।।
आयुष्य खूप सुंदर आहे ।
फक्त तू खचू नकोस ।।

सामर्थ्य आहे हातात जर ।
स्वप्ने डोळ्यात घेऊन चल ।।
परिस्थितीशी भिडवून छाती ।
दोन हात करत चल ।।
विजय तुझाच असेल ।
तेव्हा मागे वळून बघू नकोस ।।
आयुष्य खूप सुंदर आहे ।
फक्त तू खचू नकोस ।।

********

# राजमाता जिजाऊ !!

कु.शेजुळ वैष्णवी (एफ.वाय.बी.कॉम)



" महाराष्ट्राच्या मातीमध्ये रोवलेली,
पहार काढून ज्या माऊलीने,
गुलामगिरीच्या छाताडावर केला प्रहार,
केला त्या विश्वमाता, राष्ट्रमाता,
राजमाता माँ साहेब जिजाऊ यांना
मानाचा मुजरा !

जिजामाताचे माहेर बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडचे होते त्यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी झाला. जाधव कुटुंब देवगिरी येथील यादव घराण्याचे वंशज, जिजामाताचा विवाह १६०५ साली शहाजीराजा सोबत दौलताबाद येथे झाला. भोसले आणि माहेरच्या जाधव घराण्यात वैमनस्य निर्माण झाल्यानंतर त्यांनी पतिनिष्टेला महत्त्व देत माहेरशी कायमचे संबध तोडले. भावनांना आणि नात्याला बाजूला ठेवून कर्तृत्वाला महत्त्व देत खंबीरपणे व धैर्याने त्या प्रत्येक प्रसंगात उभ्या राहिल्या आणि त्यांचा हाच गुण शिवरायांच्या अंगी देखील आला होता.

माता केवळ मायाळू नसून शक्ती असू शकते. याच सर्वात मोठ उदाहरण जिजाबाईच असू शकतात. राजमाता जिजाऊ यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज घडवले. स्वराज्य संकल्पनेची बी मातेनेच आपल्या शिवरायांच्या मनात पेरले. तुम्हाला स्वराज्य निर्माण करायचे आहे असा प्रचंड आत्मविश्वास शिवरायांमध्ये निर्माण केला. बालपणापासून त्यांना तयार केले.

राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, राणी लक्ष्मीबाई, बहिणाबाई, कल्पना चावला, इंदिरा गांधी, सिंधुताई, मदर तेरेसा अशा बरीच नाव घेणाऱ्याचं संपूर्ण लेख संपून जाईल. पण स्त्रिया अशा असामान्य स्त्रिया ज्यांनी स्वत:चे एक असे वेगळे स्थान निर्माण होते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियालाही काही करु शकतात. राजकारण, समाजकारण, व्यवसाय, क्रीडा, मनोरंजन, कोणतेही क्षेत्र ह्या आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया आपले स्थान राखून आहेत.

एकीकडे स्त्री-पुरुष समानतेचे नारे देणारे आपण आणि दुसरीकडे स्त्री म्हणून हिणवणार आपणच. जरा मागे इतिहासात डोकावले तर राजमाता जिजाऊ डोळ्यासमोर दिसतील, कोण होत्या त्या? आऊसाहेब राजमाता जिजाऊंचे शिवाजी महाराज पुत्र होते. स्वराज्याचे बाळकडू राजांनी त्यांच्याकडून घेतले. यवनांनी दिलेल्या त्रासाला प्रत्युत्तर त्यांनीच दिले. जर त्या स्त्री मधील जिजाऊ जागी झाली, तर आपला संहार निश्चित यवनांना अद्दल घडवणारी आहे. स्त्रीच इंग्रजाना धडा शिकवणारी स्त्री समाजासाठी खपणारी स्त्रीच. देशाचं नाव सातासमुद्रापार नेणारी स्त्रीच आणि कर्तृत्वान देखील स्त्रीच.

आपल्याप्रमाणेच मनुष्य जन्मधारण करुन देखील अनेक भूमिका एक स्त्री लीलया बजावते. मुलगी बनून जन्म घेते आणि घरात लक्ष्मीला घेऊन येते. बहिण बनून भावाचा आधार बनते. सुख दु:खातली साथी बनते. बायको होऊन नवी सुरुवात करते. त्याग आणि नव्याचा याच उत्तम उदाहरण बनते. कुणा एकाच अर्ध आयुष्य बनून जाते. आई होऊन जगातल सर्वोच्च स्थान मिळवते.

माया, काळजी, प्रेम जिव्हाळा आणि अशा बऱ्याच भावनाची व्याख्या समजावते. प्रत्येक भूमिकेला न्याय देतच जी जगत असते. मग अशा स्त्रीचा आदर ठेवण्यासाठी एक दिवस राखून का ठेवावा लागतो ? कुठेतरी आपण कमी पडतोय नाहीतर असा भेदवाव कधी जन्मलाच आला नसता किंवा इतके वर्ष जगलाही नसता. पण आता बदल घडवायला हवा. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानतो आपण आता त्यांचे आदर्श विचार आचरणात आणायला हवेत. स्त्री समाजाची गरज आहे, स्त्री लक्ष्मी आहे, स्त्री जिजाऊ आहे, स्त्री देवी आहे, स्त्री आई आहे, अशा या विशाल व्यक्ती महत्त्वाला माझे प्रणाम.

शिवाजी महाराज १४ वर्षाचे असताना शहाजीराजांनी त्यांच्या हाती पुण्याची जहागीर सुपूर्त केली. अर्थातच जहागीरीची वहिवाट लावण्याची जबाबदारी जिजाईंवर येऊन पडली. कुशल अधिकाऱ्यांसमवेत जिजाबाई आणि शिवाजी पुण्यात येऊन दाखल झाले. निजामशाही, आदिलशाही आणि मुघलांच्या सततच्या सवाऱ्यांमुळे पुण्याची अवस्था अतिशय भीषण होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दादोजी कोंडदेव यांच्यासोबत नेटाने पुणे शहराचा पुनर्विकास केला. सोन्याचा नांगर फिरवून त्यांची शेतजमीन नांगरली, स्थानिक लोकांना अभय दिले. शिवाजी या राजांच्या शिक्षणाची जबाबदारी पेलली. जिजाबाईंनी शिवाजीला पारतंत्र्यात सुरु झालेल्या आणि स्वातंत्र्यात संपलेल्या रामायण, महाभारतातील गोष्टी सांगितल्या. जिजाबाईंनी दिलेल्या या संस्कारामुळेच नाहीत तर सदरेवर शेजारी बसवून राजकारणाचे पहिले धडेही दिले.

जिजाऊ तुम्ही नसता तर,
नसते झाले शिवराय नी शंभु छावा ...!
जिजाऊ तुम्ही नसता तर,
नसता मिळाला स्वराज्य ठेवा....!
जिजाऊ तुम्ही नसता तर,
नसते लढले मावळे....!
जिजाऊ तुम्ही नसता सूर
नसते दिसले विजयाचे सोहळे ....!

जिजाऊ खरोखर आदर्श माता आहेत. आपल्या मुलांना धैर्य, परोपकार, आत्मविश्वास, शौर्य, न्याय, निर्भय, राष्ट्रप्रेम या सर्वांचे धडे देण्याचे व त्याच्यात संस्कार शक्ती ओळखून उज्वल भविष्य निर्मितीसाठी प्रयत्न केलेच पाहिजे.

*********

## माँ होने का स्वाभाग्य मिला है

लांडे कोमल टी.वाय.बी.कॉम

नव्हा सा वो जीवन में खिला है ।।
माँ होने का स्वाभाग्य मिला है ।
गोद नही हे सकती तुझे ।
यो कैसा वरदान मिला है ।
माँ होने का स्वाभाग्य मिला है ।।

तुझे हरपर गोद मे रखकर में दुनिया को पालेती ।
तुझे जनन्य ते माँ मे मानु पुत्र तुझे को में पाऊंगी
गोद नही दे सकती तुझे ।
ये कैसा वरदान है।
माँ होने का स्वाभाग्य मिला है ।।

मच्छली हे दिल की रानी ।
पानी उसका जीवन है ।
हाथ लगाओगे ता डर जाएगी ।।
बाहर निकला ओंगे तो मर जाएगी ।।

*********

# नेताजी सुभाषचंद्र भोस

कु.आसने रुपाली (टी.वाय.बी.कॉम)



नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशा मधील कटक शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ आणि आईचे नाव प्रभावती होते. जानकीनाथ बोस हे कटक शहरातील नामवंत वकील होते. आधी ते सरकारी वकील म्हणून काम करत होते, पण नंतर त्यांनी आपली स्वत:ची वकिली सुरू केली होती. कटक महापलिकेत ते काही काळ काम करत होते. बंगालचे विधानसभेचे सदस्य ही होते. इंग्रज सरकारने त्यांना रावबहादूर हा किताब दिला होता. दत्त घराणे हे कोलकात्यातील एक श्रीमंत घराणे होते. आपल्या सर्व भावांपैकी सुभाषला शरदचंद्र अधिक प्रिय होते.

सुभाष कटक मध्ये रॅवेन्शॉ कॉलिजिएट हायस्कूल शाळेत शिकत होते. या शाळेत त्यांच्या एका शिक्षकाचे नाव वेणीमाधव दास होते. वेणीमाधव दास आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे स्फुल्लिंग जागवत. त्यांनी सुभाषमधली सुप्त देशभक्ती जागृत केली. वयाच्या १५ व्या वर्षी सुभाष गुरूच्या शोधात हिमालयात गेले होते. गुरूचा शोध असफल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदाचे साहित्य वाचून, ते त्यांचे शिष्य बनले. महाविद्यालयात शिकत असताना अन्यायाविरूद्ध लढण्याची त्यांची प्रवृत्ती जागृत झाली.

कोलकत्यातील प्रेसिडेंसी महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक अेटेन हे भारतीय विद्यार्थ्यांशी उर्मटपणे वागत असत. म्हणून सुभाषने महाविद्यालयात संप पुकारला होता. १९२१ साली इंग्लंडला जाऊन, भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले, परंतु इंग्रज सरकारची चाकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले.

१९२२ साली दासबाबूंनी काँग्रेस अंतर्गत स्वराज पक्षाची स्थापना केली. विधानसभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी, कोलकाता महापालिकेची निवडणूक स्वराज पक्षाने लढवून जिंकली. त्यांनी सुभाषबाबूंना महापलिकेचे प्रुमख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेची काम करण्याची पद्धत बदलून टाकली. कोलकात्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांना महापालिकेत नोकरी मिळवून दिली.

आपल्या सार्वजनिक जीवनात सुभाषबाबूंना एकूण अकरा वेळा कारावास भोगावा लागला. सर्वप्रथम १९२१ साली त्यांना सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. मंडाले कारागृहातील वास्तव्यात सुभाषबाबुंची तब्येत बिघडली. त्यांना क्षयरोगाने ग्रासले. परंतु इंग्रज सरकाराने त्यांची सुटका करण्यास नकार दिला. सरकारने त्यांची सुटका करण्यासाठी अट घातली की, त्यांनी औषधोपचारासाठी युरोपला जावे. पण औषधोपचारानंतर ते भारतात कधी परत येऊ शकतात हे सरकारने स्पष्ट केले नाही. त्यामुळे सुभाषबाबूंनी सरकारची अट मानली नाही. अखेर परिस्थिती इतकी कठीण झाली की कदाचित तुरुंगातच सुभाषबाबुंना मृत्यू ओढवेल असे वाटू लागले.

इंग्रज सरकारला हा धोकाही पत्कारायचा नव्हता. त्यामुळे सरकारने अखेर त्यांची सुटका केली. मग सुभाषबाबू औषधोपचारासाठी डलहौसी येथे जाऊन राहिले.

१९३० साली सुभाषबाबू कारावासात असताना त्यांची कोलकात्याच्या महापौरपदी निवड झाली. त्यामुळे सरकारला त्यांची सुटका करणे भाग पडले. १९३२ साली सुभाषबाबू पुन्हा कारावासात होते. या वेळेस त्यांना अलमोडा येथील तुरुंगात ठेवले होते. अलमोडा तुरुगांत त्यांची तब्येत पुन्हा बिघडली. वैद्यकीय सल्ल्यानुसार सुभाषबाबू यावेळी औषधोपचारासाठी युरोपला जायला तयार झाले.

३ मे १९३९ रोजी सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत फॉरवर्ड ब्लॉक पक्षाची स्थापना केली. त्यामुळे सुभाषबाबूंना काँग्रेस मधून काढून टाकण्यात आले. पुढे फॉरवर्ड ब्लॉक हा एक स्वतंत्र पक्ष बनला. दुसरे महायुध्द सुरु झाले फॉरवर्ड ब्लॉकने भारताचा स्वातंत्र्य लढा अधिक तीव्र करण्यासाठी जगजागृती सुरु केली. त्यामुळे इंग्रज सरकारने सुभाषबाबू सहित फॉरवर्ड ब्लॉकच्या सर्व मुख्य नेत्यांना कैद केले. दुसरे महायुध्द सुरु असताना तुरुंगात निष्क्रिय राहणे. सुभाषबाबूंना शक्य नव्हते. सरकारला आपली सुटका करण्यास भाग पाडण्यासाठी सुभाषबाबूंनी तुरुंगात अमरण उपोषण सुरु केले. तेव्हा सरकारने त्यांची सुटका केली. पण इंग्रज सरकार युध्दकाळात सुभाषबाबूंना मोकळे ठेवू इच्छित नव्हते. त्यामुळे सरकारने त्यांना त्यांच्याच घरात नजरकैदेत ठेवले.

नजरकैदेतून निसटण्यासाठी सुभाषबाबूंनी एक योजना बनवली. १६ जानेवारी, १९४१ रोजी पठाणी वेशभूषेत, महमद झियाउद्दीन असे नाम धारण करुन ते पोलिसांची नजर चुकवून घरातून निसटले. सुभाषबाबूंना प्रथम पुत्र शिशिर याने आपल्या गाडीतून त्यांना कोलकात्यापासून दूर गोमोह येथे पोचवले. गोमोह रेल्वे स्थानकावर फ्रंटियर मेल पकडून ते पेशावरला पोचले. पेशावर येथे भगतराम तलवारच्या सोबतीने सुभाषबाबू पेशावरहून अफगणिस्तानची राजधानी काबूलच्या दिशेने निघाले. या प्रवासात भगतराम तलवार, रहमतखान नामक पठाण बनले होते व सुभाषबाबू त्यांचे मुके-बहिरे काका बनले होते. हा संपूर्ण प्रवास त्या दोघांनी डोंगरातून पायी चालत पूर्ण केला. त्यांनी जर्मन व इटालियन वकिलातीत प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केला. पण इटालियन वकिलातील त्यांच्या प्रयत्नांना यश आले. जर्मन इटालियन वकिलातींनी त्यांना मदत केली. अखेर ओरलँडो मझयुटाची राजधशानी बर्लिन येथे पोचले. नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन जपानचे पंतप्रधान जनरल हिंदेकी तोजो यांनी त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. काही दिवसानंतर नेताजींनी जपानची संसद डायट समोर भाषण केले.

२१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी सिंगापूरात अर्जी-हुकूमत-ए-आझाद-हिंदची स्थापना केली. ते स्वत: या सरकारचे राष्ट्रपती, पंतप्रधान व युध्दमंत्री बनले. या सरकारला एकूण नऊ देशांनी मान्यता दिली. नेताजी आझाद हिंद फौजचे सरसेनापती बनले. आझाद हिंद फौजेत जपानी लष्काराने इंग्रजांच्या फौजेतून पकडलेल्या भारतीय युध्दकैद्यांना भरती केले गेले. आझाद हिंद फौजेत स्त्रियांसाठी झाँसी की राणी रेजिमेंटही बनवली गेली.

पूर्व अशियात नेताजींनी अनेक भाषणे करुन तेथील स्थायिक भारतीय लोकांना आझाद फौजेत भरती होण्याचे व त्यांना आर्थिक मदत करण्याची आवाहन केले. ही आवाहने करताना त्यांनी 'तुम मुझे खून दो, में तुम्हें आझादी दूँगा' असा नारा दिला.

महायुध्दाच्या काळात आझाद हिंद फौजने जपानी लष्काराच्या साथीने भारतावर आक्रमण केले. आपल्या फौजेला स्फूर्ती देण्यासाठी नेताजींनी चलो दिल्ली अशी हाक दिली. दोन्ही फौजांनी इंग्रजाकडून नेताजींनी ह्या बेटांचे 'शहीद' आणि

'स्वराज' बेटे असे नामकरण केले. दोन्ही फौंजानी मिळून इंफाळवर व कोहिमवर आक्रमण केले. पण नंतर जपानी लष्काराने नेतेजींना पळून जाण्यासाठी व्यवस्था केली. पण नेताजींनी झाँसी की राणी रेजिमेंटच्या मुलींच्या साथीने शेकडो मैल चालत जाणे पसंत केले. अशा प्रकारे नेताजींनी एक आदर्शच समोर ठेवला.

६ जुलै १९४४ रोजी आझाद हिंद रेडिओ वरचे आपले भाषण नेताजींनी गांधीजींना उद्देशून केले. या भाषणाच्या माध्यमातून नेताजींनी गांधीजींना जपानकडून मदत मागण्याचे आपले कारण व आझाद हिंद फौज यांची स्थापना करण्यामागचे उद्दिष्ट स्पष्ट केले. या भाषणात नेताजींनी गांधीजींचा 'राष्ट्रपिता' असा उल्लेख करत आपल्या युध्दासाठी त्यांचा आशीर्वाद मागितला. अशाप्रकारे नेताजींनी गांधीजीना सर्वप्रथम राष्ट्रपिता असे संबोधले.

********



## मुलगी

कु.कुऱ्हे पूजा एम.कॉम -१

पोरीची पसंती आली की बापाच काळीज धडधडतं
चिमणी घरटं सोडणार म्हणून आतल्या आत खूप रडतं !

हसरे खेळकर बाबा एकदम धीर गंभीर दिसू लागतात
पोरीला पाणी मागण्यापेक्षा स्वतः उठून घेवू लागतात !

या घरातला चिवचिवाट आता कायमचा थांबणार असते
म्हणून बाप लेक झोपल्यावर तिच्याकडे पाहुन रडत असतो !

अंबुच्या लिंबुच्या करत करत मोठी कधी झाली कळलं नाही
बाप सांगतो तिला सोडून मला पाणीही गिळत नाही !

दिवसातून एकदातरी मायेनं जवळ घ्यावं वाटतं
परक्याच धन असलं तरी द्यायला मात्र नको वाटतं !

उठल्यापासून झोपेपर्यंत बाबाची काळजी घेत असते
आज ना उद्या जाणार म्हणून पोरगी जास्तच लाडाची असते !

पोरगी जाणार म्हणंटकी बाप आतुन तुटून जातो
कळत नाही बैठकीतून अचानक का उठून जातो !

इकडे तिकडे जाऊन बाबा गुपचुप डोळे पुसत असतात.
लेकीच कल्याण झालं म्हणून पुन्हा बैठकीत हसत असतात !

तिचा सगळा जीवनपट क्षणाक्षणाला आठवत राहतो
डोळ्यात येणाऱ्या आसवांना बाबा परत पाठवत राहतो !

बी.पी.ची. गोळी घेतली का ? आता कोण विचारील गं ?
जास्त गोड खाऊ नका म्हणून कोण कशाला दटवील गं ?

बाबा कुणाच ऐकत नाही पण पोरीला नकार देत नाहीत
तिने रागान पाहिल की मग ताटात गुलाबजाम घेत नाही !

एका अर्थाने पोरगी म्हणजे
काळजी करणारी आईच असते
पोटचा गोळा देणाऱ्याची
कहाणी फार वेगळी असते.....
कहाणी फार वेगळी असते.....

********

# यशस्वी महिला व्यवस्थापक

**चंदा कोचर**

कु. तुपे आश्विनी (टी.वाय.बी.कॉम)



चंदा कोचर (एम.डी.चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर,आय.सी.आय.सी.आय.बँक) यांच्या बँकींग क्षेत्रातील यशामुळे त्या सर्वात जास्त ओळखल्या जातात. मेहनत व ध्येयाच्या मदतीनेच आपण यशाच्या शिखरावर पोहचू शकतो हे चंदा कोचर यांनी सिध्द केले. सलग ५ वर्ष आय.सी.आय.सी.आय बँकेला 'बेस्ट रिटेल बँक' पुरस्कार चंदा कोचर यांच्या नेतृत्वामध्ये मिळाले. भारतातीलच नाही तर मोस्ट पॉवरफुल वुमन इंटरनॅशनलच्या यादीतही चंदा कोचर यांचा समावेश आहे.

**बालपण व शिक्षण :**

चंदा कोचर यांचा जन्म जोधपूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सेंट अँजोला सोफिया स्कुल, जयपूर येथे झाले. नंतर त्या मुंबईला आल्या व मुंबईच्या जयहिंद महाविद्यालयातून वाणिज्य शाखेतून पदवीधर झाल्यानंतर त्यांनी आय. सी. डब्ल्यू. ए. आय. चा कोर्स पूर्ण केला. कॉस्ट अकाऊंटिंग विषयातील प्रविण्यासाठी त्यांना जे.एज.बोस सुवर्ण पदक मिळाले. कोचर यांनी जमनालाल बजाज व्यवस्थापन संस्थेतून एम.बी.ए.ची पदवी घेतली आहे. व्यवस्थापन शास्त्रात त्यांना वोक्हार्ड सुवर्ण पदक मिळाले.

**व्यावसायिक जीवन :**

१९८४ ते १९९३ : १९८४ साली व्यवस्थापकीय प्रशिक्षत आणि गुंतवणुक, महामंडळ (तेव्हाची ICICI आताची आय.सी.आय.सी.आय. बँक) येथे रुजू झालेल्या कोचर २००१ मध्ये याच बँकेच्या संचालक म्हणून निवडल्या गेल्या.

भारतीय औद्योगिक पत आणि गुंतवणूक महामंडळातील सुरुवातीच्या वर्षांमध्ये त्या कागद, कपडा आणि सिमेंट उद्योगातील प्रकल्प मुल्यमापनाचे काम करीत होत्या. १९९३ ते २००९ : १९९० च्या दशकात कोचर यांनी ICICI बँक स्थापन करण्यात मोठा सहभाग घेतला. १९९३ मध्ये ही बँक स्थापन करणाऱ्या अंतर गटामध्ये कोचर यांची निवड झाली. १९९४ मध्ये सहाय्यक महाव्यवस्थापक आणि १९९६ मध्ये उपमहा व्यवस्थापक म्हणून त्यांची पदोन्नती झाली. १९९६ मध्ये आयसीआयसी बँकेच्या ऊर्जा, दूरसंचार आणि परिवहन अशा पायाभूत उद्योगांची वाढ करणाऱ्या समुहाच्या अध्यक्षपदी त्यांची नेमणूक झाली. १९९८ मध्ये आयसीआयसी बँकेच्या २०० प्रमुख ग्राहकांशी संबंध ठेवणाऱ्या मुख्य ग्राहक समुहाची सुत्रे त्यांनी हाती घेतली.

२००० साली कोचर यांच्या नेतृत्वाखाली ICICI बँकेने किरकोळ बँकींग व्यवसायाचे वितरण आणि परिणाम वाढवणाऱ्या दृष्टीने नवप्रवर्तन, तंत्रज्ञान आणि प्रक्रियांचे पुर्नगठण सुरु केले. एप्रिल २००१ मध्ये कोचर कार्यकारी संचालक बनल्या. २००६ मध्ये त्यांची उप-व्यवस्थापकीय संचालक म्हणून नेमणूक झाली. २००६-०७ मध्ये त्यांनी बँकेने आंतरराष्ट्रीय तसेच नियमीत व्यवसाय हाताळले. कोचर यांच्या नेतृत्वाखाली २०१७ साली ICICI बँकेने सलग चौथ्या वर्षी भारतातील

सर्वोत्तम किरकोळ बँक हा द एशियन बँकर या मासिकाचा किताब पटकावला. २००९ ते आजपर्यंत : २००९ मध्ये कोचर यांची ICICI बँकेच्या, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती झाली.

ICICI समुहाबरोबरच कोचर जपान बिझनेस फोरमच्या युएस इंडिया सीईओ फोरम, व्यापार मंडळाच्या सदस्य आहेत. भारतीय बँक संघटनेच्या त्या उपाध्यक्ष आहेत. आय. आय.टी. वडोदरा संचालक मंडळाच्या त्या प्रमुख आहेत. इन्स्टिट्युट ऑफ सिक्युरिटी मार्केट या संस्थेच्या संचालक मंडळावर आहेत.

भारतीय पंतप्रधानाच्या व्यापार आणि उद्योग मंडळाच्या त्या सदस्य होत्या. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या त्या २०११ मध्ये उपाध्यक्ष होत्या. २०१५-१६ मध्ये जगातील ३० देशातील सुमारे ७० उद्योगांना एकत्रित आणणाऱ्या इंटरनॅशनल मॉनेटरी कॉन्फरन्स या संस्थेच्या त्या अध्यक्ष होत्या.

**कौटुंबिक माहिती :**

कोचर यांचे वडील रुपचंद अडवाणी हे जयपूर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. चंदा कोचर यांचे पती दिपक कोचर हे वायुऊर्जा क्षेत्रातील तज्ञ मानले जातात. हे दोघे व्यवस्थापन प्रशिक्षणातील सहाध्यायी होते.

**पुरस्कार आणि सन्मान :**

२०१७ साली वॉशिंग्टन येथील वुड्रो विल्सन केंद्राने वैश्विक निगमीत नागरिकतेसाठी चंदा कोचर यांना वुड्रो विल्सन पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. या पूर्वी हा पुरस्कार केवळ ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि इन्फोसिसचे संस्थापक एन.आर.नारायणमूर्ती या दोनच भारतीयांना मिळाला होता.

२०१७ साली प्रसिध्द झालेल्या फोर्ब्ज मासिकाच्या आंतरराष्ट्रीय प्रभावशाली महिलांच्या यादीत चंदा कोचर यांचा क्रमांक बत्तीसावा होता.

२०१५ साली प्रसिध्द झालेल्या टाईम मासिकाच्या १०० जगातील शंभर प्रभावशाली व्यक्तींच्या यादी मध्ये चंदा कोचर यांना स्थान मिळाले.

२०११ मध्ये कॅनडा येथील कार्लटन विद्यापीठाने कोचर यांना मानद विद्यावाचस्पती ही पदवी दिली आहे. विद्यापीठाने श्रीमती कोचर यांनी आर्थिक क्षेत्रात केलेले मूलभूत योगदान, आर्थिक अडचणीच्या काळात दाखवलेले नेतृत्वगुण व्यावसायिक जीवनात वापरलेल्या तत्वांच्या सन्मानार्थ ही पदवी देऊ केली आहे.

********

" कर्मवीरांचे कार्य खरोखर असामान्य आहे.
ते जनतेचे नामवंत उध्दारक आहेत. ते अनंत,
अनाथ दीनदुबळ्या मुला-मुलींचे संसार व सुख
पाहत आहे...
शेतकऱ्यांचे थोर मन, दुसऱ्यांसाठी काबाडकष्ट
करण्याची वृत्ती आणि म्हणूनच मला वाटते की,
शेतकऱ्याने मनावर घेतले तर भाऊरावांवर
पैशाची व अन्नधान्याची धार पडेल."
-संत गाडगे महाराज

# सावरकर विचार

कु.सोनार पल्लवी (एफ.वाय.बी.कॉम)

''सळसळत्या रक्ताचा, धगधगता ज्वालामुखी म्हणजे 'सावरकर'. ज्यांची लेखणी माझ्यासाठी नेहमीच आदरणीय, आणि वंदनीय असामान्य व्यक्तिमत्त्व, आणि कर्तृत्वज्ञान देशभक्त. आपल्या विविध पैलूंनी आपली प्रतिभा प्रकट करणारे प्रगाड बुद्धीवादी स्वातंत्र्यवीर सावकरांना मानाचा मुजरा ''

अनेक फुले फुलती। फुलोनिया सुकुणी जाती।।
कोणी त्यांची महती गणती ठेविली असे ।।
अमर होय ती वंशलता ।
निर्वंश जिचा देशाकरिता ।।

परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल संदेह बालगणाच्या अज्ञेयवादी सावरकरांना परमेश्वरा समान माननारे काही लोक आढळतात. त्या उलट त्यांची उपेक्षा करणारे, त्यांच्यावर टीकटीप्पणी करणारे व मृत्यूनंतरही त्यांच्याविषयी सूडभावना बाळगणारे अन्य काही लोक आहेत. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कार्य करुनही आंतरराष्ट्रीय समाजाला दिशा देणारे सावरकर राष्ट्रीय क्षितीजावर विस्मरणाच्या कक्षेत गेलेले दिसतात. 'राष्ट्रीय स्वाहा राष्ट्रीय इदं न मम' असे समिधेसमान जीवन जगणाऱ्या सावरकरांच्या नेतृत्वाविषयी कृतज्ञता बाळगली नाही तर भारताच्या उदात्त आणि उन्नत अशा मुल्यात्मक संस्कृतीची ध्वजा खांद्यावर घेण्याचा आपणास अधिकारच उरणार नाही. नेतृत्वावरील निष्ठेतून त्यांना ईश्वरासमान मानले तर आपली भूमिका त्यांच्या विज्ञानानिष्ठेशी विसंगत ठरेल. एखाद्या विचारवंताचे समग्र विचार सर्वांना मान्य होतील असे नाही वैचारिक मतभेद असू शकतात; परंतु व्यक्तिगत सुखाला तडीपार करुन जीवनाचे वैराण वाळवंट करणाऱ्या सावरकरांच्या पारदर्शक देशभक्तीविषयी संदेह असू नये. सावरकर जीवन व विचार कार्याला निव्वळ ऐतिहासिक महत्त्व नाही. आजच्या संदर्भात त्याचे परिशीलन केले गेले पाहिजे.

परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे अनेक जण हताश व निराश होतात. या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी त्यांनी सावरकरांच्या खडतर जीवनप्रवासाचा विचार करावा व त्यातूनच प्रेरणा घ्यावी. सावरकरांचा जन्मच मुळी सनातन वैदिक ब्राम्हण कुंटुबात झाला. परंपराचा प्रभाव असलेले कौटुंबिक वातावरण होते. अशा स्थितीत बहुसंख्य लोक परिस्थितीशी जुळवून घेतात व परंपरेचे पाईक होतात. फार थोडे लोक प्रवाहाच्या विरोधात प्रत्यक्ष भूमिका घेतात. त्यातील परंपराचा चिकित्सक विचार करतात. सावरकर अशा अतिथोड्या लोकांत अग्रणी होते. कुंटुबातील प्रतिकूलता फार तीव्र असू शकत नाही, कारण कुटुंब घटक भावनेने एकमेकांशी जखडलेले असतात. सावरकरांची स्थिती अशीच होती. त्यांच्या बाबतीत बाह्य परिस्थितीतील प्रतिकूलता मात्र गंभीर स्वरूपाची होती.

मातृभूमीला पारतंत्र्यांतून मुक्त करुन समाजाला वैभवाचे दिवस प्राप्त करुन देण्याचा सावरकरांचा जीवन संकल्प होता. ब्रिटीश सरकारविषयी सहानुभूती बाळगणारे नेमस्त नेते सरकारच्या अन्यायी व अत्याचारी धोरणांमुळे निराश झाले होते. नेमस्तांतील नेमस्त असलेले दादाभाई नवरोजी म्हणाले '' माझी इतक्या वेळा निराशा झाली की, माझे अंत:करण विदीर्ण झाले आहे. नैराश्यातून कोणतीही व्यक्ती बंड करील अशी मला भीती वाटते.'' २५ एप्रिल १९०७ रोजी लोकमान्य टिळकांनी श्यामजी कृष्ण वर्मा यांना लिहिलेले पत्र बोलके आहे. ते लिहितात,'' दादाभाईंचे असे स्पष्ट मत आहे की, जर ब्रिटिश सरकारने सवलती रोखून धरल्या तर परिस्थिती

अधिक बिघडेल व तरुण पिढीला आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अन्य मार्गाचा अवलंब करावाच लागेल. '' महात्मा गांधीना देखील ब्रिटीश राजवटीत होणारा अन्याय असह्य झाला होता.

दादाभाई नौरोजी पासून महात्माजीपर्यंत थोर नेते ब्रिटिश राजवटीसंबंधी निराश झाले होते. सावरकरांचे प्रथमपासून असे मत होते की,'आपण शास्त्रामुळे गुलामगिरीत सापडलो. आपण शस्त्रातूनच स्वतंत्र होऊ शकतो. त्यांच्या या आक्रमक मार्गाला नेमस्तांचा विरोध होता. हिंसाचार हा कधीही अनैतिकच असतो, अशी त्यांची दृढ भावना होती. जहाल नेत्यांची स्थिती निराळी होती. त्यांच्या मनात क्रांतीकारकाच्या देशभक्तीबद्दल आदरभाव होता. परंतु ब्रिटिश सरकारजवळ दंडशक्ती अधिक असल्यामुळे व ते पाशवी सामर्थ्यांचा अमानुष उपयोग करु शकत असल्यामुळे सशस्त्र क्रांतीकारकांना त्यांचे उद्दिष्ट सफल करण्यात यश मिळणार नाही, याची जहाल नेत्यांना खात्री होती. राष्ट्रीय सभेला सुरुवातीला नेमस्तांचे व नंतर जहालांचे नेतृत्व होते. राष्ट्रीय सभेच्या पाठीशी मोठा भारतीय समाज होता. सावरकरांसारख्या क्रांतीकारकाच्या दृष्टीने राजकीय वातावरण प्रतिकूल होते.

भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य हे सावरकरांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. सशस्त्र क्रांतीतूनच ते प्राप्त होईल यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. त्यांच्या प्राथमिक स्थितीत ब्रिटिश प्रशासनासमोर दहशतवादी कृत्याचे आव्हान उभे करायचे होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करण्यासाठी गुप्त स्वरुपाची कटकारस्थाने करायची होती. कटकारस्थानात भाग घेणाऱ्या देशभक्तांची मानसिकता 'हुतात्मा' होण्याची असावी लागते. हौतात्म्य ही सोपी गोष्ट नाही. हौतात्म्य म्हणजे हालअपेष्टायुक्त मरण होय. हे कार्य अवघड कारण माणूस निर्सगत: जगण्यावर प्रेम करतो. सामान्य माणसे अशा कटकारस्थानात सामील होत नाहीत. त्यांच्या मनात क्रांतिकारकांविषयी आदर व सहानुभूती असली तरी प्रत्यक्षात उघडपणे ते अशा देशभक्तांच्या मागे उभे राहत नाहीत. देशभक्तीने भारावून गेलेले मुठभर तरुण याला अपवाद असू शकतात. अशा प्रकारच्या कटकारस्थानांचा इतिहास असे दर्शवितो की, कटकारस्थान करण्यात एखादा दुर्बल घटक ठरतो. त्याला मरणाची भीती वाटते तो माफीचा साक्षीदार होतो. कटकारस्थानात उघडकीस आणतो. देशभक्तांना शिक्षा होते. भिन्रा समाज व अशा प्रकारचा दुर्बल घटक या दोन्ही गोष्टीचा अनुभव सावरकरांना आला. सावककरांना प्रतिकूल परिस्थितीतून जावे लागले.

भारताचे स्वातंत्र्य हेच जीवनाचे अंतिम उद्दिष्ट मानून त्यासाठी सशस्त्र क्रांतिचा मार्ग अबंलविणाऱ्या बॅरिस्टर वि.दा.सावरकर या तरुण क्रांतीकारक वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी पन्नास वर्ष काळ्या पाण्याची शिक्षा झाली. अंदमानातील कारावासावर आधारित ज्यांनी लिहिलेली ''माझी जन्मठेप आणि काळे पाणी'' दोन पुस्तके क्रांतीकारकांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीने व ध्येयवादी जीवननिष्ठाचे वस्तुपाठ आहे. वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधु यांच्या क्रांतिकार्याचा आणि लोकमान्य टिळक, जोसेफ मॅसिनी यांच्या राष्ट्रवादी विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता; तर १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध हे त्यांचे प्रेरणास्त्रोत होते. त्यांना भारताचे स्वातंत्र्यवीर ही संबोधने वापरली गेली ती त्यामुळेच चौदा वर्षाच्या शिक्षेनंतर अंदमानातील तुरुंग वासातून ब्रिटिश सरकारने त्यांची मुक्तता केली, पण राजकारणातील त्यांच्या सहभागावर बंदी घालून त्यांना रत्नागिरी येथे स्थानबध्द केले, त्या काळात त्यांनी मराठी भाषा-शुद्धीकरण, जातिनिर्मूलन व विज्ञानानिष्ठ या तीन क्षेत्रात कार्य केले, तेव्हा त्यांच्यातील समाजसुधारकाचे दर्शन जनतेला झाले. स्वातंत्र्योत्तर काळात बलवान भारताची निर्मिती या ध्येयपूर्तीसाठी ते कार्यरत राहिले.

********

## मुलगी

गिरणारे सागर टी.वाय.बी.कॉम

बरं झाल देवा, दिली एक कन्या ।
तिच्यामुळ मला कळली ही दुनिया ।।

तुरु तुरु चालताना बोलायचे पैंजण ।
शोभा आली घरा, तिनं फुलवलं आंगण ।।

बोबडे तिचे बोल, तिचे केस भुरू भुरु ।
बाबा आनंदून म्हणती, किती लाड करु ।।

वाढू लागली लेक, झाली माझी आई ।
काढू लागली चुका, म्हणते तुम्हाला कळत नाही ।।

घरभर फिरत असते, खूप तिची बडबड ।
मदत करते तुला म्हणत करते किती गडबड ।।

येता- जाता घरात मला मारत असते मिठी ।
सदान्‌कदा नाव तिचेच माझ्यासुध्दा ओठी ।।

खरंच का ही लेक कधी जाईल मला सोडून ।
नुसत्या विचारानेसुध्दा कंठ येतो दाटून ।।

## उरले फक्त सांगण्यापुरते गाव

कु.कुऱ्हे पूजा एम.कॉम -१

बदलली सर्व माणसे ।
बदलले सारे गाव ।।
उरले फक्त गावचे ।
सांगण्यापुरते नाव ।।

कधी कधी दाटतात ।
बालपणीच्या आठवणी ।।
अजुनही मनात घोळतात ।
प्रेमळ माणसे जुनी ।।

पण आता गाव वाटते ।
खूप खूप परके ।।
राहिले नाही आता ते ।
आपल्या मागच्या सारखे ।।

पूर्वी इथे असायची ।
माणसांमाणसात ओढा ।
इथल्या पाहुणचाराला ।
जगात नव्हती तोड ।।

आता भरले आहे ।
नसानसात राजकारण ।।
बोलावे तरी कुणाशी ।
आपल्याच तोऱ्यात प्रत्येकजण ।।

आपलेच ओढतात इथे ।
आपल्यास माणसाचे पाय ।।
मग परक्यांनी ओढले ।
तर त्याचा दोष काय ।।

तरी सुध्दा वाटते जावे ।
अजुनही आपल्या गावी ।।
जुन्या घरात एखाद्या ।
परत आपुलकी शोधावी ।।

# आजचा तरुण कसा असावा

गिरणारे सागर (टी.वाय.बी.कॉम)

आजच्या तरुणावर देशाचा विकास, येणारा काळ आणि निर्माण होणाऱ्या अडचणी अवलंबून असतात. म्हणूनच आजचा तरुण हा सरळ आणि ज्ञानी असावा. तरुणाला, गेलेला काळ कसा होता, सुरु असलेला काळ कसा आहे आणि येणारा काळ कसा असेल याची जाणीव असावी.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली आहे. तरुणांनी आपला आत्मविश्वास जागृत करायला हवा. ज्यांचा आत्मविश्वास जागृत झाला. तो जीवनात यश मिळवू शकतो. म्हणूनच स्वामी विवेकानंद म्हणतात, या देशाचा इतिहास म्हणजे मुठभर आत्मविश्वास जागृत केलेल्या तरुणांचा आहे. म्हणूनच ते म्हणतात मुठभर आत्मविश्वास असणारे मला मिळाले तर मी या देशाचा विकास घडवून आणेन.

जे जाते पण परत नाही येत ते तारुण्य म्हणूनच सर्व संधीचा फायदा तरुणांनी घेतला पाहिजे. आपल्यापुढील आव्हाने स्विकारली पाहिजेत. तरुण हा शारीरिक, मानसिक, बौध्दिक व नैतिकदृष्ट्या सक्षम व संपन्न असले पाहिजेत. चांगली माणसे आयात करता येत नाहीत ती घडवावी लागतात. घडलेल्या तरुणाशिवाय या देशाला तारुणोपय नाही, तरुणांचे हात हे उगारण्यासाठी नसून उभारण्यासाठी आहेत.

समाजातील ढोंग, भ्रष्टाचार आणि वाईट सवयी यांवर आळा घालून नवे जग निर्माण करण्यासाठी तरुणांनी एकत्र यावे. ज्याला जगावे कशासाठी आणि मरावे कशासाठी हे समजते तो तरुणांच्या जीवनाला ध्येय असले पाहिजे. ध्येयाचा ध्यास असलाच पाहिजे. त्यामुळे आपत्ती -विपत्तीचा त्रास होत नाही. त्यांनी ध्येय साध्य करण्यासाठी कष्ट घेतलेच पाहिजेत. तरुणांची लक्षणे ही उपनिषदांमध्ये सांगितलेली आहे.

"युवास्यात: साधू, युवाध्यासक ।। आशिष्ठी, दृढिष्ठी, बलीष्ठी: ।।

तरुण हा साधू म्हणजेच सरळ, निष्कपटी, निर्मळ आणि खिलाडू वृत्तीच असला पाहिजे. गर्वाने झुकून न जाता यशाचा, तर सबब न सांगता अपयशाचा त्याला स्वीकार करता आला पाहिजे. तरुण हा नेहमी दृढ निश्चयी असला पाहिजे. स्वामी विवेकानंद म्हणतात. त्यांचे स्नायू पोलादी आहेत. ज्यांच्या मांसपेशी लोखंडी आहेत, ज्यांची छाती सिंहाची आहे आणि सागराच तळ असो किंवा आवकाश असो, तो छेदून जाण्याची प्रबळ इच्छा ज्यांच्याजवळ आहे. असे नचिकेतासारखे शंभर तरुण मला द्या, म्हणजे मी या देशात आवश्यक ती क्रांती करुन त्याचा कायाकल्प घडवून आणीन .

तरुणांनी तरुणांसारखे असले पाहिजे तरुणांसारखे वागले आणि दिसले पाहिजे. विद्रुप वेशभूषा त्यांनी करायला नको. जे घडावं अस वाटते ते घडवून आणण्याचे सामर्थ्य हे तरुणांमध्ये असते,परंतु

जवानी मस्तानी होती है।
ये बडी खतरनाक चीज होती है।
अकल होती है ,होश भी होता है।
लेकिन जोश उससे भी जादा ।
इतना जादा की वो अकल को मार देता है।

त्याला वळण लावण्याचे काम ते स्वत: युवकांचे आहे, तरुणाने व्यसनाच्या आहारी जावू नये. व्यसन हा मनुष्याचा शत्रू आहे. आपल्या इंद्रियांना ताब्यात ठेवण्याची गुणसंपदा तरुणांमध्ये असायला हवी.

********

# ABDUL KALAM

Miss. Dhage Gauri Babasaheb (S.Y.B.Com)



*Abdul Pakir Jainulabdeen Abdil Kalam was born on October 15, 1931, in Dhanushkodi, India, the scion of a strict family (Muslim Family), This placed him some what at odds with the rest of the nation, which is predominately Hindu Kalam proved adept as a student and in 1950 won admittance to St. Joseph's College in Tiruchirappalli to study aeronautical engineering. He graduated with honours in 1958 and found work at the Madras Institute of Technology. Despite a Muslim background and devotion to his creed, Kalam mixed easily with people of other backgrounds, and he further distinguished himself by remaining a life long vegetarian and teetotaler, He was also skilled in his chosen field by personal beliefs that India must acquire self-sufficiency in rocketry and other advanced technology to gain world rexpect, His government eventually shared his point of view and,in 1962 , he helped create the nation's first rocket laboratory at Thumba. Commencing in 1963,when kalam successfully launched India's first successful Missile, the nation embarked on development of sophisticated space and weapons technology. Despite the expense associated with such devices,and the fact that one-third of India's 1 billion people live in squalor, national pride prevailed In fact, over the next two decades India endured armed con Frontations with china and neighboring Pakistan ,which lent greater impetus to their regional arms race,Kalam's fortunes crested in july 1980 when Prine Minister Indira Gandhi appointed him head scientist of India's Missile development program. In this post he supervised construstion and launching of the SLV-3,India's First satellite launch vehicle,which finally placed it on a par with the united stated, the soviet union and china, Kalam then become popularly touted in the press as India's "MissileMan".*

*For all his skill at engineering, Kalam also acquired a degree of notoriety as a nonconformist, being somberly dressed white his silver hair was kept long and unkempt and ,while*

*never forsaking his devotion to Islam, he also became conversant in Hindu religious scriptures and considers himself " 200% Indian" But above all,Kalam wished to convey his gream of developing India's potential "We must think and act like a nation of a billion people, and not like that of a million people" he insists, " Dream, Dream,Dream !" Kalam realizes the nation needs to facilitate greater access to education. for years he spoke out in faver of a grassroots revolutions, one passessing a single-minded determination of catapulting India into the ranks of the developed world. Kalam also remains unabashedly nationalistic, His missile program closely parelleled India's successful attempt to acquire nuclear weapons and, to his mind, promoted greater security with Pakistan and china. In May 1998,he also or-chestrated highly publicized underground nuclear tests which were widely condemned abroad but underscored Indian resolve for his daring vision and unflinching commitment to national security, Kalam received the Bharat Ratna-India's highest civilian award- in 1977.*

*Throughout his long and distinguished scientific career, kalam evinced no interest in politics, Therefore, eyebrows were raised in the spring of 2002 when he suddenly emerged as a candidate for the Indian presidency This office is largely ceremonial, although its duties include choosing the party From which the next prime minister will originate The incumbent executive ,kocheril Raman Narayanan, was slated to retire and fractious coalition parties needed aunifying figure they could agree upon. kalam, one of the most visible personalities in the country and a man above partisan reproach suited this perfectly. He easily won endorsements from the Hindu nationalist party of prime minister ATAL BIHARI VAJPAYEE and the opposition congress party. His opponent was Lakshmi Sahgal, an 87-year-old Freedom Fighter who was nominated by the communist party. On July 18, 2002, kalam won easily with 87% of the vote and was sworn in as president seven days later. He is the 12 th person to hold that office and only the third muslim to do so. kalam assumed his role during a tumultuous period in India's modern history. Tensions with neighboring Pakistan have increased over a religion-based civil war in kashmir province, and India has sustained terrorist attacks from muslim fundamentalists. These acts sparked tremendous indignation from the majority Hindu population, and nearly*

*1000 Muslims died in sectarian violence. The accession to office of kalam, a practicing Muslim, is anticipated to exert a calming effect, he is strongly Committed. to secularism in this badly divided nation, and also extended his hand in friendship to the Muslim leadership of Pakistan. But more than anything, kalam remains the purveyor of great dreams for his country and he sees a brighter future ahed.*



''सामर्थ्यवान व गुणवत्तेने युक्त अशी माणसे तयार करण व त्यासाठी तळमळीने प्रयत्न करणे हे भाऊरावांच्या कार्याचे रहस्य आहे. म्हणून त्यांनी जनता शिक्षणाचा नवा पायंडा-नवीन मेथड-तयार केली. बहुजन समाजात शिक्षणाने सांस्कृतिक प्रगती घडवून आणणे हे त्यांचे ब्रीद होते.''

-यशवंतराव चव्हाण

## ती ही असतात माणसं

कु.तुपे आश्विनी (टी.वाय.बी.कॉम -१)

जीवनाच्या वाटेवर,
साथ देतात, मात करतात
हात देतात, घात करतात,
ती ही असतात ... माणसं !

संधी देतात, संधी साधतात,
आदर करतात, भाव खातात
ती ही असतात ... माणसं !

वेड लावतात, वेडं ही करतात,
घास भरवतात, घास हिरावतात
ती ही असतात ... माणसं !

पाठीशी असतात, पाठ फिरवतात
वाट दाखवतात, वाट लावतात
ती ही असतात ... माणसं !

शब्द पाळतात, शब्द फिरवतात,
गळ्यात पडतात, गळा कापतात
ती ही असतात ... माणसं !

दूर राहतात, तरी जवळचीच वाटतात,
जवळ राहून देखील वागतात
ती ही असतात ... माणसं !

नाना प्रकारची अशी, नाना माणसं !
ओळखायचीच कशी.......
ती ही असतात ... माणसं !

## आठवणींच्या अंबरात

विधाटे स्नेहल (एफ.वाय.बी.कॉम)

आठवणींच्या अंबरात जगता जगता
रोज तुला लिहिता लिहिता
मन तुझ्यातच रमते..
मनाची चाहूल लागता
तुला समोर पाहता
मन क्षणात हासते
माझे लाजून हासणे
तुझे पाहून लाजणे
तुझ्या प्रेमाच्या सरीने
माझे मन मोहून हे जाते
तुला पुन्हा पाहण्या मी वळून पाहते
तुझ्या नजरेची ओढ वेड्या मनाला लागते
जाणीव या मना
तु या राधेचाच कृष्ण
असे हे क्षण
रोज जगता जगता
तुला पाहता पाहता
मन तुझ्यातच रमते
माझे मन तुझ्यातच रमते

******

## अपयश यशाची पायरी

गिरणार सागर (टी.वाय.बी.कॉम)

रडू नये भ्याडासारखे
अपयशाने,
प्रयत्न तुम्ही करा
परत नव्या जोमाने ||
लोक काय म्हणतील
याचा विचार करु नका
लोकांना हवा असतो
असाच एखादा मोका ||
कधीही समजू नका
जगात कोणाला तुच्छ,
प्रत्येकाला समजा
आपल्यापेक्षा उच्च ||
अपयशाने माणूस
खूप खचतो
पण अशावेळी त्याने
यशासाठी प्रयत्न
करायचा असतो ||
जे घडत ते सर्व
विधिलिखीत असतं
जे घडत ते
चांगल्यासाठीच घडतं||
मी ही म्हणतो
अपयश ही यशाची पायरी आहे
म्हणून अपयशाने माणसाने
खचून जाऊ नये||

******

# एकदिवसीय कार्यशाळा

## डिजीटल मार्केटिंग



कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.मीनाताई जगधने (सदस्य,मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा) समवेत इतर मान्यवर



कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना मा.दीपक कुमार (न्यू दिल्ली)



कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना पी.पी.टी.च्या साहाय्याने मार्गदर्शन करताना मा.सुमंत तिवारी (न्यू दिल्ली)



कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करुन देताना मा.प्रा.योगीराज चंद्रात्रे (प्रमुख,संगणक विभाग)



कार्यशाळेमध्ये मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी कु.झावरे श्वेता व समवेत मान्यवर




कार्यशाळेमध्ये सहभागी प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी

## सावित्रीबाई फुले जयंती समारंभ




सावित्रीबाई फुले जयंती समारंभ प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.मीनाताई जगधने (सदस्य,मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था,सातारा) समवेत इतर मान्यवर




सावित्रीबाई फुले जयंती समारंभ प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुणे मा.श्री.अनिल पवार (उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,श्रीरामपूर)




सावित्रीबाई फुले जयंती समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.डॉ.सौ.दिपाली काळे (अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर)

## राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रम



राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.मीनाताई जगधने (सदस्य,मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था,सातारा) समवेत इतर मान्यवर



राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.श्री.रणजीत श्रीगोड (अध्यक्ष, ग्राहक पंचायत, श्रीरामपूर) समवेत इतर मान्यवर



मा.मीनाताई जगधने यांच्या हस्ते राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेचे प्रमाणपत्र स्वीकारताना स्पर्धक व समवेत इतर मान्यवर

## कर्मवीर वक्तृत्व स्पर्धा

# पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील ५७ वी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा



वक्तृत्व स्पर्धा उद्घाटन समारंभ प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.प्रकाश निकम पाटील (सदस्य,जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था,सातारा) समवेत मान्यवर



पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.सुमनभाई शाह (सदस्य,जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था,सातारा) समवेत इतर मान्यवर



वक्तृत्व स्पर्धा उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करुन देताना मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर व समवेत इतर मान्यवर



पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करुन देताना समन्वयक डॉ.बापूसाहेब घोडके समवेत इतर मान्यवर



विचारांचा निखारा व शब्दांचा फुलोरा...
सहभागी स्पर्धक विचार व्यक्त करताना



पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष मा.सुमनभाई शाह मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर,परीक्षक मा.अतुल वढणे, मा.निलेश पर्बत यांचे समवेत प्रथम पारितोषिक विजेते स्पर्धक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे पदवीग्रहण समारंभ




पदवीग्रहण समारंभात स्नातकांना उद्देशून
भाषण करताना मा.मीनाताई जगधने
(सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा)




पदवीग्रहण सभारंभात स्नातकांना मार्गदर्शन करताना
प्रमुख पाहुणे मा.अनिल पवार (उपविभागीय अधिकारी तथा
उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपूर)



पदवीग्रहण समारंभात मिरवणुकीत
सहभागी प्रमुख पाहुणे व स्नातक




पदवीग्रहण समारंभात उपस्थितांचे आभार
व्यक्त करताना मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर



पदवीग्रहण समारंभात पदवी वितरणाचे वाचन करताना
परीक्षा अधिकारी डॉ.एस.आर.जावळे



पदवीग्रहण समारंभात पदवी प्राप्त स्नातक व मान्यवर

# शॉर्ट टर्म कोर्स

## ब्युटी पार्लर कार्यशाळा

## संस्था मूल्यमापन समिती



कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.मीनाताई जगधने (सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा) समवेत इतर मान्यवर



शॉर्ट टर्म कोर्स मूल्यमापन समितीचे चेअरमन डॉ.ए.एस.म्हस्के मनोगत व्यक्त करताना समवेत इतर



ॲडव्हान्स ब्राईडल मेकअपचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करताना ब्युटीशियन मा.मयुरी गोंडेकर, समवेत इतर मान्यवर



शॉर्ट टर्म कोर्स 'टेलरिंग'ची पाहणी करताना मूल्यमापन समितीचे चेअरमन मा.डॉ.ए.एस.म्हस्के, सदस्य,डॉ.एस.ए.कुलकर्णी व समवेत इतर मान्यवर



ब्युटी पार्लर क्षेत्राचे महत्त्व व करिअरच्या संधी या विषयी माहिती सांगताना ब्युटीशियन मा.मयुरी गोंडेकर, समवेत इतर मान्यवर



शार्ट टर्म कोर्स 'स्क्रिन प्रिटींग'ची पाहणी करताना समितीचे चेअरमन, सदस्य, प्राचार्य व इतर मान्यवर

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर



शिबिर उद्घाटन समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.प्रकाश निकम पाटील (सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, सातारा) समवेत इतर मान्यवर



शिबिर उद्घाटन समारंभात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.गुलाबराव पवार,(मा.चेअरमन अशोक सह.सा.का.लि.अशोकनगर)



उद्घाटन समारंभात मनोगत व्यक्त करताना मा.विनायक आंबेकर (संचालक, मनाली गार्डन) समवेत इतर मान्यवर



उद्घाटन समारंभात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना माजी प्राचार्य मा.टी.ई.शेळके व समवेत इतर मान्यवर



उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत करताना रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी डॉ.सय्यद एस.बी.



वडाळा महोदव ग्रामपंचायत परिसर स्वच्छ करताना स्वयंसेवक विद्यार्थिनी

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर



समारोप समारंभात मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुणे मा.श्री.अनिल पवार (उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपूर)




समारोप समारंभाच्या प्रमुख पाहुण्या मा.डॉ.दीपाली काळे (अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर) स्वयंसेवकाशी संवाद साधताना



समारोप समारंभात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा.श्री.सुमनभाई शाह (सदस्य,जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था,सातारा)




समारोप समारंभाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत करताना मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर



कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी, सहकारी प्राध्यापक व ग्रामस्थ



वडाळा महादेव येथे रस्ता स्वच्छ करताना स्वयंसेवक विद्यार्थी

## हिमोग्लोबीन तपासणी शिबिर



हिमोग्लोबीन तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना
मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर समवेत इतर मान्यवर



हिमोग्लोबीन तपासणी शिबिरात मुलींची हिमोग्लोबीन
तपासणी करताना मा.डॉ.शीतल हिवरकर मॅडम




राष्ट्रीय रंग उत्सव स्पर्धेत प्रावीण्य मिळविलेल्या
विद्यार्थिनी व मान्यवर

## आविष्कार स्पर्धा



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आविष्कार स्पर्धेत विद्यापीठात
निवड झाल्याबद्दल श्री.यशवंत मयूर याचा सत्कार करताना
मा.मीनाताई जगधने व इतर मान्यवर



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आविष्कार स्पर्धेत
विभागीय पातळीवर निवड झाल्याबद्दल मा.मीनाताई जगधने
यांच्या हस्ते श्री.बनकर अभिनव याचा सत्कार करताना



आविष्कार संशोधन प्रकल्प शिबिरात मार्गदर्शन
करताना मा.प्रा.मनोजकुमार लंगोटे

# विविध उपक्रम



स्पर्धा परीक्षा विभागामार्फत कु.पूनम पवार हिची महाराष्ट्र ग्रामीण बँकेमध्ये प्रोबेशनरी ऑफिसरपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना मा.मीनाताई जगधने व इतर मान्यवर



सातारा, सांगली, कोल्हापूर परिसरातील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी मदतनिधी फेरीत सहभागी मा.मीनाताई जगधने, मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर व विद्यार्थी-विद्यार्थिनी



एच.एस.सी.बोर्ड परीक्षेत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांसमवेत मा.मीनाताई जगधने,मा.प्रकाश निकम पाटील, प्राचार्य,पालक व विद्यार्थी



जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर व रयत सेवक



श्रीरामपूर पोलीस स्टेशन मध्ये मास्क वाटप करताना मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर व इतर मान्यवर



शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना मा.श्री.किरण पाटील, (सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव पटू)

# ७३ वा स्वातंत्र्य दिन

## सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ता हमारा !




स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजास सलामी देताना मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.एस.एन.गवळी,प्रा.सुभाष देशमुख,प्रा.विजय नागपुरे.

स्वातंत्र्य दिन समारंभ ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी

# कॉमर्स फेस्टिवल लयभारी !



# आम्ही रयत सेवक



मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर,
उपप्राचार्य डॉ.एस.एन.गवळी यांचे समवेत
वरिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक वृंद



मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर,
उपप्राचार्य डॉ.एस.एन.गवळी,प्रा.वाय.व्ही.चंद्रात्रे
यांचे समवेत संगणक विभागातील प्राध्यापक वृंद



मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांचे समवेत
कनिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक वृंद



मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांचे समवेत
कार्यालयीन सेवक वृंद



# महाविद्यालयीन विविध समिती अहवाल

संकलन
**श्री.विवेक मोरे**
ग्रंथपाल



# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | वाणिज्य संशोधन केंद्र | प्रा.डॉ. एस.एन.गवळी-विभाग प्रमुख | ५९ |
| २ | संगणक विभाग | प्रा.योगीराज चंद्रात्रे (प्रमुख,संगणक विभाग) | ६० |
| ३ | परीक्षा विभाग | डॉ.एस.आर.जावळे (परीक्षा अधिकारी) | ६१ |
| ४ | नॅक पिअर टीम भेट | डॉ.बी.बी.बावके (समन्वयक) | ६२ |
| ५ | माजी विद्यार्थी संघटना | डॉ.एस.एन.गवळी (समन्वयक) | ६२ |
| ६ | जिमखाना विभाग | प्रा.विशाल पवार (शारीरिक शिक्षण संचालक) | ६३ |
| ७ | राष्ट्रीय छात्र सेना | प्रा.नागपूरे व्ही.बी. (विभाग प्रमुख) | ६४ |
| ८ | शॉर्ट टर्म कोर्सेस | डॉ.गवळी एस.एन. ( समन्वयक) | ६४ |
| ९ | विद्यार्थिनी मंच अहवाल | प्रा.डॉ.गुजर पी.एस. (चेअरमन) | ६६ |
| १० | विद्यार्थिनी वसतिगृह | प्रा.महाले एस.ए.(रेक्टर) | ६६ |
| ११ | अविष्कार २०१९-२ | डॉ. आर.पी.कळमकर (समन्वयक ) | ६७ |
| १२ | स्पर्धा परीक्षा विभाग | प्रा.डॉ.केकाणे एम.ए.(चेअरमन) | ६८ |
| १३ | विद्यार्थी विकास मंडळ | प्रा.डॉ.तुपे बी.जी (चेअरमन) | ६८ |
| १४ | ग्रंथालय अहवाल | प्रा.मोरे व्ही.एम.(ग्रंथपाल) | ६९ |
| १५ | कर्मवीर वक्तृत्व स्पर्धा | डॉ.घोडके बी.जी.(समन्वयक) | ७० |
| १६ | राष्ट्रीय सेवा योजना | प्रा.डॉ.सय्यद एस.बी.(कार्यक्रम अधिकारी) | ७१ |
| १७ | कर्मवीर विद्या प्रबोधिनी अहवाल | डॉ. सय्यद एस.बी. (चेअरमन) | ७३ |
| १८ | कॉमर्स लॅब | प्रा.सुशिल पवार (चेअरमन) | ७३ |
| १९ | उद्योजकता विकास केंद्र | डॉ.आर.पी.कळमकर ( समन्वयक) | ७४ |

# वाणिज्य संशोधन केंद्र

प्रा.डॉ. एस.एन.गवळी-विभाग प्रमुख

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे विद्यापीठ मान्यताप्राप्त वाणिज्य संशोधन केंद्र हे शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून महाविद्यालयात कार्यरत आहे. जानेवारी २०१७ पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाईन ट्रॅकिंग सिस्टिम सुरु केलेली आहे. एम.फिल व पीएच.डी. च्या प्रवेशासाठी विद्यापीठामार्फत प्रवेश परीक्षा घेतली जाते. या परीक्षेसाठी एम.फिल, सेट व नेट परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस (लेखी स्वरुपात) सवलत दिली जाते.

एम.फिल व पीएच.डी. कोर्ससाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना 'व्यवसाय प्रशासन', 'बॅकींग ॲड फायनान्स', 'सहकार व ग्रामीण विकास', 'अर्थशास्त्र व मार्केटींग' या विषयांमध्ये संशोधन करण्याची संधी आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कु.जाधव प्रिया उत्तम या विद्यार्थिनीने 'गोवर्धन पराग मिष्क प्रा.लि.मंचर यांच्या 'संघटन आणि व्यवस्थापनाचा विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयात एम.फिल. पदवी संपादन केली. प्रा.डॉ. एस.एन.गवळी यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले.

या शैक्षणिक वर्षात प्राध्यापकाचे २२ संशोधन लेख विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत लेख प्रसिद्ध झाले आहेत.

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये आध्यापकांची खालील पुस्तके प्रकाशित झाली.**

**अ) प्रा.डॉ.एस.एन. गवळी**

१) व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता भाग-१
२) व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता भाग-२
३) Orgnisational Skills Development Part-1
४) Orgnisational Skills Development Part-2

ब) प्रा.डॉ.एस.आर.जावळे

१) Business Economics (Micro) Part-1
२) Business Economics (Micro) Part-2
३) भारतीय आर्थिक पर्यावरण -भाग-१
४) भारतीय आर्थिक पर्यावरण - भाग-२
५) व्यावसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म) भाग-१
६) व्यावसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म) भाग-२
७) औद्योगिक अर्थशास्त्र-भाग-१
८) औद्योगिक अर्थशास्त्र - भाग-२

क) प्रा.डॉ. आर.पी.कळमकर

१) Organisation and Management Municipal Corporation
२) व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता - भाग-१
३) व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता-भाग-२

संशोधन केंद्रामार्फत दि.१२/२/२०२० रोजी विद्यापीठ पातळीवरील 'बौध्दिक संपदा हक्क' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मा.प्रा.डॉ.प्रकाश एन.चौधरी होते. उपप्राचार्य, नेस वाडीया कॉलेज, पुणे यांनी साधन व्यक्ती म्हणून काम केले.

वाणिज्य संशोधन केंद्रामध्ये एम.फिल व पीएच.डी. कोर्ससाठी ६ मार्गदर्शक संलग्नित आहेत. त्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल. डी. भोर, प्रा.डॉ.एस.एन.गवळी, प्रा.डॉ.आर.पी. कळमकर कार्यरत आहेत. ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.बी.कल्हापुरे, कला व वाणिज्य महाविद्यालय, बेलापूरचे प्रा.डॉ. बी.आर. पवार, आण्णासाहेब आवटे महाविद्यालयाचे प्रा.डॉ.एस.आर.बखळे, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय राहाता येथील प्रा.डॉ.सौ.एम.एस. पाटगावकर संशोधन केंद्राशी संलग्नित आहेत.

# संगणक विभाग

प्रा.योगीराज चंद्रात्रे (प्रमुख,संगणक विभाग)

आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी संगणकाच्या ज्ञानात मागे राहू नये म्हणून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना संगणकामध्ये पदवी प्राप्त करता यावी यासाठी सन २००८-०९ मध्ये बी.सी.ए. अभ्यासक्रम सुरु केला. सन २०१५-१६ या वर्षापासून बी.सी.ए. या कोर्सचे नाव बी.बी.ए. (सी.ए.) करण्यात आले आहे.

आहेत ते नेटवर्कने जोडलेले आहेत. त्यावर इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे, या शैक्षणिक वर्षात एकूण २०७ (८०+७७+५०) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून सर्व विद्यार्थी संगणक विषयाचे ज्ञान घेत आहेत. या शैक्षणिक वर्षात एफ.वाय.बी.बी.ए. (सी.ए.) या वर्गासाठी 'मायक्रोसॉफ्ट-३६५' व टी.वाय. बी.बी.ए.(सी.ए) या वर्षासाठी 'ॲपटीट्यूड टेस्ट' हे शॉर्ट टर्म कोर्स सुरु केले आहेत.

संगणक विभागामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि.५ सप्टेंबर २०१९ रोजी शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संगणक विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

संगणक विभागामार्फत दि.१६ जानेवारी २०२० रोजी 'डिजीटल मार्केटिंग' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मा.मीनाताई जगधने, सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ.एल. डी. भोर यांचे मार्गदर्शन लाभले.या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी मा.दीपक कुमार , मा.सुमंत तिवारी, न्यू दिल्ली हे प्रमुख पाहुणे व तज्ज्ञ व्यक्ती म्हणून उपस्थित होते.

पायरन्स कॉलेज, लोणी यांच्या मार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'पायथॉन प्रोग्रामींग' या विषयावरील कार्यशाळेत एफ.वाय. बी.बी.ए. (सी.ए.) टी.वाय.बी.बी.ए.(सी.ए) या वर्गातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या मध्ये एस.वाय. बी.बी.ए.(सी.ए) मधील भाग्यश्री जाधव या विद्यार्थीनीस (Quiz Competition) मध्ये रोख १००१/- चे पारितोषिक मिळाले. त्याचप्रमाणे वरुण आनंद व शेख मसूद एफ.वाय.बी.बी.ए.(सी.ए) या विद्यार्थ्यांना रंगोत्सव स्पर्धेत बक्षीसे मिळाली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अविष्कार स्पर्धेत अभिनव बनकर व कुशल गोहील एफ.वाय. बी.बी.ए.(सी.ए) यांची (Entry Gun) या विषयावरील प्रोजेक्ट साठी विभागीय स्तरावर निवड झाली.

# परीक्षा विभाग

डॉ.एस.आर.जावळे (परीक्षा अधिकारी)

महाविद्यालयात पदवी व पदव्युतर पातळीवर सत्रांत परीक्षा, वार्षिक परीक्षांचे संपूर्ण नियोजन परीक्षा विभागामार्फत केले जाते. परीक्षा विभागाचे कामकाज पाहण्यासाठी स्वतंत्र समिती कार्यरत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार परीक्षांचे कामकाज पाहण्यासाठी महाविद्यालय परीक्षा अधिकारी म्हणून डॉ.एस. आर.जावळे यांची नियुक्ती केलेली आहे. विद्यापीठ कामकाज पाहण्यासाठी कार्यालयात स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

परीक्षा विभागामार्फत स्वाध्याय, चाचणी, प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प अहवाल आणि मौखिक परीक्षांचे संपूर्ण नियोजन केले जाते. परीक्षा विभागात दोन डुप्लीकेटर (रिझो मशीन) दोन, एक स्कॅनर, एक झेरॉक्स मशीन, इंटरनेट कनेक्शन व सी.सी.टी.व्ही. कॅमेरा या सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म बिनचूकपणे भरले जावेत म्हणून संगणक विभागामध्ये परीक्षा फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

विद्यापीठ परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर गुणपत्रिकेत काही चुका अथवा त्रुटी आढळल्यास त्या चूक दुरुस्त करण्यासाठी परीक्षा विभगामार्फत पाठपुरावा केला जातो. विद्यार्थ्यांना फोटो कॉपी आणि पूनर्मूल्याकंनाच्या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. टी.वाय.बी.कॉम., टी.वाय.बी.सी.ए., एम.कॉम, या सर्व वर्गाच्या परीक्षांचे निकाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निकालापेक्षा जास्त आहेत.

**मार्च / एप्रिल २०१९ मध्ये झालेल्या विद्यापीठ परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.नं. | वर्ग | एकूण विद्यार्थी संख्या | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | महाविद्यालय शेकडा निकाल | विद्यापीठाचा शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | टी.वाय.बी.कॉम | ३९२ | ३७८ | २३९ | ६३.२२% | ४८.४१% |
| २ | बीबीए सीए ३ | ६७ | ६५ | ३९ | ६०.००% | ५१.६४% |
| ३ | एम कॉम भाग-२ | १०३ | ९७ | ९३ | ९५.८७% | ९१.२५% |

## पदवीग्रहण समारंभ

मंगळवार दि.११/०२/२०२० रोजी रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर येथील प्रशासकीय इमारतीमधील सभागृहात तिन्ही महाविद्यालयाचा संयुक्त पदवीग्रहण समारंभ संपन्न झाला.

मा.अनिल पवार, उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मा.मीनाताई जगधने होत्या. प्राचार्य डॉ.के.एच.शिंदे, रा.ब.नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे आभार प्राचार्य डॉ. एल.डी.भोर, चंद्ररुप डाकले कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर यांनी मानले .

सदर कार्यक्रमात महाविद्यालयातील बी.कॉम. आणि बी.बी.ए.,सी.ए.अंतिम वर्षातील १७५ स्नातकांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

## नॅक पिअर टीम भेट

**डॉ.बी.बी.बावके (समन्वयक)**

महाविद्यालयाच्या तृतीय मूल्यांकनासाठी नॅक पिअर टीमने दि.४ व ५ जुलै २०१९ या दिवशी महाविद्यालयास भेट दिली

**डॉ.प्रदीप कुमार यादव-चेअरमन**
माजी उपकुलगुरु, रोहिलखंड विद्यापीठ, उत्तर प्रदेश
**डॉ.करमपाल नरवाल-सदस्य**
गुरु जांभेश्वर तंत्रविज्ञान विद्यापीठ,
हिस्सार, हरियाना
**डॉ.मारिया आराधना ऐ.सी. -सदस्य**
यांनी महाविद्यालयास भेट दिली.

महाविद्यालयाच्या वाणिज्य संशोधन केंद्र, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, वाणिज्य मंडळ, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, सांस्कृतिक विभाग, संगणक विभाग, जिमखाना विभाग, आविष्कार स्पर्धा, ग्रंथालय, लँग्वेज लॅब, कॉमर्स लॅब, बेस्ट प्रॅक्टिस या माध्यमातून विविध उपक्रमांची पाहणी व तपासणी केली. महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचा अभ्यास करुन महाविद्यालयास ३.१४ गुण प्रदान करुन 'अ' दर्जा बहाल केला.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक सुविधांच्या संदर्भात सदर कमिटीने समाधान व्यक्त केले. महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांची सखोल माहिती घेवून शॉर्ट टर्म कोर्सेस, क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेले नैपुण्य, तसेच मुलींच्याकरिता असलेल्या अनेक विविध सुविधा व शैक्षणिक उपक्रमांची माहिती घेतली.

मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांनी महाविद्यालयाचे प्रगतीचे सादरीकरण केले. नॅकच्या भेटी दरम्यान महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी उत्कृष्ट परिश्रम व मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांच्या काटेकोर नियोजनामुळे महाविद्यालयास 'अ' दर्जा प्राप्त झालेला आहे.

आय.क्यू.ए.सी.चे समन्वयक म्हणून प्रा.विवेक मोरे व नॅकचे समन्वयक म्हणून डॉ.बी.बी.

## माजी विद्यार्थी संघटना

**डॉ.एस.एन.गवळी (समन्वयक)**

महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटना कार्यरत असून संघटनेची नोंदणी महाराष्ट्र ३००/२०१८ दि. ७ जून २०१८ रोजी झाली आहे. संघटनेचे अध्यक्ष मा.ॲड्. विजयराव बनकर पाटील असून सचिव डॉ.एस.एन.गवळी हे आहेत. माजी विद्यार्थी संघटनेचे एकूण सभासद १५३० आहेत. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये खालील सभांचे आयोजन करण्यात आले होते.

१) दि.१ जुलै २०१९ रोजी झालेल्या सभेत सभासद संख्या वाढविणे, महाविद्यालयाच्या होणाऱ्या तिसऱ्या मानांकन सक्रिय सहयोग देणे. महाविद्यालयास आर्थिक मदत मिळवून देणे इत्यादी आले. सदर सभेत नॅक-३ साठी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभागी घेणे. सभासद वाढविणे, देणगी गोळा करणे इत्यादी विषयावर चर्चा करण्यात आली.

२) दि.१९ मार्च २०२० रोजी झालेल्या सभेत महाविद्यालयास रु.२,१५,०००/- (रुपये दोन लाख पंधरा हजार) देणगी देण्याचे ठरविण्यात आले. महाविद्यालयाच्या विविध उपक्रमात माजी विद्यार्थी यांचा सहभाग असतो.

माजी विद्यार्थी यांनी कोविड -१९ काळात अनेक समाज उपयोगी कामे केली. त्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेत मदत , मास्क, सॅनिटायझर वाटप, आरोग्यविषयक जनजागृती इत्यादी उपक्रम राबविले.

# जिमखाना विभाग

प्रा.विशाल पवार (शारीरिक शिक्षण संचालक)

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये जिमखाना विभागातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पातळीवरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये देदीप्यमान कामगिरी बजावली ती खालीलप्रमाणे.

१)बॉल बॅडमिंटन या प्रकारांमध्ये कु.वानखेडे साक्षी कु.मोरे प्राजक्ता व श्री.फुलपगार नितीन यांची निवड व सहभाग नोंदविला.

२)बॉक्सिंग या क्रीडा प्रकारातील श्री.शेख सादिक याची निवड व सहभाग नोंदविला.

३)ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारात श्री.पठाण रमजान याची निवड व सहभाग नोंदविला

४)व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारात कु.पटेल इशिता, कु.पटेल जानव्ही, कु.कटारिया आरती निवड व सहभाग नोंदविला.

५)योगासन या क्रीडा प्रकारात श्री.फासाटे सौरभ यांची निवड व सहभाग नोंदविला.

६)श्री.काळे सनी याची आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड व सहभाग नोंदविला.

ज्युनियर विभागांमध्ये श्री.लोणारे राहुल यांनी १०० मीटर व ४०० मीटर धावणे स्पर्धेत जिल्हास्तरावर कामगिरी केली आहे. तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत विजेतेपद मिळवले आहे व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. महाविद्यालयातील सिनियर विभागातील मुलींच्या संघाने आंतरमहाविद्यालयीन जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये उपविजेतेपद प्राप्त केले. जिमखाना विभागाने चालूवर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विभागीय पातळीवरील वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन केले होते. तसेच जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालीन बॉक्सिंग मुले व मुली स्पर्धाचे उत्कृष्ट प्रकारे यजमान पद भूषविले होते .

प्रा.विशाल पवार यांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सायकलिंग स्पर्धेकरिता विद्यापीठ संघाच्या संघव्यवस्थापक पदी नियुक्ती करण्यात आली. सदर स्पर्धा एम.जे.एस. विद्यापीठ बिकानेर, राजस्थान येथे संपन्न झाल्या.

महाविद्यालयामध्ये २१ जून जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने ऑनलाईन पद्धतीने सहभाग घेतला. दि.२९ ऑगस्ट,२०१९ मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त 'राष्ट्रीय क्रीडा दिन' जिमखाना विभागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## राष्ट्रीय छात्र सेना

प्रा.नागपुरे व्ही.बी. (विभाग प्रमुख)

लष्करी प्रशिक्षण, चारित्र्यसंवर्धन, आदर्श नेतृत्त्व, खिलाडूवृत्ती इ. गुणांच्या संवर्धनासाठी महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना विभाग कार्यरत आहे. या शैक्षणिक वर्षाकरिता छात्र सेनेत एकूण ५४ विद्यार्थ्यांना लष्करी प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात आलेला आहे. यामध्ये ११ विद्यार्थिनी लष्करी प्रशिक्षण घेत आहेत.

सन २०१९-२०२० या वर्षी घेण्यात आलेल्या 'बी' प्रमाणपत्र परीक्षेच्या निकाल १००% लागला तर 'सी' प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ७०% लागला आहे.

* सिनिअर अंडर ऑफीसर कु.तुषार चंद्रकांत पवार व सार्जंट कु.अमोल धर्मेंद्र टाक या दोघांची स्थल सेना कॅम्प अमरावती येथे निवड झाली.

* सार्जंट कु.दीपक शरद भवार व सी.पी.एल. कु. शितल राजू मुठे या दोघांची राष्ट्रीय एकात्मता कॅम्प (NIC) उत्तराखंड येथे निवड झाली.

या शैक्षणिक वर्षामध्ये वृक्ष लागवड, रक्तदान शिबिर, स्वच्छ भारत अभियान, आंतरराष्ट्रीय योग दिवस, जागतिक एड्स दिन, राष्ट्रीय मतदार दिवस जनजागृती रॅली या सारखे विविध उपक्रम राबविण्यात आले.

या शैक्षणिक वर्षात रेग्युलर आर्मीमध्ये खालील छात्रसैनिकांची निवड झाली.

१) कु. आशुतोष सुभाष यादव इंडियन एअरफोर्स, न्यू दिल्ली मध्ये गार्ड कमांडो म्हणून नियुक्ती

२) कु. स्वप्निल बापूसाहेब कर्जुळे (रत्नागिरी)

## शॉर्ट टर्म कोर्सेस

डॉ.गवळी एस.एन. ( समन्वयक)

रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर विद्याप्रबोधिनी संलग्नित सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालयामध्ये एकूण ३० शॉर्ट टर्म कोर्सेस सुरु करण्यात आलेले आहेत.

महाविद्यालयामध्ये वाणिज्य व संगणक पदवीचे विद्यार्थी शिक्षण घेत असतानाच या शाखेशी निगडीत असे तीन महिन्यांचे शॉर्ट टर्म कोर्सेस राबविण्यात आलेले आहेत.

वाणिज्य व संगणक शाखेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच प्रात्यक्षिक कामाचा अनुभव यावा, त्यांची विचार करण्याची शक्ती वाढावी. भविष्य काळात स्वयंरोजगार करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी. संगणकाचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळावे, स्वत:च्या आरोग्यविषयक माहिती मिळावी. फ्रेंच व मराठी भाषेचे ज्ञान मिळावे. स्वत:चे संवाद कौशल्य वाढावे व नेतृत्वाचा विकास व्हावा या हेतूने महाविद्यालयात शॉर्ट टर्म कोर्सेस सुरु केले आहेत. महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी ब्युटी पार्लर, ज्वेलरी मेकींग, मायक्रोम, फॅशन डिझाईनिंग व टेलरिंग असे शॉर्ट टर्म कोर्सेस सुरु आहेत.

*** संस्था पाहणी समिती**

महाविद्यालयात सुरु असलेल्या कोर्सेसची पाहणी करण्यासाठी दि.०५/०३/२०२० रोजी संस्था कमिटी आली होती. त्या समितीचे चेअरमन मा.प्रा.डॉ.ए.एस.म्हस्के व डॉ.एस.ए.कुलकर्णी सदस्या होत्या. त्यांनी सर्व कोर्सेसची पाहणी व तपासणी केली महाविद्यालयातील सुरु असलेल्या विविध कोर्स उत्कृष्ट पध्दतीने सुरु आहेत त्याबद्दल समाधान व्यक्त केले.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात राबविण्यात आलेले शॉर्ट टर्म कोर्सची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## Karmveer Vidhya Prabhodhini's
## Short Term Courses 2019-2020 Enrollment

| Sr No. | Name of the course | Name of the Co-ordinator | Male | Female | Total Students |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Tally E.R.P.9.1 | Mr.Joshi P.D. | 28 | 49 | 77 |
| 2 | Pre-Recruitment Training | Mr.Nagpure V.B. | 27 | 3 | 30 |
| 3 | YOga Meditation and helth | Mr.Pawar V.S. | 21 | 22 | 43 |
| 4 | Marathi Typing | Dr.Ghodke B.G. | 34 | 22 | 56 |
| 5 | English Typing | Mr.Sasane S.D. | 32 | 37 | 68 |
| 6 | D.T.P. & Screen Printing | Dr.Sayyed S.B. | 49 | 2 | 51 |
| 7 | Ethical Moral and Social Values | Ms.Masal | 36 | 8 | 44 |
| 8 | Entrepreneurship Development | Mr.Shaikh A.A. | 29 | 12 | 41 |
| 9 | Jewellery Making | Ms.Jagtap M.B. | 0 | 45 | 45 |
| 10 | Event Management | Dr.Tupe B.G. | 32 | 40 | 72 |
| 11 | Internet Banking | Mr.Datir K.R. | 38 | 14 | 52 |
| 12 | Computer Awareness | Ms.Duggal S.A. | 38 | 20 | 58 |
| 13 | Journalism | Mr.Kekane M.A. | 35 | 6 | 41 |
| 14 | Beauty Parlour | Ms.Jadhav P. | 0 | 51 | 51 |
| 15 | Entrepreneurship Development | Dr.Kalamkar R.P. | 30 | 19 | 49 |
| 16 | Soft Skill | Ms.Salve S.V. | 40 | 8 | 48 |
| 17 | Microm | Prof.Zagare G.B. | 0 | 45 | 45 |
| 18 | Professional Accounting | Prof.Pawar S.D. | 33 | 12 | 45 |
| 19 | Fashion Desiging | Ms.Bhawsar B.S. | 0 | 45 | 45 |
| 20 | Leadership Development | Mr.Kulkarni S.V. | 41 | 5 | 46 |
| 21 | Taxation | Mr.Mahale S.A. | 41 | 40 | 81 |
| 22 | Marketing Skill and Marketing Survey | Dr.Gujar P.S. | 43 | 40 | 83 |
| 23 | Spoken English | Dr.Bawake B.B. | 41 | 32 | 73 |
| 24 | Agro Business | Dr.Jawale S.R. | 34 | 35 | 69 |
| 25 | Stock Market & Investment | Mr.More V.M. | 43 | 23 | 70 |
| 26 | Tailoring | Ms.Jagtap M.B. | 0 | 67 | 67 |
| 27 | Internet Handling | Mr.Chandratre Y.V. | 44 | 33 | 80 |
| 28 | French Language | Mr.Korhale M.R. | 2 | 0 | 1 |
| 29 | Microsoft Office 365 | Mr.Lande R.D. | 22 | 32 | 77 |
| 30 | Aptitude Test | Mr.Nabage A.D. | 22 | 27 | 49 |
| | | Total | 835 | 794 | 1657 |

# विद्यार्थिनी मंच अहवाल

प्रा.डॉ.गुजर पी.एस. (चेअरमन)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या गरजा लक्षात घेऊन विविध उपक्रम राबवित असते. या शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये दि.३ जानेवारी २०२० बालिका दिन व सावित्रीबाई फुले जयंती निमित्त मा.मीनाताई जगधने (सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा, चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर) यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीरामपूरच्या अप्पर पोलीस अधीक्षक मा.डॉ.सौ.दीपाली काळे तसेच श्रीरामपूर उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी मा.अनिल पवार यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. ८ जानेवारी ते ११ जानेवारी २०२० या कालावधणीत निशिकांत क्लिनीकल लॅबोरेटरी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून हिमोग्लोबीन तपासणी उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये एकूण ६३० विद्यार्थिनींचे ब्लडग्रुप व हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली.

दि.२४ जानेवारी २०२० रोजी "लिंगभावविषयक समानता" संदर्भात विद्यापीठाला अहवाल सादर केला.

# विद्यार्थिनी वसतिगृह

प्रा.महाले एस.ए.(रेक्टर)

कनिष्ठ व उच्च महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थिनीकरीता स्वतंत्र व प्रशस्त वसतिगृहाची सुविधा महाविद्यालयातर्फे २००७-०८ पासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सर्व सोयीयुक्त अशा २१ खोल्या विद्यार्थिनींसाठी उपलब्ध आहे. शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० करिता एकूण ५४ मुलींना प्रवेश देण्यात आला होता. यामध्ये कनिष्ठ महाविद्यालय २४ व ३० मुली वरिष्ठ महाविद्यालयातील आहे. वसतिगृहामुळे श्रीरामपूर तालुक्यातील आणि इतर तालुक्यांच्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींची उच्च शिक्षणाची आणि निवासाची व्यवस्था झाली आहे. प्रत्येक सत्राच्या सुरुवातीला वसतिगृह समितीची सभा आयोजित

मुलींच्या सुदृढ आरोग्यासाठी स्वतंत्र, अद्यावत व अत्याधुनिक साधनांनी युक्त व्यायाम शाळा उपलब्ध आहे. मार्गदर्शनाकरीता क्रीडा शिक्षक उपलब्ध असतात. वसतिगृहामध्ये गरम पाण्यासाठी सोलर, पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर फिल्टर, सुरक्षिततेसाठी ४ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, वीजनिर्मितीसाठी सोलर पॅनल इ. सुविधा देण्यात आल्या आहेत. डाईनिंग हॉल, अभ्यासासाठी टी.व्ही.ची व्यवस्था महाविद्यालयातर्फे करण्यात आली आहे. सर्व खोल्यांमध्ये एल.ई.डी.ट्युब आणि बल्ब, पंखे, कपाट, खुर्च्या इ. साहित्य देण्यात आले आहे.

# आविष्कार २०१९-२०

डॉ. आर.पी.कळमकर (समन्वयक )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थ्यामधून उद्योजक व संशोधक निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी अविष्कार स्पर्धा भरविली जाते. विद्यापीठ पातळीवर निवडलेले विद्यार्थी राज्यपातळीवर होणाऱ्या अविष्कार स्पर्धेसाठी पाठविले जातात.

महाराष्ट्र राज्य पातळीवर भरविल्या जाणाऱ्या आविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धेच्या धर्तीवर रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे मार्फत विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. विभागीय पातळीवर आविष्कार स्पर्धेचे आयोजन केले जाते.

महाविद्यालयाने आविष्कार स्पर्धेची तयारी करुन घेण्यासाठी महाविद्यालय पातळीवर दि.१८ सप्टेंबर २०१९ व दि.१९ सप्टेंबर २०१९ रोजी दोन दिवसीय मार्गदर्शन शिबीराचे आयोजन केले होते. या शिबीरासाठी प्रा.मनोजकुमार लंगोटे, पी.व्ही.पी.कॉलेज, प्रवरानगर व प्रा.डॉ.जी.एच.बारहाते यांनी मार्गदर्शन केले. दि.११ ऑक्टोबर २०१९ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या शैक्षणिक व संशोधन समन्वयकांच्या कार्यशाळेत डॉ.कळमकर आर.पी. यांनी सहभाग घेतला.

दि.३ जानेवारी २०२० रोजी इंजिनिअरींग कॉलेज, विळदघाट, अहमदनगर या ठिकाणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या विभागीय पातळीवर अविष्कार स्पर्धेत महाविद्यालयाचे श्री.यशवंत मयुर राजेंद्र व श्री. बनकर अभिनय अविनाश हे विद्यार्थी अनुक्रमे वाणिज्य विभाग व संगणक विभागातून निवडले गेले.

दि.२१ जानेवारी २०२० रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यापीठ पातळीवर आयोजित केलेल्या स्पर्धेत श्री.यशवंत मयूर राजेंद्र व श्री. बनकर अभिनय अविनाश यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये श्री.यशवंत मयूर राजेंद्र या विद्यार्थ्यांची राज्य पातळीवर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली.

दि.२८ ते ३१ जानेवारी २०२० दरम्यान मुंबई येथे झालेल्या आंतरविद्यापीठ पातळीवर श्री. यशवंत मयूर राजेंद्र याने सादर केलेल्या प्लॅस्टिक कचऱ्यापासून इंधन व डांबर निर्मिती हा प्रकल्पाची आविष्कार स्पर्धेत पहिल्या सहामध्ये निवड झाली.

## स्पर्धा परीक्षा विभाग

प्रा.डॉ.केकाणे एम.ए.(चेअरमन)

सन-२०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागामार्फत आय.बी.पी.एस व एम.पी.एस.सी. व इतर विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करण्यात आले. या कोर्ससाठी १० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या कोर्ससाठी डी.डी.पॅटर्न चे संचालक मा.दळे डी.पी. प्रा.झगरे जी.बी. प्रा.केकाणे एम.ए. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विविध विषयांचे विद्यार्थ्यांसाठी दि.२३ डिसेंबर २०१९ रोजी 'बँकींग क्षेत्रातील असणाऱ्या विविध संधी' या विषयावर मा. अभिषेक गायके यांचे व्याख्यान आयोजित केले होते. तसेच मा.सी.ए. राजेंद्र डांगी, पुणे यांचे दि. ३१ डिसेंबर २०१९ रोजी 'जी.एस.टी. कायदा व वाणिज्य क्षेत्रातील संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

कु.पूनम मनोहर पवार या विद्यार्थिनींची महाराष्ट्र ग्रामीण बँक मध्ये प्रोबेशनरी ऑफीसर या पदावर निवड झाली.

## विद्यार्थी विकास मंडळ

प्रा.डॉ.तुपे बी.जी (चेअरमन)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व सी.डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ विविध उपक्रम राबवित असते. या शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उपक्रम-"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" या कर्मवीर अण्णांच्या ब्रीद वाक्यानुसार महाविद्यायात 'डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना' विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत चालविली जाते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये एकूण ५८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून त्यामध्ये २९ विद्यार्थी व २९ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ मार्फत वृक्षारोपण करण्यात आली. दि.४ जुलै २०१९ रोजी ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यामध्ये वड, पिंपळ, चिंच, लिंब इ. वृक्षांचा समावेश होता.

दि.३ जानेवारी २०२० रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा.मीनाताई जगधने (सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा व चेअरमन रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर), कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ.सौ.दीपाली काळे (अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर) तसेच अनिल पवार,(प्रांत अधिकारी, श्रीरामपूर) हे उपस्थित होते.

दि. ८ जानेवारी २०२० ते ११ जानेवारी २०२० रोजी विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक समस्या लक्षात घेऊन महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. निशिकांत पॅथोलॅबोरेटरी, श्रीरामपूर येथील सौ. छाया सोनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने वरिष्ठ महाविद्यालयातील ६३० विद्यार्थिनीचे ब्लड ग्रुप, हिमोग्लोबीन, वजन, उंची यांची तपासणी करण्यात आली.

दि.२४ जानेवारी २०२० रोजी "लिंगभावविषयक समानता" संदर्भातील अहवालात विद्यापीठाला अहवाल सादर केला.

# ग्रंथालय अहवाल

प्रा.मोरे व्ही.एम.(ग्रंथपाल)

महाविद्यालयीन युवक युवतीमध्ये वाचन संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचे काम ग्रंथालय करत असते. ग्रंथालयांना उभारी देण्याचे काम वाचक वर्ग करीत असतो. वाचकाची बौध्दिक क्षमता वाढविण्यासाठी आपले संगणकीकृत ग्रंथालय, संदर्भग्रंथ, क्रमिक पाठ्यपुस्तके, दैनंदिन वृत्तपत्रे, नियतकालिके, मासिके, इलेक्ट्रॉनिक्स संदर्भातील पुस्तके अशी भरपूर साहित्य संपदा उपलब्ध आहे. समृध्द ग्रंथालयाद्वारे वाचनतृप्ती होईल व वाचन संस्कृती वाढेल अशी अपेक्षा आहे. ग्रंथालयात विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण केली जाते.

**✻ ग्रंथालय समिती :-**

१) प्राचार्य डॉ.एल.डी.भोर
२) डॉ.एस. एन.गवळी
३) प्रा. वाय.व्ही.चंद्रात्रे
४) डॉ.पी.एस.गुजर
५) डॉ.बी.जी.घोडके
६) प्रा. विवेक मोरे

यावर्षी ग्रंथालय समितीच्या दोन बैठका झाल्या असून त्यामध्ये ग्रंथालय अंदाजपत्रक, बुक बँक योजना, पुस्तक निवड याविषयी सविस्तर चर्चा झाली.

**✻ विविध उपक्रम :-**

१) निबंध स्पर्धा
२) बुक बँक योजना
३) पुस्तक परीक्षण स्पर्धा
४) स्पर्धा परीक्षा चर्चासत्र
५) विविध जयंत्या व पुण्यतिथी साजऱ्या
६) गांधी संस्कार परीक्षा
७) वाचन प्रेरणा दिन
८) प्रवेशाच्या दिवशी ओळखपत्र

**✻ गांधी विचार संस्कार परीक्षा :**

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव तर्फे गांधी विचार संस्कार परीक्षेस पुणे विभागात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश , संपादन मिळविले आहे.

**✻ बुक बँक योजना :-**

सन २०१९-२० या शैक्षणिक ९२३ विद्यार्थ्यांनी बुक बँक योजनेचा लाभ घेतला.

**✻ ग्रंथ संपदा :-**

ग्रंथालयाची प्रगती विकासाच्या मार्गावर असून ग्रंथालयाच्या ग्रंथासंपदेमध्ये सातत्याने वाढ होत आहे. सन २०१९-२० या शैगक्षणिक वर्षात ग्रंथसंपदा पुढीलप्रमाणे

| विभागाचे नाव | एकूण संख्या |
|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय | ४०४३८ |
| कनिष्ठ महाविद्यालय | १०१९४ |
| बुक बँक | ११२५० |
| ऑडिओ-व्हिज्युअल सी.डी. | ३१० |
| नियतकालिके | ४६ |
| वर्तमानपत्रे | १५ |
| मायनर रिसर्च | ११५ |
| पुस्तक स्वरुपी देणगी | १२५ |

गाव तेथे ग्रंथालय या उपक्रमातंर्गत वडाळा महादेव ग्रामपंचायतीस दहा रुपये किंमतीचे १२५ पुस्तकेभेट देण्यात आली.

वरील सर्व साहित्याद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून अधिकाधिक प्रगतीपथावर नेण्यास व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी ग्रंथालय विभाग कायम कार्यशील आहे.

# कर्मवीर वक्तृत्व स्पर्धा

**डॉ.घोडके बी.जी.(समन्वयक)**

पद्‍भूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ तीर्थरुप अण्णा यांच्या १३२ व्या जयंती निमित्त ५७ वी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे महाविद्यालयात आयोजन केले होते. सन १९६२ पासून कर्मवीरांच्या नावाने सुरु असलेली वक्तृत्व स्पर्धा महाराष्ट्रभर मानांकित व प्रतिष्ठित समजली जाते. महाविद्यालयात अध्ययन, अभ्यास, वाचन, मनन प्रक्रिया करीत असतांना युवक-युवतींच्या सुप्त कलागुणांचा विकास व्हावा. त्यांच्या अंगी व्यासपीठावर जाऊन आपले विचार स्पष्टपणे मांडण्याचे धैर्य निर्माण व्हावे. वाचन, मनन करण्याची सवय लागावी या हेतूने राज्यभरातील अनेक स्पर्धक सहभागी होतात.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शुक्रवार दि.२० सप्टेंबर २०१९ रोजी स्पर्धेचे आयोजन केले होते. उद्‍घाटन समारंभासाठी उद्‍घाटक व प्रमुख पाहुणे मा.मीनाताई जगधने, सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा, या होत्या. या स्पर्धेत पुणे, नाशिक, औरंगाबाद, बीड या जिल्ह्यातील संघांनी सहभाग घेतला होता.

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील ५७ वी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे मा. प्रकाश निकम पाटील, सदस्य-जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, सतारा व मा.सुमनभाई शाह सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रथम क्रमांकाचे सांघिक पारितोषिक डमाळे अनिकेत व शिंदे अशोक, न्यू आर्टस, कॉमर्स, सायन्य कॉलेज अ.नगरच्या संघाने पटकविले .द्वितीय क्रमांकाचे सांघिक पारितोषिक काळंगे सुजित व निकम अशुतोष, आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज, वारजे, पुणेच्या संघाने पटकविले तर तृतीय क्रमांकाचे सांघिक पारितोषिक मोरगे आकाश व गुडदे राहुल, रा.ब.नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर च्या संघाने पटकविले, उत्तेजनार्थ पारितोषिके सोमसे संजीवनी, आबासाहेब गरवारे, महाविद्यालय, पुणे, द्वितीय पारितोषिक राणे वृषाली, अमृतवाहिनी महाविद्यालय, संगमनेर, तृतीय पारितोषिक वाघ योगेश, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी मिळविले. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, स्मृतीचिन्हे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून मा.अतुल वढणे, मा. निलेश पर्बत यांनी काम पाहिले. स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ.बापूसाहेब घोडके यांनी काम पाहिले. या स्पर्धेला स्पर्धक, संघ व्यवस्थापक प्राध्यापक कार्यालयीन सेवक, विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना

**प्रा.डॉ.सय्यद एस.बी.(कार्यक्रम अधिकारी)**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व जागृती निर्माण व्हावी. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडून आणण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यरत आहे. श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, चारित्र्य संवर्धन व सामाजिक बांधिलकी या नीतीमूल्यांचा विद्यार्थ्यांमध्ये विकास व्हावा, या हेतूने सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विविध नियमित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि.२३ जून ते १५ जुलै २०१९ दरम्यान 'स्वच्छवारी, स्वस्थ वारी, निर्मलवारी, हरितवारी एन.एस.एस.वारी' उपक्रमात सहभाग झाल्याबद्दल राज्यपालांनी रासेयोच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यात महाविद्यालयातील श्री.असिम पठाण या विद्यार्थ्यांने सहभाग घेतला. दि.११ जुलै २०१९ रोजी लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम या विषयी जनजागृती करण्यात आली. १६ जुलै २०१९ रोजी रासेयो स्वयंसेवकाच्यावतीने सर्व शिक्षकवृंदाना गुलाबपुष्प देऊन गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. दि.१ ऑगस्ट,२०१९ रोजी रासेयो विभागाच्या वतीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली.

दि.९ऑगस्ट २०१९ रोजी रासेयो विभागाच्या वतीने क्रांतिदिन साजरा करण्यात आला. दि.१० ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छ करुन वृक्षारोपणासाठी खड्डे खोदण्यात आले.

दि.११ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात ३३ कोटी वृक्ष लागवड उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात ३३ अशोकाच्या वृक्षांची लागवड मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांच्या हस्ते करण्यात आली.

दि.५ सप्टेंबर २०१९ रोजी रासेयो स्वयं सेवकामार्फत 'शिक्षक दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि.२१ सप्टेंबर २०१९ रोजी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३२ व्या जयंती निमित्त रासेयो विभागामार्फत 'श्रमप्रतिष्ठा दिन' साजरा करण्यात आला. २४ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०१९ या कालावधीत 'राष्ट्रीय योजना सप्ताह' साजरा करण्यात आला.

दि.३० सप्टेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन कार्यक्रम मा.डॉ. दिपाली काळे अप्पर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्या प्रमुख उपस्थित व प्राचार्य एल.डी.भोर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

दि. ३१/१०/२०१९ रोजी सरदार वल्लभाई पटेल जन्म दिनानिमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस शपथ' देण्यात आली. दि.२ ऑक्टोबर २०१९ ते ८ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत महात्मा गांधी जयंती सप्ताह साजरा करण्यात आला.

दि.२६/११/२०१९ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. दि.१ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला.

**❊ विशेष श्रम संस्कार शिबीर ❊**

महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीर दि.१४ डिसेंबर २०१९ ते २० डिसेंबर २०१९ या कालावधीत मौजे वडाळा महादेव ता.श्रीरामपूर येथे संपन्न झाले. सक्षम युवा समर्थ भारत, एक भारत श्रेष्ठ भारत ही शिबिराची मध्यवर्ती कल्पना होती. श्रमसंस्कार शिबिरात महाविद्यालयातील १२५ स्वयंसेवक सहभाग झाले. शिबीराचे उद्घाटन प्रमुख पाहुणे मा.डॉ.दिपाली काळे, अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर, अध्यक्षा मा.मीनाताई जगधने सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा

चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर, उद्घाटक मा.सौ.मोहिनीताई जेठे सरपंच, वडाळा महादेव, मा. प्रकाश निकम पाटील,सदस्य जनरल बॉडी रयत शिक्षण संस्था सातारा, मा. प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, मा. प्राचार्य डॉ.के.एच.शिंदे, मा.प्राचार्य डॉ.एम.एस.पोंधे, माजी उपसरपंच मा.श्री. सुनील कुदळे, मा.रोहिदास रंगनाथ कसार मा. गुलाबराव पवार, मा.सुलोचना पवार, उपसरपंच हनुमान राऊत यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. शुक्रवार दि.२० डिसेंबर २०१९ रोजी मा. अनिल पवार साहेब, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, श्रीरामपूर, अध्यक्ष मा.सुमनभाई शाह सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, सातारा, मा.ॲड.विजयराव बनकर पाटील रयत शिक्षण संस्था, सातारा मा.श्री. उध्दवराव यादवराव पवार थोर देणगीदार वडाळा महादेव यांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप झाला.

शिबिर काळात सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी स्वयंसेवकाच्या वतीने जनजागृती करण्यात आली. ऊर्जा बचत जनजागृती पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण, वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. वीज टंचाईवर मात करण्यासाठी अपांरपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या महत्त्वावर विशेष भर देण्यात आला. वडाळा महादेव ते निपाणी वडगाव च्या रस्त्यावर मुरुम टाकून खड्डे बुजविण्यात आले. शिबिर काळात स्मशानभूमी परिसर स्वच्छता, सर्व मंदिरे, अंगणवाड्या, प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत कार्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला.

दि.१५ जानेवारी २०१० रोजी महाविद्यालयात तीळगुळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दि.२३ ते २६ जानेवारी २०२० रोजी स्नेहालय अहमदनगर येथे 'बा' संमेलन शिबिर आयोजित करण्यात आले. त्यात पाच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दि.२५ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला.



## कर्मवीर विद्या प्रबोधिनी अहवाल

**डॉ. सय्यद एस.बी. (चेअरमन)**

विद्यार्थ्यांमध्ये विविध स्पर्धा परीक्षांची अभिरुची निर्माण करण्यासाठी व विद्यार्थ्यामधील विविध कलागुणांचा विकास करण्यासाठी कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत प्रत्येक वर्षी महाविद्यालयात प्रमाणपत्र परीक्षांचे संस्था पातळीवर आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयात कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत घेण्यात आलेल्या कर्मवीर जीवन परिचय परीक्षा इयत्ता अकरावी परीक्षेसाठी ४७८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर प्रमाणपत्र परीक्षा सिनिअर कॉलेज मध्ये या परीक्षेसाठी १४४९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत घेणाऱ्या सर्व परीक्षांची तयारी करुन घेण्यासाठी निर्धारित केलेल्या पाठ्यक्रमाचे मार्गदर्शन वर्गशिक्षकाकडून करण्यात आले. कर्मवीर जीवन परिचय प्रमाणपत्र परीक्षा आणि कर्मवीर विद्याप्रबोधिनी प्रमाणपत्र परीक्षा शनिवार दि.४ जानेवारी २०२० मध्ये घेण्यात आली. दोन्ही परीक्षेसाठी एकूण १९२७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

## कॉमर्स लॅब

प्रा.सुशिल पवार (चेअरमन)

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना व्यावहारिक, उपयोजित ज्ञान व माहिती मिळावी या उद्देशाने २०१२ मध्ये कॉमर्स लॅबची स्थापना करण्यात आली. कॉमर्स लॅबमध्ये विद्यार्थ्यांना सराव करण्यासाठी १७ संगणक, इंटरनेट, प्रोजेक्टर, विविध विषयावरील चार्टस, इ. सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना दि.२८ फेब्रुवारी २०२० रोजी केंद्रिय आर्थिक बजेटचे लाईव्ह प्रेक्षपण दाखविण्यात आले.

कॉमर्स लॅबच्या वतीने दि.५ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२० या कालावधीत वाणिज्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्रोफेशनल डे, चॉकलेट डे, सिग्नेचर डे, पेट्रोटीझम डे, टवीन्स डे, मिस मॅच डे, ट्रेडिशनल डे, साडी व शेरवानी, क्लीन डे, फेटा डे व फूड फेस्टिवल इ. उपक्रम उत्साहात साजरे करण्यात आले. उत्कृष्ट सहभागी विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आली.

# उद्योजकता विकास केंद्र

**डॉ.आर.पी.कळमकर ( समन्वयक)**

महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे कौशल्ये, गुणविशेष त्यांच्यातील उद्योजकता व नवनिर्मिती यांना चालना मिळावी म्हणून 'इन्क्यूबेशन अॅण्ड एन्टरप्रिनिअरशिप डेव्हलपमेंट सेंटर' सुरु करण्यात आले. महाविद्यालयात उद्योजकता विकास केंद्रासाठी स्वतंत्र कक्ष असून कॉम्प्युटर, इंटरनेट, बैठक व्यवस्था व प्रकल्प प्रदर्शनासाठी स्वतंत्र हॉल उपलब्ध आहे. या विभागामार्फत गेल्या चार वर्षापासून दरवर्षी एम.सी.ई.डी. अहमदनगर यांचे सहकार्याने उद्योजकता विकास परिचय शिबिराचे आयोजन केले जाते. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी जे व्यावसायिक व उद्योजक आहेत त्यांची माहिती संकलित केली असून त्याचा विभागाच्या विविध उपक्रमात सहभाग घेतला जातो.

दि.२८ ऑगस्ट २०१९ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन इन्क्यूबेशन अॅण्ड एन्टरप्राईज विभागामार्फत न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स महाविद्यालय अहमदनगर या ठिकाणी आयोजित विद्यार्थी परिचय शिबिरात अक्षय कार्ले, महेश आसने, प्रशांत बनसोडे, गणेश गवारे, किरण गाणार व प्रशांत जाधव हे विद्यार्थी सहभागी झाले.

दि.३ ऑक्टोबर २०१९ रोजी महाविद्यालय पातळीवर प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये १९ विद्यार्थ्यांनी प्रकल्पांचे सादरीकरण केले. त्यातून श्री.यशवंत मयूर राजेंद्र व श्री.बनकर अभिनव अविनाश यांनी सादर केलेल्या अनुक्रमे कचऱ्या पासून इंधन व डांबर निर्मिती व सेन्द्रिक गण हे दोन निवडलेले प्रकल्प अविष्कार स्पर्धेसाठी पाठविण्यात आले.

दि.२९ फेब्रुवारी २०२० रोजी रयत शिक्षण संस्था व एम.सी.ई.डी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता परिचय शिबीरात डॉ.आर. पी.कळमकर यांनी सहभाग घेतला.

दि.२९ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालय पातळीवर नव उद्योजक/ मी उद्योजक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व उद्योजक मा.चंद्रकांत आढाव, संचालक साई अलायन्स अॅण्ड केमिकल, बेलापूर यांनी परीक्षण व मार्गदर्शक म्हणून काम केले. या स्पर्धेत श्री.राशिनकर अमोल संजय, श्री. यशवंत मयूर राजेंद्र व श्री.आढाव प्रतिक रविंद्र यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय, तृतीय क्रमाकाने निवड झाली.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयाने सा.फुले पुणे विद्यापीठ चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज अॅण्ड अॅग्रीकल्चर बजाजभवन, औरंगाबाद एम.सी.ई.डी.,अहमदनगर दुर्गा इंडस्ट्रिज, एम.आय.डी.सी. अहमदनगर यांच्याशी सामजस्य करार करण्यात आले आहेत.

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर

ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

# आम्ही रयत सेवक

## सिनिअर कॉलेज विभाग

| अ.नं. | सेवकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ.भोर.एल.डी. | M.Com., M.Phil., Ph.D. | | 9421479220 |
| २. | प्रा.डॉ.गवळी एस.एन. | M.Com., M.Phil., Ph.D. | | 9423725954 |
| ३. | प्रा.गाढे.डी.पी. | M.Com., M.Phil., Ph.D.GDC & A | | 8087524100 |
| ४. | प्रा.डॉ.घोटेकर डी.बी. | M.Com., DHE,M.Phil., Ph.D. | सेवानिवृत्त ३१/१२/२०१९ | 9011607082 |
| ५. | प्रा.देशमुख एस.वाय. | B.Com.,M.Ed.,(Phy.)SET | दि.१०/०१/२०२० पर्यंत | 9850135533 |
| ६. | प्रा.डॉ.बावके बी.बी. | M.A.,B.Ed.,SET, Ph.D. | | 9423785907 |
| ७. | प्रा.डॉ.सय्यद एस.बी. | M.A., M.Phil., Ph.D. | | 8275603990 |
| ८. | प्रा.डॉ.कळमकर आर.पी. | M.Com., M.Phil., Ph.D. | | 9422226279 |
| ९. | प्रा.पवार व्ही.एस. | M.Com.,M.Ed.(Phy.) SET | दि.११/०१/२०२० पासून | 9011643124 |
| १० | प्रा.मोरे व्ही.एम. | M.Lib.,NET, SET | | 9970846684 |
| ११. | प्रा.डॉ.केकाणे एम.ए. | M.Com.,NET,GDC & A.,Ph.D. | | 9011687692 |
| १२. | प्रा.नागपुरे व्ही.बी. | M.Com,SET,DTL,GDC & A | | 7756839655 |
| १३. | प्रा.कुलकर्णी एस.व्ही. | M.Com., PGDBM, M.B.S.NET, SET | | 8149125547 |
| १४. | प्रा.डॉ.घोडके बी.जी. | M.A.,B.Ed.,NET,Ph.D. | | 9975062200 |
| १५. | प्रा.डॉ.तुपे बी.जी. | M.A.,M.Phil.,Ph.D. | | 9922642974 |
| १६. | प्रा.डॉ.गुजर पी.एस. | M.Com.,NET.Ph.D. | | 9326635858 |
| १७. | प्रा.डॉ.जगताप एम.बी. | M.A.,M.Phil.,Ph.D. | | 9730309803 |
| १८. | प्रा.साळवे एस.के. | M.B.A.(Phil) M.Com. | | 8275391578 |
| १९. | प्रा.दातीर के.आर. | M.Com.,PGDBM,M.,GDC.& A,SET | | 9822582864 |
| २०. | प्रा.पवार एस.जे. | M.Com.,SET | | 9923660866 |
| २१. | प्रा.महाले एस.आर. | M.Com.,SET | | 8788824217 |
| २२. | प्रा.झगरे जी.बी. | M.Com.,SET,GDC& A | | 9527984445 |
| २३. | प्रा.शेख ए. | M.Com.,SET | | 8698352353 |

## संगणक विभाग

| अ.नं. | सेवकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | प्रा.चंद्रात्रे वाय,व्ही. | B.C.S.,M.C.M.,M.C.A. | 9404245561 |
| २. | प्रा.जोशी पी.डी. | M.C.A. | 9766087063 |
| ३. | प्रा.कु.दुग्गल एस.ए. | B.C.A.,M.C.A. | 9762647245 |
| ४. | प्रा.लांडे आर.डी. | B.C.S.M.C.S. | 9657633124 |
| ५. | प्रा.नाबगे ए.डी. | B.C.S.,M.C.S. | 9952796199 |
| ६. | प्रा.सौ.भावसार बी.एस. | B.C.S.,M.C.S. | 8793546010 |
| ७. | | | |

## ज्युनिअर कॉलेज विभाग

| अ.नं. | सेवकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | प्रा.पटारे आर.डी. | M.A.,B.Ed.,D.S.M. | 9272943324 |
| २. | प्रा.बोरसे एम.डी. | M.A.,B.Ed. | 8600996810 |
| ३. | प्रा.राऊत पी.बी. | M.Com., B.Ed. | 9922771246 |
| ४. | प्रा.ठुबे पी.के. | M.Com., B.Ed. | 8805536665 |
| ५. | प्रा.मांडे बी.टी. | M.A., B.Ed. दि.२७/०२/२०२० पासून | 9960744162 |
| ६. | प्रा.डॉ.राऊत एन.बी. | M.Com., B.Ed. SET.,Ph.D. दि.२७/०२/२०२० पासून | 9271942024 |
| ७. | प्रा.बनसोडे एस.आर. | M.Com., P.Ed. दि.२७/०२/२०२० पासून | 7709461134 |
| ८. | प्रा.धोंगडे व्ही.एस. | M.A., B.Ed. दि.२८/०२/२०२० पासून | 7768952888 |
| ९. | प्रा.मते जे.आर. | M.A., B.Ed. | 9850749549 |
| १०. | प्रा.हरदास ए.डी. | M.Com., B.Ed., M.Phil. | 8805536665 |
| ११. | प्र.शेख टी.जे. | M.Com.,B.Ed. | 8359178075 |
| १२. | प्रा.रुपवते के.ए. | M.Com.,B.Ed. | 9850749549 |
| १३. | प्रा.तांबे एस.एच. | M.A.,B.Ed. | 8359178075 |
| १४. | प्रा.ससाणे एस. | B.C.A.,M.C.S. | 7773944382 |

# प्रशासकीय सेवक विभाग

| अ.नं. | सेवकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | मोबाईल नं. |
|---|---|---|---|
| १. | श्री.भिंगारदिवे आर.डी. | H.S.C. | 9623912921 |
| २. | श्री.राऊत बी.बी. | H.S.C. | 9960993093 |
| ३. | श्री.हासे एस.वाय. | M.A.B.Ed. | 9326064596 |
| ४. | श्री.पटेल एस.पी. | S.S.C. | 8237565917 |
| ५. | श्री.गुंजाळ एस.व्ही. | M.A. | 9960567070 |
| ६. | श्री.सात्राळकर पी.पी. | S.S.C. | 9850060719 |
| ७. | श्री.फटांगरे एम.बी. | S.S.C. | 9552949684 |
| ८. | श्री.नरोडे बी.एस. | S.S.C. | 9970795463 |
| ९. | श्री.भवारी एच.एस. | S.S.C. | - |
| १० | श्री.शिंदे एस.ई. | H.S.C. | 9422844602 |
| ११ | श्री.गांगुर्डे बी.आर. | S.Y.B.Com. | 9765706708 |

# प्रसिद्धी माध्यमातील महाविद्यालय

## गुणवत्तेमुळेच रयत सर्व आघाड्यांवर अग्रस्थानी : जगधने

### सी. डी. जैन कॉलेजला दुसऱ्यांदा नॅकचे 'ए' मानांकन



श्रीरामपूर येथे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव भोर, प्रा. डॉ. बाळासाहेब बावके, प्रा. विवेक मोरे यांचा गौरव करताना मीनाताई जगधने. समवेत प्रकाश पाटील निकम.

श्रीरामपूर (प्रतिनिधी) – कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिप्रेत गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्या विद्या शाखेतून समाजाच्या तळागाळातील घटकांपर्यंत कार्याला झोकून देत तळमळीने पोहोचविले जात आहे. त्यामुळे संस्था सर्वच आघाड्यांवर अग्रस्थानी आहे. त्याचाच एक भाग म्हणजे नॅक मूल्यांकनात सी. डी. जैन कॉलेजला दुसऱ्यांदा मिळालेले 'ए' ग्रेड दर्जाचे मानांकन होय, असे गौरवोद्गार स्थानिक व्यवस्थापकीय परिषदेच्या अध्यक्षा मीनाताई जगधने यांनी काढले.

केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बेंगलोर यांच्या त्रिसदस्यीय समितीने नुकतेच दोन दिवस डाकले कॉलेजला भेट देऊन मूल्यमापन केले. त्याचा निकाल नुकताच जाहीर होऊन बदललेल्या निकषातही कॉलेजने 'ए' ग्रेड मिळवून आपले स्थान कायम टिकविले. त्यानिमित्ताने आयोजित सत्कार समारंभात त्या बोलत होत्या.

या मूल्यमापन समितीत नॅक कोअर टीमचे चेअरमन माजी प्रभारी कुलगुरु प्रदीपकुमार यादव (उत्तरप्रदेश), समन्वयक कर्मपाल नरवाल, (हरियाणा) व सदस्या प्राचार्य मारिया आराधना (गोवा) यांचा समावेश होता.

नॅक समन्वयक म्हणून प्रा. डॉ. बाळासाहेब बावके, आय.क्यु.ए.सी. चेअरमन प्रा. विवेक मोरे, संगणक विभागाचे प्रा. वाय. व्ही. चंद्रात्रे यांनी परिश्रम घेतले. प्रभात उद्योग समूहाचे उद्योजक किशोर निर्मळ, उपाध्यक्ष अभिजित जगधने यांच्यासह सेवानिवृत्त प्रा. डॉ. बबनराव आदिक, प्रा. डॉ. गोरख बारहाते, प्रा. भानुदास गाडे यांच्यासह आजी-माजी प्राध्यापक, सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनींचे मौलिक सहकार्य मिळाले.



श्रीरामपूर : डाकले वाणिज्य महाविद्यालयास 'नॅक'ची 'अ' श्रेणी मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ. लक्ष्मण भोर, प्रा. डॉ. बाळासाहेब बावके, प्रा. विवेक मोरे यांना गौरविताना 'रयत'च्या जनरल बॉडी सदस्य मीनाताई जगधने व प्रकाश निकम.

## 'सर्व आघाड्यांवर 'रयत' अग्रस्थानी'

श्रीरामपूर : ''रयत शिक्षण संस्थेच्या विद्याशाखांतून कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिप्रेत गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण पोचविले जात आहे. त्यामुळे संस्था सर्वच आघाड्यांवर अग्रस्थानी आहे. त्यामुळेच 'नॅक' मूल्यांकनात चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयाला दुसऱ्यांदा 'अ' श्रेणी मिळाली,'' असे गौरवोद्गार संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी काढले. 'नॅक' मूल्यांकनात डाकले महाविद्यालयास 'अ' श्रेणी मिळाल्याबद्दल शिक्षकांच्या सत्कार समारंभात त्या बोलत होत्या. या यशाबद्दल रावसाहेब म्हस्के, प्रकाश निकम, सुमनभाई शाह, ॲड. विजय बनकर, डॉ. राजीव शिंदे, प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे, प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी प्राचार्य डॉ. लक्ष्मण भोर व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले. 'नॅक' समन्वयक प्रा. डॉ. बाळासाहेब बावके, प्रा. विवेक मोरे, प्रा. वाय. व्ही. चंद्रात्रे यांनी परिश्रम घेतले.

संक्षिप्त



श्रीरामपूर : 'डिजिटल मार्केटिंग' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मीनाताई जगधने.

## 'ई-मार्केटिंग संकल्पना समजावून घ्या'

श्रीरामपूर : आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच कामे डिजिटल साधनांच्या साह्याने केली जात आहेत. आज कोणत्याही व्यवसायाला वस्तू व सेवांची विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मार्केटींग करावे लागते. त्यासाठी ई-मार्केटिंग ही संकल्पना समजून घ्या. त्यासाठी डिजिटल मार्केटींग कार्यशाळा ही एक संधी आहे. त्या संधीचा लाभ घ्या, असे प्रतिपादन रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररुप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात संगणक विभागामार्फत आयोजित 'डिजिटल मार्केटिंग' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मीनाताई जगधने बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे व दिल्ली येथून आलेले तज्ञ मार्गदर्शक सुमंत तिवारी, पुष्कराज साळुंके, दिपक कुमार, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे सुमन तिवारी यांनी वस्तू व सेवा क्षेत्रात डिजिटल मार्केटिंग ही काळाची गरज बनली आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी आहेत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख योगीराज चंद्रात्रे यांनी केले.

सकाळ

## डिजिटल मार्केटिंग कार्यशाळा ही संधी : जगधने



श्रीरामपूर : येथील डाकले महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मीनाताई जगधने. समवेत प्राचार्य एल. डी. भोर, प्रा. योगीराज चंद्रात्रे, दीपक कुमार, सुमंत तिवारी.

श्रीरामपूर, ता. १८ : आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच कामे डिजिटल साधनांच्या साह्याने केली जात आहेत. कोणत्याही वस्तू व सेवांची विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मार्केटिंग करावे लागते. त्यासाठी डिजिटल मार्केटिंग कार्यशाळा ही एक संधी आहे. विद्यार्थ्यांनी ई-मार्केटिंग ही संकल्पना समजून घेऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयाच्या संगणक विभागामार्फत आयोजित डिजिटल मार्केटिंग या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. दिल्ली येथील तज्ज्ञ मार्गदर्शक सुमंत तिवारी, पुष्कराज साळुंके, दीपक कुमार, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर व्यासपीठावर होते.

तिवारी यांनी, वस्तू व सेवा क्षेत्रात डिजिटल मार्केटिंग ही काळाची गरज बनली असून, या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन केले. विभागप्रमुख योगीराज चंद्रात्रे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. भोर यांनी स्वागत व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. बी. एस. भावसार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी. डी. भोर यांनी आभार मानले. कार्यशाळेस प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

Nagar Main

## नॅक मानांकनात अ श्रेणी मिळाल्याबद्दल डाकले महाविद्यालयाचा सन्मान



श्रीरामपूर (प्रतिनिधी) – डाकले वाणिज्य महाविद्यालयास नॅकची अ श्रेणी मिळाल्याबद्दल प्राचार्य लक्ष्मणराव भोर, प्रा. बाळासाहेब बावके, विवेक मोरे व सर्व कर्मचाऱ्यांचा सत्कार इन्हिरिंग ग्रुप ग्लोब नानीकचे अध्यक्ष दिनकर बोरुडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी मुख्याध्यापक बापूसाहेब भोसले, माजी तहसीलदार शंकरराव मांगडे प्रमुख उपस्थित होते. यावेळी डॉ. मदन सोमाणी, सौ. मंजिरी सोमाणी, श्री व सौ. काळे, गंगाधर वाघमारे गुरुजी, श्री. पठाण, एल. के. शिंदे, श्री. गवळे, ज्ञानेश्वर शिंदे, प्रवीण बागवान, माजी मुख्याध्यापक प्रभाकर साळवे, जगन्नाथ दिवटे यांनीही सर्वांचे स्वागत केले. माजी मुख्याध्यापक एल. के. शिंदे यांचाही वाढदिवसानिमित्त भोर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिंदे यांनी आभार मानले. समारोपाचे भाषण प्रभाकर साळवे यांनी केले. शेवटी अल्पोपहार देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## डाकले महाविद्यालयास मानांकनाची अपेक्षा

श्रीरामपूर : प्रतिनिधी

जिल्ह्यातील एकमेव स्वतंत्र वाणिज्य महाविद्यालयात असलेल्या सी. डी. जैन कॉलेजने गेल्या काही वर्षात केलेल्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक दर्जा आणि रचनात्मक प्रगतीमुळे महाविद्यालयाचा सर्वांगीण चेहरामोहरा बदलला. त्यामुळे यंदा नॅक मुल्यांकनात महाविद्यालयाला निश्चितच ए- प्लस मानांकन अपेक्षित आहे, असा विश्वास प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव भोर यांनी व्यक्त केला.

जुलै महिन्यात केंद्र सरकारच्या विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत सी. डी. जैन कॉलेजचे नॅक मुल्यांकन करण्यासाठी तज्ज्ञांचे पथक दाखल होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आयोजित पूर्वतयारी आणि कार्य आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना प्राचार्य भोर बोलत होते.

अध्यक्षस्थानी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष उद्योजक किशोर निर्मळ होते. डाकले कॉलेजने भौतिक, शैक्षणिक आणि रचनात्मक बदल घडवून आपली अनोखी ओळख निर्माण केली आहे. त्यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत, यावेळी कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. श्रीरंग झावरे, प्रा. डॉ. गोरख बारहाते, प्रा. डॉ. बावके, प्रा. डॉ. बबनराव आदिक उपस्थित होते.

## 'पुस्तक वाचणारा शिक्षक विद्यार्थ्यांना समृद्ध करतो'



श्रीरामपूर : डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात सेवापूर्ती सोहळ्यात प्रा. डी. बी. घोटेकर यांचा सत्कार करताना मीनाताई जगधने.

श्रीरामपूर, ता. ५ : पुस्तकवाचन करणारा शिक्षक स्वतःसह विद्यार्थ्यांनाही समृद्ध करतो, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी केले.

'रयत'च्या येथील डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात प्रा. डॉ. डी. बी. घोटेकर यांचा सेवापूर्ती सोहळा नुकताच झाला. त्या वेळी जगधने बोलत होत्या. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, प्राचार्य मुकुंद पोंधे, माजी प्राचार्य शंकरराव अनारसे, माजी प्राचार्य डॉ. टी. ई. शेळके, प्रा. बबन आदिक, ॲड. विजय बनकर, उद्योजक किशोर निर्मळ आदी उपस्थित होते.

जगधने म्हणाल्या, ''डॉ. घोटेकर यांनी समाजसुधारक बाबा आमटे व (स्व.) रावसाहेब शिंदे यांच्या सहवासात कार्य केले. 'रयत'च्या वाटचालीत, तसेच डाकले महाविद्यालयाच्या विकासासाठी त्यांचे सहकार्य मिळाले. महाविद्यालयास नामांकन मिळवून देण्यासाठी त्यांनी उत्कृष्ट नियोजन केले.''

प्रा. एस. पी. सय्यद यांनी प्रास्ताविक केले. उज्ज्वला भोर, श्वेता घोटेकर, भाग्यश्री घोटेकर, अशोक तुपे, प्रा. बबन आदिक, प्रा. शांतिलाल जावळे आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. जे. आर. मते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एम. एन. होळ यांनी आभार

## विद्यार्थ्यांनी जागृत राहणे आवश्यक

मीनाताई जगधने



श्रीरामपूर : चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर राष्ट्रीय ग्राहक संरक्षण दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मीनाताई जगधने.

श्रीरामपूर : प्रतिनिधी

ग्राहकांनी विविध वाढत्या फसव्या होते, त्यासाठी ग्राहकांनी जागृत राहून मालाची खरेदी करताना पक्की पावती घेणे, किंमत, वस्तू वापरण्यायोग्य दिनांक, फसवी जाहिरात इत्यादी बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. ग्राहकामध्ये विद्यार्थ्यांनीही जागृत रहावे, असे आवाहन मीनाताई जगधने यांनी केले.

चंद्ररूप डाकले महाविद्यालय व ग्राहक पंचायत महाराष्ट्र शाखा श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय ग्राहक संरक्षण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना त्या बोलत होत्या.

याप्रसंगी प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अनिल श्रीगोड यांनी ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकांना दिलेले विविध अधिकार सांगितले. तसेच विविध वस्तूंमध्ये असणारी भेसळ आपण कशी ओळखू शकतो, याविषयी मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ. जी. एच. बारहाते यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय ग्राहक संरक्षण दिनानिमित्ताने महाविद्यालयात निबंधक स्पर्धेचे आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये हाडके प्राजक्ता गणेश, शिंदे वैष्णवी आप्पासाहेब, पटेकर प्रतिभा महेश या गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. अमृता माळवे यांनी केले.



श्रीरामपूर : 'डिजिटल मार्केटिंग' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मीनाताई जगधने.

'ई-मार्केटिंग संकल्पना समजावून घ्या'

श्रीरामपूर : आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच कामे डिजिटल साधनांच्या साह्याने केली जात आहेत. आज कोणत्याही व्यवसायाला वस्तू व सेवांची विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मार्केटींग करावे लागते. त्यासाठी ई-मार्केटिंग ही संकल्पना समजून घ्या. त्यासाठी डिजिटल मार्केटींग कार्यशाळा ही एक संधी आहे. त्या संधीचा लाभ घ्या, असे प्रतिपादन रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररुप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात संगणक विभागामार्फत आयोजित 'डिजिटल मार्केटिंग' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मीनाताई जगधने बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे व दिल्ली येथून आलेले तज्ञ मार्गदर्शक सुमंत तिवारी, पुष्कराज साळुंके, दिपक कुमार, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे सुमन तिवारी यांनी वस्तू व सेवा क्षेत्रात डिजिटल मार्केटिंग ही काळाची गरज बनली आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी आहेत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख योगीराज चंद्रात्रे यांनी केले.

## सावित्रीबाईंचे विचार जोपासा - डॉ. दीपाली काळे

श्रीरामपूर : देशाच्या व समाजाच्या उद्धारासाठी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्वतःला वाहून घेतले. त्यांचे विचार, कार्य व कर्तृत्वाचा वारसा आपण जोपासला पाहिजे, असे प्रतिपादन अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. दीपाली काळे यांनी केले. येथील डाकले महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थीनी मंच यांच्या वतीने आयोजित सावित्रीबाई फुले जयंती समारंभात डॉ. काळे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी रयत संकुलाच्या अध्यक्षा मीनाताई जगधने होत्या. प्रांताधिकारी अनिल पवार, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यावेळी उपस्थित होते. सावित्रीबाईंनी पुरुषप्रधान संस्कृतीची शिक्षणाची मक्तेदारी मोडीत काढली. स्त्री शिक्षणाचा पाया घातला. म्हणून त्या खऱ्या अर्थाने ज्ञानाच्या स्फूर्ती नायिका आहेत, असे काळे म्हणाल्या. प्रांताधिकारी पवार यांनी महापुरुषांच्या विचारांचे पारायण करा असे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात मीनाताई जगधने यांनी महापुरुषांनी श्रमदान व स्वावलंबी शिक्षणावर भर दिल्याचे सांगितले. प्रास्तविक प्राचार्य डॉ. भोर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. एम. बी. जगताप यांनी केले. आभार डॉ. बी. जी. तुपे यांनी मानले.

## माजी विद्यार्थ्यांकडून कॉलेजला वॉटर प्युरिफायर भेट



### माजी विद्यार्थी व प्राध्यापकांनी दिला आठवणींना उजाळा

# प्रसिद्धी माध्यमातील महाविद्यालय

सकाळ दि २५।१।२०२०

## स्पर्धेच्या युगात कुशल मनुष्यबळाची गरज : जगधने

श्रीरामपूर, ता. २४ : "सध्याच्या स्पर्धेच्या व गुणवत्तेच्या युगात कुशल मनुष्यबळाची मोठी गरज आहे. त्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनीमार्फत चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून स्वतःमध्ये नवनवीन कौशल्ये विकसित करून शाश्वत उत्पन्नाचे मार्ग शोधावेत," असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी केले.

येथील चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात ब्युटी पार्लर शॉर्ट टर्म कोर्सअंतर्गत आयोजित ॲडव्हान्स मेक-अप या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. ब्युटिशियन मयूरी गौडकर, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, समन्वयक प्रा. डॉ. एस. एन. गवळी व्यासपीठावर होते. गौडकर यांनी, विद्यार्थिनींना ब्युटी पार्लर क्षेत्राचे महत्त्व, करिअरच्या संधी व अर्थप्राप्तीविषयी माहिती दिली. ॲडव्हान्स ग्रायडल मेक-अपच्या प्रात्यक्षिकासह त्यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य भोर यांनी, महाविद्यालयात सुरू असलेले तीन शॉर्ट टर्म कोर्स व पायाभूत सेवा सुविधांची माहिती दिली. प्रा. गवळी यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. बी. एस. भावसार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. टी. जे. शेख यांनी आभार मानले.



श्रीरामपूर : येथील डाकले वाणिज्य महाविद्यालयात मेक-अप कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मीनाताई जगधने. समवेत ब्युटिशियन मयूरी गौडकर, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, प्रा. डॉ. एस. एन. गवळी, प्रा. टी. जे. शेख आदी.

## सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

श्रीरामपूर, ता. ३ : "महात्मा फुले व सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी आपले विचार व कार्याने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठा इतिहास रचला. त्यांनी श्रमप्रधान व स्वावलंबी शिक्षणावर भर दिला," असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांनी केले.

डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थी विकास मंडळातर्फे आयोजित कार्यक्रमात जगधने बोलत होत्या.

प्रांताधिकारी अनिल पवार, अपर पोलिस अधीक्षक डॉ. दीपाली काळे ... प्राचार्य डॉ. एल. डी. भोर उपस्थित होते. डॉ. एम. बी. जगताप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. जी. तुपे यांनी आभार मानले.



श्रीरामपूर : डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना मीनाताई जगधने.

## सीडीजे महाविद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी



श्रीरामपूर (प्रतिनिधी)– शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या सीडीजे महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.डी. भोर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना गुरूंचे जीवनातील महत्त्व विषद केले. नंतर उपस्थित गुरूजनांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रा. पी.बी. राऊत, के.एस.नवले, आर.डी. पटारे, एम.एन.शेख, प्रा. राऊत, बोरसे, हरदास, शेख, मते, तांबे, राठी आदी उपस्थित होते. प्रा. हरदास यांनी मान्यवरांचे आभार मानले.

## डिजिटल मार्केटींग कार्यशाळा संधीचा लाभ घ्या : जगधने



डिजिटल मार्केटींग या विषयावर कार्यशाळेत मार्गदर्शन करताना रयतच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्या मीनाताई जगधने.समवेत पदाधिकारी.

श्रीरामपूर (प्रतिनिधी) : आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच कामे डिजिटल साधनांच्या साहाय्याने केली जात आहेत. आज कोणत्याही व्यवसायाला वस्तू व सेवांची विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मार्केटींग करावे लागते. त्यासाठी ई-मार्केटींगसाठी ही संकल्पना समजून घ्या. डिजिटल मार्केटींग कार्यशाळा ही एक संधी आहे. त्या संधीचा लाभ घ्या, असे प्रतिपादन रयतच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केले.

येथील सीडीजे महाविद्यालयात संगणक विभागामार्फत आयोजित डिजिटल मार्केटींग या विषयावर ... दिल्ली येथून आलेले तज्ञ मार्गदर्शक सुमंत तिवारी, पुष्कराज साळुंके, दीपक कुमार, प्राचार्य डॉ.एल.डी.भोर उपस्थित होते. सुमन तिवारी यांनी वस्तू व सेवा क्षेत्रात डिजिटल मार्केटींग ही काळाची गरज बनली आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी आहेत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक विभागप्रमुख योगीराज चंद्रात्रे यांनी केले. स्वागत प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.बी.एस.भावसार यांनी केले तर आभार प्रा.पी.डी.भोर यांनी मानले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी – 25/01/2020

## कोर्सच्या माध्यमातून कौशल्य साधावे

मीनाताई जगधने

श्रीरामपूर : प्रतिनिधी

सध्या स्पर्धेचे व गुणवत्तेचे युग आहे. या युगात कुशल मनुष्य बळाची मोठ्या प्रमाणात गरज आहे. त्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी मार्फत चालविलेल्या जाणाऱ्या विविध शॉर्ट टर्म कोर्सचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा. या माध्यमातून स्वतःमध्ये नवनवीन कौशल्य विकसित करा व शाश्वत उत्पन्नाचे मार्ग शोधा, असे आवाहन मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केले.

चंद्ररुप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात ब्युटी पार्लर शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत ॲडव्हान्स मेकअप या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी जगधने बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर ब्युटीशियन मयुरी गौडकर, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, समन्वयक प्रा. डॉ. एस. एन. गवळी उपस्थित होते.

मयुरी गौडकर यांनी विद्यार्थिनींना ब्युटी पार्लर क्षेत्राचे महत्त्व, करिअरच्या संधी व अर्थप्राप्तीविषयी माहिती दिली. ॲडव्हान्स ब्राईडल मेकअपचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ.एल.डी. भोर यांनी महाविद्यालयात सुरू असलेल्या तीन शॉर्ट टर्म कोर्स व पायाभूत सेवा सुविधांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. गवळी यांनी करून दिला. सूत्रसंचलन प्रा.बी. एस.भावसार यांनी केले तर आभार प्रा. टी. जे.शेख यांनी मानले. या कार्यशाळेस बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



श्रीरामपूर : ब्युटी पार्लर शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत ॲडव्हान्स मेकअप या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मीनाताई जगधने.

## कर्मवीरांनी बहुजन व वंचितांसाठी आयुष्य झिजवले : निकम

लोकसेवा : प्रतिनिधी

श्रीरामपूर : बहुजन समाज व उपेक्षितांच्या शिक्षणासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. ... असे प्रतिपादन जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम पाटील यांनी केले. ते रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररुप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात ५७ वी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी निकम बोलत होते.

...



श्रीरामपूर : डाकले महाविद्यालयात आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेचे सुमनभाई शाह, प्राचार्य एल. डी. भोर यांच्या हस्ते पारितोषिक स्विकारताना अहमदनगर महाविद्यालयाचे स्पर्धक समवेत डॉ. बापूसाहेब घोडके, परीक्षक अतुल वढणे, निलेश परबत. (छाया– संजय पगारे)

लोकसेवा

... कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मा. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांनी करून दिला. ... स्पर्धेचे संयोजन व आभार संयोजक प्रा. डॉ. बापूसाहेब घोडके यांनी आभार मानले. प्रा. डॉ. गजर पी. एस., प्रा. साळवे एस. के. यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास स्पर्धक, सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन सेवक, विद्यार्थी विद्यार्थिनींनी बहुसंख्येने उपस्थित होते.

## डिजिटल मार्केटिंग क्षेत्रात मोठी संधी –जगधने

श्रीरामपूर: आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच कामे डिजिटल साधनांच्या साह्याने केली जात आहेत. आज कोणत्याही व्यवसायाला वस्तू व सेवांची विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मार्केटिंग करावी लागते. या क्षेत्रात मोठी संधी आहे, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररुप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात संगणक विभागामार्फत 'डिजिटल मार्केटिंग' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत जगधने बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून दिल्ली येथून आलेले तज्ज्ञ मार्गदर्शक सुमंत तिवारी, पुष्कराज साळुंके, दीपक कुमार, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर उपस्थित होते.

तिवारी म्हणाले, वस्तू व सेवा क्षेत्रात डिजिटल मार्केटिंग ही काळाची गरज बनली आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी आहेत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक विभागप्रमुख योगीराज चंद्रात्रे यांनी केले. स्वागत प्राचार्य भोर यांनी, तर सूत्रसंचालन प्रा. बी. एस. भावसार यांनी केले. आभार प्रा. पी. डी. भोर यांनी मानले.

## डाकले महाविद्यालय ...



चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात प्रजासत्ताकदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, उपप्राचार्य डॉ. डी. पी. गाढे, वाणिज्य विभाप्रमुख डॉ. एस. एन. गवळी आदी. (छाया – संजय पगारे)

श्रीरामपूर (प्रतिनिधी) : येथील रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात ७१ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रीय छात्रसेनेच्या कॅडेट्सने ध्वजास सलामी दिली. प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांनी यावेळी शुभसंदेश दिला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. डी. पी. गाढे, वाणिज्य विभाप्रमुख डॉ. एस. एन. गवळी, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विशाल पवार, लेफ्टनंट प्रा. विजय नागपुरे उपस्थित होते. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन याप्रसंगी करण्यात आले. राष्ट्रीय छात्रसेना व अविष्कार स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौव याप्रसंगी करण्यात आला. कार्यक्रमास सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन सेवक, ज्युनिअर व सिनिअर महाविद्यायाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

सार्वमत



श्रीरामपूर : डाकले महाविद्यालयात आयोजित वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक सुमनभाई शाह, प्राचार्य एल. डी. भोर यांच्या हस्ते स्वीकारताना नगर महाविद्यालयाचे स्पर्धक. समवेत डॉ. बापूसाहेब घोडके, अतुल वढणे, नीलेश परबत.

## डाकले जैन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे वक्तृत्व स्पर्धेत यश

श्रीरामपूर, ता. २१ : रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालयात आयोजित ५७व्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत नगरच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स महाविद्यालयातील अनिकेत डोमाळे व अशोक शिंदे यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

वारजे (पुणे) येथील आर्टस, कॉमर्स व सायन्स महाविद्यालयाचा सुजित काळंगे व आशुतोष निकम यांनी द्वितीय, तर येथील रा. ब. ना. बोरावके महाविद्यालयाच्या अशोक मोरगे व राहुल गुडदे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. संजीवनी सोमसे (गरवारे महाविद्यालय, पुणे), वृषाली राणे (अमृतवाहिनी महाविद्यालय, संगमनेर) ... औरंगाबाद) यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके मिळविली. विजेत्या स्पर्धकांना कर्मवीर चषक, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. संस्थेचे जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन, तर सुमनभाई शहा यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. अतुल वढणे व नीलेश परबत यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. डॉ. पी. एस. गजर, प्रा. एस. के. साळवे यांनी सूत्रसंचालन केले. संयोजक प्रा. डॉ. बापूसाहेब घोडके यांनी आभार मानले. स्पर्धकांसह प्राध्यापक, कार्यालयीन सेवक, तसेच विद्यार्थी ...

## दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट

नियम ०८ फॉर्म ०४ प्रमाणे निवेदन

| | |
|---|---|
| **प्रकाशन स्थळ :** | **रयत शिक्षण संस्थेचे, चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर-४१३ ७०९** |
| **संपादकाचे नाव** | **डॉ.बापूसाहेब घोडके** |
| **राष्ट्रीयत्व** | **भारतीय** |
| **पत्ता** | **चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर-४१३ ७०९** |
| **दूरध्वनी** | **०२४२२-२२२२४५** |
| **प्रकाशकाचे नाव** | **प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव भोर** |
| **राष्ट्रीयत्व** | **भारतीय** |
| **पत्ता** | **प्राचार्य निवास चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर-४१३ ७०९** |
| **मुद्रकाचे नाव** | **शुभम प्रिंटर्स, श्रीरामपूर** |
| **मुखपृष्ट सजावट** | **आनंद फुणगे** |
| **पत्ता** | **वढणे वस्ती, श्रीरामपूर** |
| **मुखपृष्ठ/मलपृष्ठ संकल्पना** | **डॉ.बापूसाहेब घोडके** |
| **नियतकाल** | **वार्षिक** |
| **मालकी** | **रयत शिक्षण संस्थेचे, चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर-४१३ ७०९** |

मी,प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव भोर असे जाहिर करतो की,
वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा आहे.

**डॉ.लक्ष्मणराव भोर**
**प्राचार्य**
**(खाजगी वितरणाकरिता)**

# रयत उत्सव-कर्मवीर जयंती सोहळा

# पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील १३२ वी जयंती



कर्मवीरांना अभिवादन करताना
कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे
मा.विलास महाडिक, मा.डॉ.दीपाली काळे,
मा.प्रकाश निकम पाटील, मा.डॉ.रवींद्र जगधने,
मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, मा.प्राचार्य डॉ.के.एच.शिंदे.,
मा.प्राचार्य डॉ.एम.एस.पोंधे व इतर मान्यवर




कार्यक्रमाचे पाहुणे
मा.विलास महाडिक
सहसचिव, माध्यमिक विभाग,
रयत शिक्षण संस्था, सातारा
आपले विचार मांडताना




कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या
मा.डॉ.दीपाली काळे
अपर, पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर
मनोगत व्यक्त करताना




अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना
मा.प्रकाश निकम पाटील
सदस्य, जनरल बॉडी,
रयत शिक्षण संस्था, सातारा









**इमारतींचे नामकरण व उद्घाटन**
**कोनशिला अनावरण समारंभ**